
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.





REFBK-0025422
REFBK-0025422

# दक्षिणवारा

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 1 NOV 1987 | 13 MAR 1988 |
| 22 NOV 1987 | 17 APR 1988 |
| 22 NOV 1987 | 20 APR 1988 |
| 6 DEC 1987 | 26 JUN 1988 |
| 27 DEC 1987 | 2 OCT 1988 |
| 31 JAN 1988 | 3 OCT 1990 |
| 17 FEB 1988 | 15 DEC 1990 |
| | 26 DEC 1990 |

(क्र. मा. पहा)

५०००–११–८६

संदर्भ भु.प्र.
६९७
२५४२२
२९।९।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६९७
भु.प्र. क्र. २५४२२
२९।९।८७
शाखा (स्थळ प्रत)

# दक्षिणवारा

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

REFBK-0025422
REFBK-0025422

मॅजेस्टिक प्रकाशन

पहिली आवृत्ती : जुलै, १९८७

© गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेंबर्स,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

मूल्य : २४ रुपये

चि. 'दा पराडकर,
हें प्रवासवर्णन तुला—

आप्पा

पलिकडील वर्षी कोल्हापूरहून एका व्हीडियो कोचमधून आम्हीं दोघांनीं दक्षिणयात्रा केली. दक्षिण मला नवी नव्हे. पण वेदांतंगलचें पक्षिअभयारण्य, मृदुमलाई-बांदीपूरचें अभयारण्य, तसेंच केरळमधील पेरियारचें अभयारण्य हीं या प्रवासांत अन्तर्भूत असल्यामुळें आम्ही या प्रवासासाठीं लालचावलों.

तीं अभयारण्यें आणि त्यांत घालविलेले सोनसळे दिवस हे माझ्या जीवनांतले अतिशय सुखाचे होते. त्यांच्यानिमित्तानें गेले कित्येक दिवस जें तंजाऊर पाहायचें घोकीत होतों, तेंही पाहून झालें, मुख्यतः तिथलें प्रचण्ड ग्रंथालय : सरस्वती महाल. प्रत्येक मराठ्यानें गर्व करावा, असें तें ग्रंथालय आहे.

त्या प्रवासाची ही दैनंदिनी. कोल्हापूरच्या प्रताप पाटिलांमुळें हा प्रवास अतिशय सुखाचा झाला.

४ अ, प्रशान्त
तुळशीबागवाले कॉलनी,
पर्वती, पुणे ९.

इति ।
आप्पा दाण्डेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६६
दा. क्र.
दि.
(स्थळ प्रत)

दि. १०।१२।८४. डिसेंबर महिन्याचा दुसरा आठवडा. थंडी केवळ तोंड दाखवून पुनः नाहींशी झाली होती. उत्तरेंत हिमवर्षाव होत होते. दक्षिण देश त्यांपासून मुक्त होता. एका सुरेख सकाळीं ठीक साडेनऊ वाजतां समुत्सुक पर्यटकांनीं भरलेला आमचा व्हीडियो कोच कोल्हापूर सोडून दक्षिणयात्रेस निघाला.

दक्षिण देश पाहण्याची कांहीं ही पहिली वेळ नव्हे. तसे आम्ही सगळे दक्षिणीच. पांच-सहा वर्षं माळव्यांत, रेवायाः उत्तरे तीरे होतों. नार्मदीय लोक थट्टा करून म्हणत, 'दखनी, साले, भातबिगाडे कढी डालके खाते हैं।' म्हणजे हे दक्षिणी खुळचट भातामध्यें कढी ओतून त्या सुंदर अन्नाचा सत्यनाश करतात. बरोबर आहे. तिकडे गहूं पिकतो, तांदूळ सठींसहामाशीं दिसायचा. भात म्हणजे त्या देशीं कौतुकानं सणावारीं शिजवायचं अन्न. त्यांत कढीसारखा पदार्थ मिसळून त्याचा राडा करणाऱ्या आम्हां दक्षिण्यांबद्दल जर एखादा असा अरुचिकर अभिप्राय प्रगट झाला, तर त्याबद्दल दाक्षिणात्यांनीं रागावूं नये. शिवाय पंचगौड आणि पंचद्राविड या ब्राह्मणांच्या दहा विभागांपैकीं दाण्डेकरांची गणना पंचद्राविडांमध्यें. म्हणजे आम्ही दाक्षिणी.

पण मी मोठ्या उत्सुकतेनं ज्या दक्षिण-प्रवासास निघालों होतों, तो दक्षिणदेश म्हणजे 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' नव्हे. तर उंच

उंच गोपुरांनीं दाटलेला, माडांच्या सावल्यांनीं आणि समृद्ध भातपिकानं हिरवागार असलेला दक्षिणदेश. आमची ही यात्रा दक्षिणदेशींचीं तीर्थं पाहण्यासाठीं तर निघाली होतीच, पण केवळ देवदर्शन हा आमच्या सहलीचा प्रमुख उद्देश नव्हता. मित्र श्री. मोहन हवालदार म्हणाले होते, कीं या निमितानं दक्षिणेकडलीं अभयारण्यं पाहायचीं. वेदान्तंगलचं पक्षिअभयारण्य. पेरियारचं व्याघ्र आणि हत्तींनीं गच्च झालेलं अभयारण्य. बांदीपूर आणि मृदुमलाईचीं अभयारण्यं. रंगानथितुचं पक्षिअभयारण्य. दाण्डेलीचं अभयारण्य. यांमुळं जीव लालचावला होता. एरवीं दक्षिणदिशा दोनदां पाहून झाली होती, एकदां हम्पीविरूपाक्षाच्या लोभानं विजयनगर-पर्यंत फेरा करून आलों होतों.

तीस वर्षं झालीं असतील, कदाचित् जास्तही, आमचे एक मित्र संगीता-लंकार श्री. मराठे हे कालिकतला—त्याचं नांव कोझिकोडे—राहत. कालिकत ही केरळची भव्य बाजारपेठ. आपल्याकडे तुरी—ज्वारीचीं वाळवणं घालतात, तशीं तिकडे मिऱ्यांचीं. मिरीं, जायफळं, दालचिनी, कॉफी, टापिओका—हें सगळं त्या पेठेंत प्रचंड प्रमाणांत विकायला यायचं. अडत्यांचीं भलीं मोठ-मोठालीं दुकानं. त्या कालिकतास जाऊन पावता झालों. मराठे हे मल्याळम् भाषेचे उत्तम जाणकार. मग त्यांना घेऊन केरळभर हिंडलों. तिथलीं प्रचण्ड देवळं पाहिलीं. त्या देवळांत होणारे उत्सव पाहिले. त्यांच्या प्राकारांत उभे असलेले पंधरा पंधरा, वीस वीस हत्ती पाहिले. एका प्रसंगविशेषामुळं रात्रभर चाललेलीं कथाकली नृत्यं पाहिलीं. इथवर, कीं एका कथाकली नृत्यशाळेंत जाऊन बालवयापासून मुलांना मिळत असलेलं कथाकलीचं शिक्षण आणि त्यानिमित्यें करावे लागणारे व्यायामही पाहिले. पेरियारचं अभयारण्य पाहिलं. तिथं एका नावेंतून त्या सरोवरांत नौकाविहार करून तिथले वन्य हत्तीही पाहिले. अलेप्पी ते कोट्टायम असा तीन-चार तासांचा

जलप्रवासही त्याच वेळीं केला. इडली, दोसा, परिप्पुवडा, उत्थापम्, इत्यादि केरळीय भोज्यपदार्थांचा आस्वादही घेतला. त्याच प्रवासांत कन्याकुमारी-पर्यंत जाऊन आलों. तिथलं अद्वितीय स्वामी विवेकानंद शिलास्मारक त्या वेळीं आकारास आलं नव्हत.

पुढं ७७ सालीं 'स्मरणगाथे'ला अकादमी ॲवॉर्ड मिळालं, तो समारंभ बंगळूरला झाला. तेव्हां सकुटुंब दक्षिण-प्रवास घडला. पूर्वेकडून निघून, कन्याकुमारीस शिवून, पश्चिमेकडून बंगळूरला परतलों होतों. तेव्हां दक्षिण दिशा मला नवी नव्हती. इतकीं वरखळ अभयारण्यं पाहायला मिळणार, ही कल्पना मात्र रोमहर्षक होती. आणिकही एक बारकासा लोभ होता, इतकीं वर्षं मी १२० याशिका हें अगदीं प्रारंभींचं मॉडेल वापरून छाया-चित्रण करीत होतों. 'शितू'ला शासकीय पारितोषिक मिळतांच मीं तो कॅमेरा खरीदला होता. भटकंतींत तो माझ्या गळयांत असे. तो सवें घेऊनच मीं अक्षरशः काश्मीर ते कन्याकुमारी हा सगळा प्रवास केला होता, हजारों फोटो काढले होते. पण एक तर तो कॅमेरा आतां म्हातारा झाला होता. थोडकी कुरकुर करूं लागला होता. म्हणून तो तसाच कपाटांत ठेवून देऊन मीं नवा घेतलेला पॅंटेक्स ३५ हा कॅमेरा वापरायला काढला होता. त्यानं या सर्वच मंदिरादिकांचं रंगीत चित्रण करावं, असा विचार मनीं उद्‌भवला होता. म्हणून मीं दक्षिण-प्रवासासाठीं बिस्तर बांधलं. सौ. नीरेला पुसतां तीही येत्यें म्हणाली. तिचीही दक्षिणयात्रा झालीच होती, स्वतंत्रपणं झाली होती. पण या भव्य मंदिरांनीं दाटलेल्या दक्षिण-देशाचं दर्शन असंच मोह घालणारं आहे. एकदां पाहून धणी पुरतच नाहीं. म्हणून मग आम्ही दोघं कोल्हापुरीं पावतीं झालों, कारण यात्रा कोल्हापूरपासून निघायची होती.

एवढा वीस-बावीस दिवसांचा प्रवास मोटारीनं करायचा. अल्पपरिचित देश. भाषा निराळी. आपलं नेहमींचं भाजीभाकरीचं जेवणही मिळायचं नाहीं. तेव्हां सारथी तरी चांगला कुशल हवा. ज्या ज्या स्थळीं पोंचायचं आहे, तीं स्थळं त्यानं चार-दोनदां पाहिलीं असलीं पाहिजेत. तो दाक्षिणात्य भाषांचा जाणकार हवा. तमिळ, तेलुगु, मल्याळम् या तिन्ही भाषा त्याला बोलतां यायला हव्यात.

आमचं भाग्य असं, कीं जो वाहनचालक आम्हांस लाभला, तो कुमारम् या सकळ कळांमध्यें प्रवीण होता. उंचापुरा, सांवळा, देखणा, असा तो केवळ या तीनच भाषांत प्रवीण होता, असं नव्हे, तर इंग्रजी, हिंदी आणि मराठीही त्याला कळत असे. तो षड्भाषासंपन्न ड्रायव्हर गेलीं दहा-बारा वर्षं हेंच काम करीत होता. हा सगळा प्रवास त्यानं अनेकदां केला होता. चहा हें व्यसन आतां जगन्मान्य झालं आहे. मुख्यतः ड्रायव्हर म्हटला, कीं तो चहाची लटक अंगीं भिनलेलाच असायचा. दिवसापोटीं त्याला सताठ कप चहा लागायचाच. पण कुमारचं वैशिष्ट्य असं, कीं चहा प्यायला देखील तो कुठं थांबायचा नाहीं. कुशलतेनं वाहन चालवीत तो नेमल्या वेळीं मकाणावर नेऊन हजर करायचा. आतां तसं डावं उजवं, इकडलं तिकडलं थोडसं असायचंच. पण मान्य करायला हवं, कीं सहलीच्या व्यवस्थापनांत थोडा बदल होऊनही कुमारनं हें सगळं आवश्यक तंत्र कुशलतेनं सांभाळलं.

त्याच्या भरंवशावर आमची बस सकाळीं साडे नऊ वाजतां कोल्हापूर सोडून दक्षिणेकडे धावूं लागली, बंगळूरच्या दिशेनं. प्रथम ग्रासे मक्षिकापातः ! कर्णाटक सुरू होतांच चेकनाक्यावर बस थांबली. बराच वेळ गेला. शेवटीं अधिकाऱ्याची मूठ बंद झाली, असं पाहिल्यावरच तिला पुढची गति लाभली !

राजकीय विभागांमधील भेद आणि भाषा, दोन गोष्टी सोडल्या, तर

सगळेच प्रदेश सारखे. काय महाराष्ट्र आणि काय कर्णाटक. तसं या दोन्ही प्रदेशांच एकमेकांवर ऋण आहे. कर्णाटकाचं ऋण? त्यानं महाराष्ट्र ला राजा दिला, आणि देव दिला. शिवाजीराजे पुण्यास बाराव्या वर्षी पावते झाले, ते बंगळूरहून, कर्णाटकांतून. भानुदासानं श्रीपंढरीश पाठीवर वाहून आणला, तो कर्णाटकांतून, विजयनगरहून. आणि महाराष्ट्राचं कर्णाटकावर? विजयनगरच्या राजानं श्री. विठ्ठलाची मूर्ति कर्णाटकांत नेली, ती पंढरपुराहून. शिवरायाचं तें बाळरूप कर्णाटकांतून महाराष्ट्रांत आलं. त्यानं राजगडीं स्वराज्याचं इवलंसं रोप लावलं, त्या मोगऱ्याचा सुगंध थेट कर्णाटक ओलांडून शैल मल्लिकार्जुनापर्यंत, जिंजीवेरीं पोंचला. भाषाभेदावरून तावतावानं भांडणाऱ्या कर्णाटक-महाराष्ट्रिकांनीं कलहास प्रारंभ करण्यापूर्वी हीं एकमेकांचीं ऋणं स्मरायला हवींत!

गाडी उत्तम गतीनं धांवत होती. कर्णाटकांतल्या सडका चांगल्या आहेत. 'पोटांतलं पाणी न हालतां' म्हणजे काय, त्याचा प्रत्यय कर्णाटकांत बहुतांश मार्ग गांवरून धांवतांना येतो. क्वचित् कांहीं स्थळीं महाराष्ट्राचं स्मरण होतं, तो भाग वगळायचा.

तर गाडी धांवत होती—दो बाजूंच्या पिकांमधून. कोल्हापुरापासून दक्षिणेकडे तंबाखू सुरू झाला. म्हणजे ज्वारी होतीच, जोडीला तंबाखू. निपाणी जवळ येऊं लागलं, तसतसा तंबाखूनं सगळ्या रानाचा कब्जाच घेतला जणूं! निपाणीला तंबाखूची भलीथोरली पेठ. तंबाखूसवेंच विड्यांचेही तिथं मोठमोठे कारखाने. म्हणतात, कीं हें दक्षिण अमेरिकेंतलं पीक. पाश्चात्त्य व्यापाऱ्यांसवें तें इकडे आलं. पण पाहतां पाहतां त्यानं हा टापू अगदीं व्यापून टाकला. इथवर, कीं देवादिकांशीं तंबाखूचा संबंध जोडला गेला. तें पीक कबरेएवढ्या उंचीचं. पांडुरंग कर कटावरीं ठेवोनियां उभा आहे, तो त्या रोपट्याची उंची दाखविण्यासाठीं. गणपतीच्या एका अभयकराची अंगुली अंगठ्यासवें जोडली आहे, ती तंबाखू किती

खावा, तें दाखविण्यासाठीं, म्हणजे चिमूटभर. आणि मारुतीनं आपला हात उगारला आहे, तो बजावण्यासाठीं, कीं तमाखुसेवन फार कराल, तर थोबाडींत देईन ठेवून !

गाडी निपाणीमधून पैल निघाली, ती तमाखूचा दरवळ घमामत असतांच. पलिकडे इरगापुरापास वल्लभगड दिसला. गतवर्षींच तो पाहून झाला होता. त्यावर एक खूप खोल विहीर आहे, ती आंत उतरून पाहिली होती.

बाराच्या सुमारास गाडी उभी राहिली, ती कित्तूर चन्नम्माला. तिथं सडकेच्या कडेला वडाच्या झाडाखालीं सगळ्यांचीं जेवणं उरकलीं. मन मात्र कुरकुरत होतं, कीं राणी चन्नम्माचा त्या गावीं असलेला अश्वारूढ पुतळा पाहण्यापुरता वेळ नाहीं, म्हणून. राजाराम महाराज जिंजीला जात असतां या शूर राणीनं औरंगजेबाचं शासन कानाआड करून मराठ्यांना मदत केली होती. औरंगजेबाचे पाश भंवतालीं आवळले असतां निसटून राजाराम, सकुटुंब राणीच्या प्रदेशांत शिरले. राणीनं त्या सर्वांना लपवून ठेवलं. तिजकडे औरंगजेबाचा खलिता गेला, कीं : ‘ राजाराम तुम्हांकडे आला आहे, असें कळतें. तुम्हीं त्याला तावडतोब अबदुल्लाखानासवें इकडे रवाना करावें.’ राणीनं काय उत्तर द्यावं ? तिनं लिहिलं, ‘ राजाराम ? कोण राजाराम ? राजाराम इथें कुणी नाहीं. रूपाजी भोसले आणि कांहीं चिल्लर मराठे अबदुल्लाखानानं पकडले आहेत.’ इतकंच करून राणी थांबली नाहीं. तिनं आपलीं माणसं सवें देऊन राजाराम महाराजांस बोरेनेहळ्ळी, अदुवळ्ळी, वसुधारा या मार्गें जिंजीस पावतं केलं ' हेंही एक कर्णाटकाचं महाराष्ट्रावर ऋण ! एरवीं औरंगजेबावाणी आखाडसासरा डोळे वटारून जाब पुसत असतां राजारामास साहाय्य करण्याइतपत साहस कुणाच्या अंगीं ?

गाडी कित्तूरहून निघाली, तेव्हां राणीचं स्मरण करून एकदां हात जोडले.

आतां तंबाखूच्या जोडीला मिरचीचं पीक आलं. यल्लापुरीं मिरचीचे प्रचण्ड ढीग पाहिले. म्हणतात, कीं हाही वाण भारतीय नव्हे. ज्ञानेश्वरींत मिरचीचा उल्लेख अजिबात नाहीं. त्या काळीं स्वयंपाकांत मिरचीऐवजीं काळीं मिरीं वापरीत. मिरची अशी कानामागून आली अन् तिखट झाली.

पाहतां पाहतां धारवाड मागं पडलं, अन् गाडी हुबळी नगरींत जाऊन उभी राहिली. तिथून कलघटगी नामक सावकारांच्या पत्नी पुत्रासवें आम्हांबरोबर येणार होत्या. आवर्जून त्यांनीं पाचारलं. गाडींतून उतरायचा आळस करीत होतों. तो केला नाहीं, हें बरं झालं. त्यांच्या भव्य प्रासादांत सुंदर ताक तर प्यायला मिळालंच, पण एक नामांकित संग्रहही बघायला मिळाला. रुद्राक्षांवर केलेलं कोरकाम, ढाण्या वाघाचं कातडं, एका तांदळाच्या दाण्यावर कोरलेलीं चित्रं, प्राचीन काळींचे अडकित्ते, असं काय काय त्या सावकारांनीं मोठ्या हौसेनं जमवून ठेवलं होतं.

हुबळीहून निघालों, ते मैलच्या मैल पार करीत रात्रीं साडे आठ, नऊला दावणगिरीस पोंचलों. तिथं रात्रिभोज. पुनः गाडी निघाली. रात्रींच्या प्रवासांत मला झोंप येऊं शकत नाहीं. तसा थोडा पेंगतों, पण ते पेंगणंही सावध असतं. इतर सहप्रवासी मात्र चक्क घोरत होते. मध्यरात्र उलटून गेली, तरी गाडी धांवतच होती. शहरांमागं शहरं मागं पडत होतीं. विद्युद्दीपांचा लखलखाट दिसूं लागला, कीं आशाळभूत मन म्हणे, हें बंगळूर बरं का! पण तो झगमगाट मार्ग सोडून गाडी पुढं धावूं लागे. शेवटीं एका विद्युद्दीपांकित नगरींत कुमारनं गाडी उभी केली, अन् म्हणाला, बंगळूर

आ गया ! घड्याळांत पाहिलं, तर तीन वाजले होते !

गेल्या कित्येक वर्षांत मोटारनं इतका दीर्घकाळ प्रवास केला नव्हता. अगदीं थकून गेलों.

बंगळूरला महाराष्ट्र मंडळांत उतरायची व्यवस्था होती. सामान्यपणं नगराच्या मध्यभागीं भलं प्रशस्त सभागृह आहे. शौचकूप, नहाणीघरें. सभागृहांत गाद्या टाकलेल्या होत्या. स्वच्छता चांगली होती. सगळ्यांनीं पटापट एकेका गादीवर कब्जा केला. आतां झोंपण्यांत कांहीं अर्थ नव्हता. प्रातःकर्म उरकेनोंवर पांच. साडेपांच वाजले. बाहेर येऊन उभा राहिलों. हळूंहळूं तांबडफुटी झाली, बंगळूरचं दर्शन घडूं लागलं.

बंगळूर. एक प्रसन्न. सुखद हवा असलेली नगरी. मराठ्यांना त्या नगरीविषयीं जवळीक वाटावी, असं बरंचसं इथं घडून गेलेलं. शाहाजीराजांचा इथं प्रचण्ड प्रासाद होता. विजापूरच्या इदलशाहीचं अंकितत्व केवळ नांवापुरतं. एरवीं ते या भागाचे अधिपतीच होते. हे सगळं नोंदून ठेवलं आहे कवि जयराम पिंड्ये, यानं. शहाजीराजांची संस्कृतिसंपन्नता, औदार्य, शौर्य, इत्यादि गुणांचं श्रवण करून —

कः अपि महाराष्ट्रदेशात् आगतः जयरामः नामा महाकविः द्वादशभाषाकवीश्वरः प्रभुदर्शनाकांक्षी तिष्ठति ।

सप्तशृंगीजवळील मार्कंड्या डोंगराखालीं कवीचं गांव. पित्याचं नांव गंभीरराव. असा हा कवि शाहाजीराजांचं दर्शन घेऊन आपलं काव्य त्यांना ऐकवावं, या हेतूनं बंगळुरास येता झाला. राजांची अनुमति मिळतांच तो त्यांच्या राजसभेंत आला, आणि त्यानं त्यांच्यासमोर बारा नारळ ठेवले ! विस्मयानं राजांनीं पुसलं, कीं हे बारा नारळ कशासाठीं ? कवि म्हणाला,

द्वादशभाषासु संस्कृत—प्राकृत—गोपाचलीय—गुर्जर—बक्तर—ढुंढार—

पंजाब–हिंदुस्थान–बग्गुल–यावनी–दाक्षिणात्य–कार्णाटकी—

इतक्या भाषा मला अवगत आहेत! यांपैकीं कुण्याही भाषेंत मी काव्य करूं शकतों!

राजा शाहाजींनीं त्याच्यापुढं एक समस्या मांडली:

शतचन्द्रं नभस्तलं।

क्षण न लागतां कवीनं समस्यापूर्ति केली:

या प्रीतिः जायते शाह मुखचन्द्रं निरीक्ष्य ते।
पश्येयं चेत् न सा प्रीतिः शतचंद्रं नभस्तलम्॥

राजा, तुझा मुखचंद्र पाहून जे समाधान लाभतं, तें नभातळींचे शत-शतचंद्र पाहूनही लाभत नाहीं!

राजे प्रसन्न झाले, हें सांगायची गरज नाहीं.

राजांचं वर्णन करतांना तो म्हणतो,

जगदीश विरंचिकु पूछतु है कहो शिष्टि रची रखे कौन कहाँ
कर जोरि कही जयराम विरंच्यै हैं तिरिलोक जहाँ के तहाँ
ससि औ रवि पूरब पच्छिमलौं तुम सोय रहो खिरसिंधु महा
अरु उत्तर दच्छन रच्छनको इत साहजु है उत साहिजहाँ॥

परमेश्वरांनीं ब्रह्मदेवाला विचारलं, कीं तूं सृष्टिरचना केलीस, तर रक्षणासाठीं कुणाकुणाची कुठं कुठं योजना केलीस? कवि जयराम म्हणतो: त्रैलोक्यांत सगळी सुव्यवस्था आहे. पूर्वेस रवीची योजना, पश्चिमेस चंद्र. दक्षिणदेशीं शाहाजीराजे नेमिले आहेत, उत्तरेस शाहाजहाँ! तेव्हा आपण क्षीरसिंधूचे परिसरीं सुखेनैव निद्रा करावी!

कवीनं लिहिलं आहे, कीं राजाच्या पदरीं सुमारे पन्नास विद्वान आहेत!

जिजाऊसाहेबांविषयीं त्यानं म्हटलं आहे:

जशी चंपकेशीं खुले फुल्लजाई
भली शोभली ज्यास जाया जिजाई ॥

—आणि शिवरायांविषयीं तो म्हणतो :

टिकेचा धणी लेक ज्याचा शिवाजी
करी जो चहूं पातशाहांसि वाजी ॥

घोड्यांप्रमाणं ज्यानं आपल्या पराक्रमानं चारी पातशाह्यांना नेहमीं धांवडवत ठेवलं आहे !

कवि शाहाजीराजांची दिनचर्या वर्णितो :

पाहाटेस शेजघराजवळ शाहीर आणि भजनकरी सुस्वर भजनें करीत, त्यानें राजा जागा होई. तोंवर विश्वनाथभट्ट संस्कृत प्रातःस्मरण म्हणत. कित्येक वैदिक वैदिक पुण्याहवाचन म्हणत. राजा शेजघरांतून बाहेर येऊन आकाशदर्शन करी. नंतर देवतादर्शन आणि दिशावलोकन. याच वेळीं जंगम शंख वाजवीत, गुरव शिंग फुंकीत असे, चौघडा वाजूं लागे. नंतर ऐरावत, सवत्स धेनु, इत्यादि शुभचिन्हसूचक प्राणी राजासमोरून जात. तोंवर वाड्याबाहेरील पटांगणांत घोडेस्वार कवाईत करीत. राजा त्यांचें निरीक्षण करी. एखादा सिंहाचा छावा किंवा माजलेला पोळ राजासमोर आणला जाई. नंतर ध्वजदर्शन करून राजा परतत असे, तंवर वैद्य येऊन राजाची प्रकृती पाही. नंतर स्नानादि प्रातःकर्मे उरकून राजा नवगजींत प्रवेश करी. नवगजी म्हणजे राजसभा. तिथें संस्थानिक, राजनीतिज्ञ, पंडित, कवि, शास्त्री, आदि उपस्थित असत. मग राजकारणावर शिक्कामोर्तब होत असे.

दोन प्रहरीं वेदान्तचर्चा, काव्य-शास्त्रचर्चा, दानधर्म, पंगूंचा परामर्श, न्यायदान, जेठींचीं मल्लयुद्धें, इत्यादींमध्यें राजाचा काळ व्यतीत होई.

सायंकाळीं मुत्सद्द्यांसवें गुप्त चर्चा चालत.

असा शाहाजीराजांचा दैनंदिन कार्यक्रम ज्या प्रासादांत चालत असे, तो प्रासाद कुठें होता, त्याचा पत्ता कांहीं मला लागला नाहीं. या वेळींही नाहीं, मागीलवेळीं हातीं भरपूर वेळ होता, प्रयत्नही केला. तरी शोध लागूं शकला नाहीं. होदेगिरी हें शाहाजीराजांचं मृत्युस्थळ इथून जवळ. तिथंही जानां आलं नाहीं.

एक स्मरण तीव्रतेनं झालं. 'स्मरणगाथे'ला अकादमी पारितोषिक मिळालं, त्या प्रसंगाचं. समारंभ बंगळूरलाच झाला. माझे भाचे प्रा. शंकर लेले बंगळुरीं असतात, त्यांच्याकडे उतरलों होतों. समारंभांत मला तीन मिनिटं बोलायचं होतं. मी मंचावर जाणार, तों माझे मित्र प्रा. तोरो घाईघाईनं मजपास आले. म्हणाले, आप्पा, तुम्हीं प्रारंभ कानडी वाक्यांनीं करावा. तें इथल्या लोकांना फार आवडेल. मीं म्हटलं, बाबा, रे, मला एकच कानडी वाक्य येतंः

ननगे कन्नड बरुदिल्ला !

मला कानडी येत नाहीं !

तोरो कसले ऐकायला ! त्यांनीं मला वाक्यं लिहून दिलीं. अर्थ कळत नव्हता, तरी मीं तीं उच्चारलीं. तक्षणीं सगळा मंडप तालिकाघोषानं गदगदून उठला.

वाक्यं अशीं होतीं :

अध्यक्षरी, मत्तु कन्नड बांधवरी !

मराठी वतियंदी यल्लरिगु नमस्कारा !

नंतर अर्थ कळला, तो असा :

अध्यक्ष महोदय आणि माझ्या कर्णाटक बांधवहो ! मराठीचा प्रतिनिधि म्हणून मी तुम्हां सर्वांस नमस्कार करीत आहें !

असं तें बंगळूर. तिथली लालबाग. विधिमंडळभवन, ज्याचे दरवाजे चंदनाचे आहेत! एक लक्षांत राहिलेली गोष्ट, म्हणजे तिथलं लालबागे-जवळचं मावाली क्षुधाशांतिभवन. त्या उपाहारगृहांत प्रवेश मिळविण्यासाठीं रांग लावावी लागते. अत्यंत स्वच्छ, उत्तम खाद्यपदार्थ मिळणारं दाक्षिणात्य पद्धतीचं तें उपाहारगृह बंगळूरचं जणू भूषणच!

संध्याकाळपर्यंत बंगळूर पाहिलं. सताठ रिळं रंगीत फिल्मची खरेदी केली.

बंगळूरला मराठी मंडळ आहे, त्याचे सभासद सायंकाळीं भवनांत एकत्र झाले, त्यांशीं बोललों. माझे मित्र श्री. कमलाकर प्रधान हे बंगळूरला एक आइसक्रीम फॅक्टरींत जनरल मॅनेजर आहेत, ते घरीं न्यायला आले. त्यांच्यासवें आम्ही दोघें बंगळूरहून १०।१२ किलोमीटर असलेल्या त्यांच्या घरीं मुक्कामास गेलों. ते आणि त्यांच्या पत्नी-दोघांचाही माझ्या साहित्यावर लोभ. तेव्हा साहित्यविषयक गप्पा करीत जेवण झालं. पाहाटे त्यांनीं त्यांच्या गाडीनं आणून महाराष्ट्र मंडळांत पोचवलं.

दि. १२ ला पाहाटे बंगळूरहून निघालों, ते तिरुपतीकडे.

आता मात्र प्रदेशाच रूप बदललं. तंबाखू-ज्वारीचा प्रदेश मागं राहिला, अन् माडांचा आणि भाताचा प्रदेश सुरू झाला. बंगळूर भारताच्या दक्षिण-पश्चिमेकडे आहे. तिथून आतां आम्ही पूर्वेकडे निघालों होतों. भंवताले टेकड्या दिसूं लागल्या. मात्र त्या महाराष्ट्रिक टेकड्या नव्हेत. महाराष्ट्रिक टेकडी ही बहुधा एकसंध काळसर खडकाची असायची. वरच्या पट्टयांत मुरूम. अगदीं वरचा थर मातीचा. त्यावर उगवणारं गवत, आणि तरवड, घाणेरी, कांडेसावर, येकळी, टाकळी, अशीं झुडपं, काहीं दगडाळ टोळ, हें महाराष्ट्रिक टेकडांचं स्वरूप. दक्षिणे-

कडल्या टेकड्यांचा खडक भुरक्या रंगाचा. वरतीं मुरूम नाहीं. अर्थातच मातीही नाहीं. लहान–मोठे खडक मात्र इथं तिथं पसरलेले. मोठाले म्हणजे भलेमोठाले. क्वचित् कुठं टेकडी म्हणजे असल्या लहानमोठ्या खडकांची जणूं रासच. जिंजीला तीन उपदुर्ग आहेत. चांद्रायणदुर्ग, राजगिरि आणि चंद्रगिरि. तिन्हींचं स्वरूप असलंच. जणूं निसर्गानं कवतिकासाठी भल्या थोरल्या धोंड्यांच्या या तीन राशीच इथं रचून ठेवल्या आहेत !

तर अश्या त्या टेकड्या. तळाशीं आकाशांत आपल्या झावळ्यांच्या चवऱ्या मिरवणारे माड. भाताचीं खाचरं. त्यांत तुडुंब पाणी, आणि हिरवकंच भात. असं मोठं देखणं रूप लेऊन सृष्टी आम्हांस सामोरी आली. टेकड्यांचा आकार वाढूं लागला. क्वचित् कुठं तालवृक्ष दिसूं लागले. दुपारीं दोनच्या सुमारास टेकड्यांनीं डोंगररांगेचं रूप धरलं. एका डोंगर-रांगेच्या तळाशीं बस उभी राहिली. घोषणा झाली, कीं तिरुपति आलं आहे.

होय, तिरुपति ! डोंगराच्या कुशींत देवस्थाननिर्मित महाविद्यालयाचा प्रचंड विस्तार आहे. या महाविद्यालयामध्यें बालपणींचे मित्र डॉ. सुरेन्द्र बारलिंगे तत्त्वज्ञान शिकवीत असत. त्यालाही झाली पंचवीस वर्षं. त्यांनीं अगत्यानं पाचारिलं होतं. एका पाहाटेस त्यांच्या दारीं जाऊन उभा ठाकलों होतों.

डॉ. सुरेन्द्र बारलिंगे हा एक पुरुषविशेष आहे. त्यांना बोलतं करण्याची एक सोपी युक्ति ध्यानीं आली. म्हणावं, कीं तार्किक प्रमाणं मानतात, तीं प्रमाणं तर्काच्या निकषावर टिकणारीं नाहींत. म्हणजे मग तासादोन तासांची निचिंती. तुम्ही जांभया द्या, पेंगूं लागा. सर कांहीं त्या संपूर्ण विषयाची चीरफाड करून तुमच्या गळीं तो विषय उतरवायची धडपड करण्यांत कसर करायचे नाहींत. त्यांच्याकडे एका दाक्षिणात्य

गायकानं गाइलेली मोठी मधुर ध्वनिमुद्रिका होती. आपण ती ध्वनिमुद्रिका यंत्रावर चढवावी, आणि सरांना पिन करून द्यावी. म्हणजे मग दोन तास तोंड उघडायची गरजच नाही.

त्या वेळीं सताठ दिवस बारलिंगे वहिनीच्या हातचं अन्न भक्षिलं होतं. एकटाच गळ्यांत कॅमेरा लटकावून तिरुमलैचा डोंगर चढलों होतों. सडकेनं नव्हे, पायऱ्या बांधल्या आहेत, त्यांवरून. तसाच उतरलो होतों. भगवान् बालाजीचं धर्मदर्शन केलं होतं. इतकी सुंदर कृष्णपाषाणाची ती मूर्ति, पण तिच्या डोळ्यांवर मात्र पट्टी असते! अत्यंत श्रीमंत देवस्थान. कदाचित् गुजरातेतलं नाथद्वारा मंदिरच त्याशीं तुळतां येईल. देवळाच्या एका पाळ्यांत धर्महुंडी आहे. एक भला थोरला हंडा. त्याच्या मुखावर चहूं बाजूंनीं बंद असं एक कापड गुंडाळलेलं. वरच्या दिशेस मोकळं. त्यांत हवं तितकं द्रव्य टाका. कुणाला कळायचं नाहीं. त्या धर्महुंडीत बालाजीचे भक्त द्रव्य, अलंकार, हुंड्या–काय इच्छेस येईल, तें श्रीबालाजी-चरणीं समर्पित करीत असतात. कधीं त्या हंड्यांत लाख लाख रुपयांच्या नोटाही आढळतात. रोज रात्रीं ती हंडी रिती करून, द्रव्य मोजून त्याचा हिशेब ठेवला जातो. प्रचण्ड देवालय. वळणावळणाची बारी. धर्मदर्शन म्हणजे मुक्त दर्शन. कांहीं द्यावं घ्यावं लागत नाहीं. यावेगळे निरनिराळे भोगपूजाविधी आहेत. पांच रुपयांपासून पांचशे रुपयांपर्यंत. कार्यालयांत देवाच्या चरणीं कुठली पूजा समर्पित करू इच्छितां, तें नोंदा. पैसे द्या. पावती घ्या. ती दाखविली, कीं ते ते विधी करतां येतात. सगळं आखीव. आमच्या पंढरीच्या पांडुरंगासारखं गरीबगुरिबांचं देवस्थान नव्हे तें. त्या देवस्थानाच्या विद्यमानं चालणारीं पांच–सात महाविद्यालयं आहेत. वेद-पाठशाळा आहेत. असा तो देव चांगला गडगंज श्रीमंत आहे.

आणखी एक विशेष, जो अन्यत्र कुठंही आढळला नाहीं. त्या देवाला

स्त्रिया आपला संपूर्ण केशभार समर्पित करतात ! नापितांसाठीं एक भलं थोरलं दालनच आहे. स्त्रियांचं आपल्या सुंदर केशकलापावर किती प्रेम ! त्यासाठीं सुगंधी शिकेकाई. निरनिराळ्या प्रकारची सुगंधी तेलं. आवळेल. खोबरेल. माक्याचं तेल. ती तेलं माखा. नीट हररोज ते विंचरा. वेण्या घाला. आंबाडे बांधा. त्यांत नाना प्रकारच्या सुगंधी पुष्पांच्या वेण्या आणि गजरे घाला. असा आपल्या भल्याथोरल्या केशांचा ज्या स्त्रियांना गर्व, तो केशभार खुशाल न्हाव्यासमोर बसून त्या मुळापासून उतरवून देवाला वाहतात, आणि आपलीं तासलेलीं डोकीं मोठ्या डौलानं मिरव-तात ! आतां करावं तरी काय !

तर तें देवस्थान गेल्या खेपेस डोळेभरी पाहिलं होतं. वरतीं डोंगरावर बालाजी. खालीं तळांत पद्मावती.

या बालाजीच्या चरणीं माझी आणखी एक बारीकशी सेवा रुजू आहे. आपल्या लता मंगेशकर—त्यांना देवस्थानानं 'आस्थान गायिका' ही पदवी देण्याचं ठरवलं. त्यासाठीं तिथं तिरुपतीस जाऊन त्यांना 'श्रीवेंकटेश्वरचलपते तव सुप्रभातम्' ही श्लोकमाला म्हणायची होती. हृदयनाथ मंगेशकरांचं पत्र आलं. मुंबईस गेलो. पांच-सात दिवस लताबाईंना त्या श्लोकमालेची संथा दिली. माझे शब्द. बाळाचं संगीत. त्यांचा गळा. असं घेऊन त्या तिरुपतीस गेल्या. तिथं देवासमोर सुप्रभातम् गाइल्या. ती पदवी आणि देवाचं महावस्त्र घेऊन परतल्या.

त्याच मुक्कामांत एकदां बारलिंगे कुटुंबाबरोबर डोंगर चढून गेलों होतों. वरतीं भक्तांनीं बांधून श्रीचरणीं समर्पित केलेलीं छोटीं छोटीं घरकुलं आहेत. सर्व सोईंनीं युक्त. अगदीं नाममात्र भाडं देऊन भक्तांना तिथं चार-



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ............

सहा दिवस राहतां येतं. पैकीं एक घरकुल घेऊन वर राहिलों होतों. रात्रीं घरकुलाबाहेर बसून सरांशीं गप्पा मारल्या होत्या. पाहाटेस मंदिराच्या प्राकारांत सुब्बालक्ष्मीच्या स्वरांत स्वच्छ, दाणेदार सुप्रभातम् ध्वनिमुद्रित केलेलं, तें प्रतिदिनीं वाजवलं जातं. तें अंथरुणावर पडल्या पडल्या ऐकलं होतं.


अर्थ असा, कीं तिरुपति मला नवं नव्हतं.

त्या तिरुपतिच्या तळाशीं बस उभी राहिली. डोंगर चढून वर जावं लागतं. डोंगरावर लहान गाड्यांना परवानगी आहे, मोठ्या बसेस्‌ना प्रवेश निषिद्ध आहे. संस्थानची बससर्व्हिस आहे. प्रवेश निषिद्ध काय म्हणून, तें चढतां उतरतांना ध्यानीं आलं. सर्वत्र जशी, तशी इथंही रांग. इथंही कठडे. त्या चक्रामधून पार जाऊन बसमध्यें जागा मिळवली. गाडी भरतांच डोंगराकडे निघाली.


इतके दिवस म्हणत होतों, की भोरमार्गे महाडकडे जाणारा वरंधघाटच दुर्गम आहे. 'हेअरपिन कर्व्हज्' या सार्थ नावानं ओळखतां येतील, अशी तीन वळणं त्या घाटांत आहेत. जे चालक गाडी तिथं थांबवून मागं न घेतां एकाच वेळीं तें वळण ओलांडून पलिकडे जातात, त्यांच्याविषयीं मनीं मोठा आदर होता.

पण तिरुमलैकडे चढत असतां इथं अत्यंत कौशल्यानं या देशींच्या ड्रायव्हरांनीं मार्गांतलीं दहा–वीस अगदीं तशींच वळणं सहजपणं जेव्हां पार केलीं, तेव्हां त्यांना भलेभले म्हटलं–मनांतल्या मनांत. इथल्या ड्रायव्हरांना मराठी कळत नाहीं.


वर पोंचलों. भलं प्रचंड मंदिर. गाभारा, सभामंडप, यांवेगळे कितीतरी भाग. अनेक दालनं, तीं सभामंडपाला जोडलेलीं. जागोजाग वैभवाच्या खुणा. प्राकाराबाहेर एक धिप्पाड हत्ती झुलत असलेला. दर्शनेच्छूंच्या



हत्तींची माळ



सेवेसी उभा गरुड




टिपूची समाधी

निरनिराळ्या रांगा. कुठल्या रांगेंत जाऊन उभं राहावं, हें ध्यानीं येईना. एक जरा कमी गर्दी असलेली रांग पाहिली, आणि तिच्यांत घुसूं लागलों, तों शिपायानं अडवलं. पास मागूं लागला. तेव्हां कुठं ध्यानीं आलं, कीं ही प्रत्येकीं पंचवीस रुपये देणाऱ्या दर्शनेच्छूंची रांग आहे! माघारा वळलों.

पण आमची बायको हुशार. धर्मदर्शनाची रांग कुठं सुरू होते, तें तिनं बरोब्बर शोधून काढलं. प्राकाराच्या बाहेर कितीतरी लांब, एका पुष्करिणीच्या पलिकडून ती सुरू होत होती. माहीतगार दर्शनेच्छू भरा-भरा त्या रांगेंत जाऊन हळूंहळूं रांग सरेल, तसे पुढं सरत होते. बायको-मागं मीही त्या रांगेला शरण गेलों. फार वेळ ताटकळावं लागलं नाहीं. अनेक वळणं आणि वळसे घेत आमची रांग गर्भगृहाकडे सरत होती. आम्हीही पोंचलों.

खूप विचार करतां ध्यानीं आलं, कीं ही रांग लावणं—जिला पंढरपूर-आळंदीला बारी म्हणतात— हा हजारों दर्शनेच्छूंना देवाचं दर्शन घडविण्याचा एकमेव मार्ग आहे. हे हजारों लोक देवदारीं गर्दी करून आंत घुसूं लागले, तर अनर्थ होईल. अशक्त चेंगरतील. मरतील. धटिंगण पुढं जातील. खिसेकापूंची ती दसरा—दिवाळी होईल.

दक्षिणेकडील मंदिरांमध्यें आणखी एक विशेष आढळला. तो असा, कीं सभामंडप, त्याच्या लगतचीं दालनं, इत्यादि स्थळीं विजेच्या दिव्यांची उत्तम व्यवस्था. मात्र गर्भगृहांत, दर्शनीय मूर्तीजवळ केवळ तुपाचे मंद दिवे. तिथं भगभगाट नाहीं.

वेंकटेश दिसला. ती शांत, सौम्य, प्रसन्न मूर्ति दिसूं लागली. डोळ्यां-वर आवरण असलेली. हिरेजडित मुकुट ल्यालेली. या स्थळीं पंढरपुरासारखी हडहड नाहीं. चला, पुढं सरा, घोटाळूं नका, असा ओरडा करणारे बडवे इथं नाहींत. आपल्या गतीनं रांग सरत देवापास पोंचली. मात्र पंढरीशा-

सारखं इथं प्रत्यक्ष मूर्तीच्या चरणांवर मस्तकही ठेवतां येत नाहीं. देवाला उराउरीं भेटतां येत नाहीं, एका विशिष्ट मर्यादेपलिकडे थांबावं लागतं. दक्षिणेकडील सर्वच मंदिरांमध्यें ही प्रथा. चरणदर्शन कुठंच नाहीं. पुजाऱ्यांपलिकडे अन्यांस प्रत्यक्ष मूर्तीपाशीं जातां येत नाहीं. आणि या नियमाला कसलाही अपवाद नाहीं. अगदीं राष्ट्रपति जरी दर्शनास आला, तरी वैष्णव मंदिरांमध्यें त्याला, इतर दर्शन घेऊं शकतात, तिथंच थांबावं लागणार. हां, शिवमंदिरांत प्रत्यक्ष लिंगापर्यंत जातां येतं, पण त्याहीसाठीं नियम आहेत. विजार नेसून इथं कुणासच प्रवेश नाहीं. अंगांत अंगरखाही निषिद्ध आहे. स्त्रियांना हा नियम लागू नाहीं. त्या मुक्त मनानं, अंगावरील वस्त्रांनिशीं थेट गाभाऱ्यांत पोंचूं शकतात. पुरुषांनीं मात्र सदरे, शर्ट काढून उघडं झालं पाहिजे, आणि कमरेखालीं धोतर नेसलं पाहिजे, लुंगी तरी लावली पाहिजे. आणि ज्यांपास लुंगी नसेल, त्यांना तेवढ्यापुरत्या लुंग्या, भाडं दिलं, कीं मिळूं शकतात.

शांतपणं देव पाहिला. डोळेभरी पाहिला, असं नाहीं म्हणतां येणार. पण मागं कुणाची भुणभुण नव्हती. मग बाहेर पडलों. मागील वेळीं सभामंडपाच्या बाहेर तिरुपति देवस्थानाचा प्रसाद म्हणून भलाथोरला बुंदीचा लाडू दाम देऊन घेतला होता. उत्तम तुपांत तळलेल्या बुंदी. बेदाणे. असा संपन्न प्रसाद. याही वेळीं तो मिळाला. पण आतां थोडं अधिक द्रव्य द्यावं लागलं, आणि प्रसादाचा स्तरही किंचित् उणावला असावा.

परततांना बसच्या तिकिटांसाठीं पुन: बारी. सगळे सहप्रवासी पांगलेले. मग त्यांची वाट न पाहतां तिकिटं हस्तगत केलीं, आणि बसमध्यें जागा मिळविली. बस खालीं उतरत असतां इतर बसेस्‌ना वर कां येऊं देत नाहींत, तें कळलं. परती प्रवासाचीं वळणं अधिक बिकट आहेत. खूप आहेत. वर चढायची वाट वेगळी. खालीं उतरायची वेगळी. मार्गाचा परिचय नसलेल्या बसचालकांना या वाटेवर येऊं दिलं असतं, तर रोज कमींत

कमी एक बस तरी उलटून अपघात झाले असते.

तळांत आमची बस उभी होती, तिथं पोंचलों, तों कळलं, कीं फार थोडे प्रवासी नेमल्यावेळीं हजर आहेत, संध्याकाळ होऊन गेली आहे. तेव्हां आतां जागा मिळेल, तिथं मुक्काम करावा लागणार. पुढील प्रवास सुरू करतां येणार नाहीं.

रेल्वे-स्टेशनसमोर एक भली प्रचंड धर्मशाळा. केवळ नांवं नोंदवावीं लागतात. भाडं पैही द्यावं लागत नाहीं. मग धर्मशाळेंत रात्रींचा मुक्काम केला, अन् पहाट फुटतांच सगळ्यांचे बिस्तरे—बाकसं गाडीवर चढवून शिवकांचीच्या दिशेनं निघालों.

•

एक अनुभव वारंवार स्मरत राहिला. रात्रीं आमच्या सामूहिक भोजनास उशीर होता. तेव्हां आमचे रामभाऊ सोमण एका मारवाडी खानावळींत घेऊन गेले. जेवणार होतों आम्ही दोघंच. सोमण केवळ पथप्रदर्शक. वाढप्यानं दोन थाळ्या आणून मांडल्या. जेवण रुचकर होतं. रामभाऊ गप्पा मारीत बसले. वाढप्यानं पुसलं, आप नहीं भोजन करेंगे ? रामभाऊ थट्टेनं म्हणाले, अरे भाई, पैसा नहीं है। यावर वाढप्यानं काय म्हणावं? म्हणाला, आप भोजन कर लीजिये, पैसा कौन माँग रहा है ? आमच्या जेवणाचे पैसे देतांना त्या मुलाला मुद्दाम पाचारलं. धन्याला सगळं वृत्त सांगितलं. मुलाच्या पाठीवर शाबासकी दिली.

दिनांक तेराच्या पहाटेस बस भरधांव शिवकांचीच्या दिशेनं निघाली. चालक कुमारला सगळे रस्ते पाठ. कुठंही थांबावं पुसावं न लागतां त्यानं सकाळीं साडे नऊच्या सुमारास बस नेऊन शिवकांचीमध्यें उभी केली.

शिवकांची—विष्णुकांचीविषयीं माझ्या मनीं भ्रम होता. वाटलं होतं, कीं हीं दोन नगरं एकएकापासून दहा—वीस मैल दूर आहेत. पण प्रत्यक्ष

पाहिल्यावर कळलं, कीं एकाच प्रचंड नगराचे हे दोन भाग आहेत. भ्रम निर्माण झाला होता त्या दोन नगरांविषयींच्या एका प्रसिद्ध कथेनं.

कथा अशी :

शिवकांचींतले सगळे नागरिक कट्टर शैव. कपाळावर आडवं भस्म लावणार. कुणी घरीं आहे का, अशी चौकशी करूं गेलं, तर मान आडवी हलवून 'आहे' असं म्हणणार. चालणार देखील आडवेच! त्याउलट विष्णुकांचीमध्यें गंध उभं. कुणी घरीं नाहीं, असं सांगतांना मान देखील आडव्याऐवजीं उभी हलवणार. भुई सारवणार उभी. सगळे व्यवहार तिथं उभे व्हायचे!

एकदां कधींच्या काळीं विष्णुकांचींतली एक कन्या शिवकांचीमध्यें दिली. पिता तिला सासरीं पोंचवायला गेला. व्याह्यांनीं आग्रह केला, कीं जेवून जावं! हा म्हणाला, छे! माझ्या दैवताची पूजा केल्याविना मी मुखीं पाण्याचा थेंबही घेत नाहीं. आली का पंचाईत! शेवटीं व्याह्यांना एक युक्ति सुचली. ते म्हणाले, आमच्या शेजारीं एक दत्तमंदिर आहे. त्या त्रिमूर्तींमध्यें एक मस्तक आपल्या देवतेचं. त्याची पूजा करून आपला नियम पूर्ण करावा. गृहस्थानं तडजोड मान्य केली. पूजेचं सामान आलं. त्यानं असा एवढा कापूस मागितला. व्याह्यानं कुतूहलानं पुसलं, कापूस कशासाठीं? बाणेदार गृहस्थानं उत्तर दिलं, मी पूजेंत उदबत्ती पेटवीन. तो धूर देखील तुमच्या दैवताच्या नाकांत जातां कामा नये. तेव्हां त्याच्या नाकांत खुपसण्यासाठीं!

असो, आम्ही शिवकांचींतल्या शिवमंदिराकडे निघालों. तसंच प्रचण्ड मंदिर. भला प्रशस्त प्राकार. मंदिराबाहेर शाहाळीं. आधीं शाहाळीं प्यालों, आणि नंतर मंदिरांत शिरलों. एक दर्शक गांठला. तो तपशीलवार सगळं सांगूं लागला. शिवदर्शनानंतर त्यानं एका भल्या प्रचण्ड आम्रवृक्षातळीं

नेऊन उभं केलं. त्याच्या भंवताली प्रशस्त पार बांधला आहे. म्हणाला, या आंब्याला चार निरनिराळया चवींचे आंबे लागतात. चारी वेदांचं तें स्मरण-चिन्ह आहे. खालीं पडलेलं त्या वृक्षाचं एक पान उचललं आणि खिशांत टाकलं.

दक्षिणेंतील देवळांचा आणिक एक विशेष, त्यांचीं वर निमुळतीं होत गेलेलीं गोपुरं. त्यांवर हजारों मूर्ती. अतिशय देखण्या. बहुधा मवच गोपुरं हीं मुख्य देवळापेक्षां अधिक उंच.

देवळाची भव्यता अनुभवून विस्मय करीत आम्ही सगळे बसमध्यें बसलों, आणि त्याच नगरींतल्या, कांहीं अंतरावरील विष्णुमंदिरापास पोंचलों. पुन: तसंच तें भव्य गोपुर. तसाच भव्य परिसर. या परिमराचा विशेष असा, कीं मंदिराबाहेर डाव्या हाताम एक भव्य. मदिरावेगळी चौखांबी, आणि मंदिरांत एका वेगळ्या भागांत असलेली, छतावर लटकावलेली सोन्याची पाल !

आम्ही सगळीं आंत शिरतांच नागभूषणम् नामक एका दर्शकानं आमचा ताबा घेतला. ' इकडे या ' अशीं चार–दोन मराठी वाक्यं त्याला पाठ. मोठा चटपटीत दर्शक. त्यानं आम्हांला आधीं देवळाशेजारच्या चौखांबींत नेलं. शेकडों मूर्तींनीं गच्च दाटलेली ती चौखांबी म्हणजे एक नवलच. कांहीं दगडी स्तंभ असे, कीं त्यांवर टिचकी मारतांच त्यांमधून निरनिराळे स्वर उमटतात ! हेंही एक दक्षिणेकडील देवळांचं नवल आहे. नागभूषणम्नं एक स्तंभ दाखवला, त्याच्या दोन बाजवांना दोन पशू कोरलेले. हत्ती आणि बैल. दोघांचीं तोंडं एकत्र झालेलीं, मात्र तीं दोन नव्हे, तर एकच ! एकच मुखामध्यें दोघांच्याही मुखांचा आभाम !

त्यानंतर एका घोड्यावर दोन स्वारांचीं धडं. एक राजपूत, एक दाक्षिणात्य !

नवल करावं तरी किती ! खरोखरी हीं दक्षिणेकडील मंदिरं सवडीनं,

चांगला भरपूर वेळ खर्चून पाहायला पाहिजेत. पण उपाय काय! नागभूषणम् आम्हांला पळवीत होता, आम्ही त्यामागें पळत होतों!

ती सोन्याची पाल पाहायलाही तिकीट!

शिवमंदिरासारखंच प्रशस्त, ऐसपैस विष्णुमंदिर पाहून गाडींत बसलों, आणि ती वेदान्तंगलच्या दिशेनं धावूं लागली.

माडांची दाटी उणावली. रूक्ष प्रदेश सुरू झाला. वळणं—वाकणं पार करीत गाडी एका आडरस्त्याला लागली आणि एका इमारतीसमोर उभी राहिली. ती होती वेदान्तंगल पक्षि-अभयारण्याचं रेस्टहाउस.

उतरलों. सामान लागीं लावलं. जेवणं उरकलीं. थोडे डुकललों, आणि तिथून अदमासें दोन किलोमीटर असलेल्या अभयारण्याकडे चालू लागलों. माझी दुर्बीण मजबरोबर होती, हें केवढं भाग्य!

अभयारण्य जवळ येऊं लागलं, तों ध्यानीं आलं, कीं आकाशांतून बाणाच्या टोकासारख्या रचना करीत पक्षी समोर कुठं तरी उतरताहेत. ते पक्षी एरवींचे नव्हेत. बगळे नव्हेत, घारी नव्हेत, गिधाडं नव्हेत. हां, नर्मदातीरीं सारस पाहिले होते, तसे हे पक्षी दिसताहेत. आग्र्याला एकदां आकाशांत हजार, दोन हजार पोपट एकीकडून दुसरीकडे भराऱ्या मारीत, किलकिलत जात असलेले पाहिले होते, तसे हे पोपटही नव्हेत. पाऊल उचलून चालू लागलों, तों ध्यानीं आलं, कीं एका तळ्याकडे आपण चाललों आहोंत. झपाझपा तळ्याचा कांठ गांठला, आणि पाळीवर चढून उभा राहिलों. जें दिसलं, त्यानं केवळ मुग्ध होऊन गेलों!

तळ्यांत शेशंभर झाडं आहेत. छोटीं छोटीं वेटं, त्यांवरही झाडं. उंच नव्हेत, ठेंगणीं. आणि त्या झाडांवर हजारो पक्षी उतरताहेत. कलरव करताहेत. किती त्यांच्या जाती? फ्लेमिंगो, स्पून बिल, ग्रेट इंडियन बस्टार्ड, पेलिकन्स, सारस, क्रेन, कृष्णक्रौंच, जलकाक, सारस, बदकंही

असावींत. असे पक्ष्यांचे थवेच्या थवे, कांहीं पांढरे शुभ्र. कांहीं काळे. कांहीं चोचींखालीं खोळी असलेले, हंस होते. राजहंसही असावेत. अशा शेशंभर जातींचे पक्षी. कुणी क्रँक क्रँक करताहेत. कुणी चीत्कारताहेत. कुणी आरवताहेत.

कांही उडून पुनः त्या झाडांच्या शेंड्यांवर बसताहेत. कुणी आकाशांत फेरी मारून थेट पाण्यांत उतरताहेत. कुणी पाण्यामध्यें शतपावली करताहेत. कुणी माना उंचावताहेत. कुणी पाण्यांत बुडी देताहेत, आणि इथून त्या तिथं वर येताहेत. कुणी आपल्या डगळ चोचीनं आपलीं पिसं स्वच्छ करताहेत. कुणी तृप्त मनानं किलबिलताहेत, कुणी जणूं ध्यानमग्न झालेले, निश्चळ.

त्यांच्या झुंडीच्या झुंडी अजून आकाशांतून उतरताहेत. हे कुठून येतात? अमुकच ठिकाणीं उतरायचं, हें त्यांना कसं कळतं? तिथला क्यूरेटर म्हणाला, कीं–

हे सगळे पक्षी या देशींचे नव्हेत. आतां अगदीं योग्य वेळीं तुम्ही इथं आलां आहांत. यांतले कित्येक पक्ष्यांचे कळप ऑस्ट्रेलियांतले आहेत. कांहीं दक्षिण अमेरिकेंतले. कांहीं रशियांतले. जेव्हां तिकडे वर्फ पडूं लागतं, वावरणं अशक्य होतं, तेव्हा ते कळपच्या कळप दरवर्षी तिथून निघतात, आणि इथं येऊन उतरतात. इथलं वातावरण त्यांना सुखद वाटतं. हर रोज सकाळीं हे चरायला जातात, संध्याकाळीं इथं परततात.

विचारलं, ऑस्ट्रेलियांतून येतात? मार्गांत तर प्रचण्ड समुद्र आहे.

होय, म्हणे! तो पार करून दर वर्षीं ते भारतांत येतात!

वाटेंत कुठंही न थांबतां हे एवढं सुदीर्घ उड्डाण करतात?

कुणी जाणकार पक्ष्यांचं निरीक्षण करीत उभा होता. तो म्हणाला,

होय. तिकडून निघतात, त्या वेळीं चांगले पुष्ट असतात. हें एवढं दीर्घ उड्डाण करून, इथं येऊन पावते होईपर्यंत त्यांचीं शरिरं अगदीं कृश

होतात. अंगांतली चरबी झडून जाते !

असं हें पक्ष्यांचं चंक्रमण कधींपासून सुरू आहे ?

म्हणे, हें चक्र हजारों वर्षं असंच चाललं आहे. तुमच्या राजवटी बदलोत ! कुणाचींही शासनं येवोत. सातवाहन असोत, गुप्त असोत, राष्ट्रकूट, यादव, मुसलमानी राजवटी, मराठेशाही, ब्रिटिश सत्ता, स्वराज्य—

ही शासनं न जुमानतां ही पक्ष्यांची भारतयात्रा अखंड चालू आहे ! हे दोन महिने ते थवे इथं राहतात, आणि उष्ण वाटूं लागलं, कीं पुनः उडून आपल्या भूमींत परततात.

नवल नवल !

प्रताप पाटलांनीं विचारलं,

कुणी यांची शिकार करीत नाहीं ?

क्यूरेटर म्हणाला,

भंवतालीं लहान लहान खेडीं आहेत, तिथले गांवकरी कुण्या शिकाऱ्याला या दिशेनं वळूंही देत नाहींत. त्याचं एक बारकंसं कारण आहे. या तलावांतल्या पाण्यावर लहान लहान कालवे आहेत. त्या पाण्यानं त्यांची शेती भिजते. हीं पाखरं पाण्यांत जी विष्ठा टाकतात, तिच्यामुळं पाण्यांत खत साठतं. तें पाण्याबरोबर वाहून यांची शेती समृद्ध करतं. तेव्हां दरवर्षीं ही पाखरं इथं यावींत, असं त्या गांवकऱ्यांना मनापासून वाटत असतं.

हातांतली दुर्बीण त्या पक्ष्यांच्या थव्यांवर रोखून अगदीं सूर्य मावळून जाईपर्यंत थांबलों. शेवटला पांखरांचा थवा आकाशांतून उतरला, आणि सांजावलं. शेवटीं निरुपाय होऊन मुक्कामावर परतलों.

दि. १४. पहाटे लवकर उठलों, आणि दुर्बीण घेऊन गेस्ट हाउसच्या गच्चीवर धांवलों. वाहवा ! दृष्टि अगदीं धन्य झाली. पक्ष्यांचे थवेच्या

थवे नाना आकृती रचीत चरायला चालले होते! हजारों पक्षी. त्यांचे शेकडों थवे. सगळे त्या तळ्यांतील विश्रांतिस्थळापासून आकाशीं भरारत होते. कांहीं पैल उडून दिसेनासे होत होते. कांहीं उजवीकडे. कांहीं डावीकडे. कांहीं अतिथिगृहाच्या दिशेनं. तळ्यापासून ते येत होते, आणि आमच्या माथ्यावरून उडून पलिकडे जात होते. असं सगळं आकाश त्यांच्या आकृतींनीं चित्रांकित झालं होतं. ते निःशब्द पक्षी पकापका पंख हालवीत असे भक्ष्याच्या शोधासाठीं निघाले होते!

गाडीचं शिंग वारंवार वाजूं लागलं, तेव्हां निरुपाय होऊन निघावं लागलं.

आतां गाडी तळीं माड अंथरलेल्या टेकड्यांमधून धावूं लागली. दर दहा–वीस मैलांवर एक गोपुर. त्यामागं एक देऊळ. प्रत्येक स्थळाचं एकेक माहात्म्य. पाहावं तरी किती, ध्यानीं ठेवावं किती!

एका टेकडीजवळ गाडी थांबली. कळलं, कीं हें पक्षितीर्थ. इथं स्वयंपाकाचं सामान उतरून आपण पुढं समुद्रतीरावरील महाबलिपुरम्‌ला जाणार आहोंत. तें उरकल्यावर दुपारीं बाराला इथं पोंचणार आहोंत.

कसं विचित्र आहे, पाहा! कुठं राहिला मद्रदेश! कुठं हस्तिनापुर! कुठं हिमालयाची उपत्यका! वाटेंत किती दुर्लंघ्य नद्या. पर्वत. वनं. घाट्या. दरे. दरकुटं! पण तें सगळं ओलांडीत हजारों वर्षांपूर्वी पांडव–कमींत कमी त्यांची कीर्ति तरी इथं मद्रासेच्या दक्षिणेस महाबलिपुरम्‌ला पोंचली! नुसती पोंचली नव्हे, तर त्या महाभारतीय वीरांनीं इथल्या पाषाणांवर आपल्या स्मरणार्थ मंदिरं–गुहा–लेणीं कोरून ठेवायला इथल्या नागरिकांना आणि शिल्पकारांना प्रवृत्त केलं!

थेट समुद्रतीर. महाबलिपुरम् हें प्राचीन नगर थेट सागरतीरीं वसलं

आहे. ऐन तीरावर पांडवांचीं पांचही देवळं होतीं, म्हणे. त्यांतलीं चार समुद्रानं गिळलीं. त्या मंदिरांची साक्ष पटवायला एक मंदिर काय तें शिल्लक राहिलं आहे. भुरक्या, ताशीव पाषाणांनीं बांधलेलं. समुद्र आणि मंदिर, यांच्यामध्यें मोठमोठ्या पाषाणांचा भराव घालून समुद्राचं आक्रमण अडवलं आहे. हें एक वगळतां तिथं एरवीं कांहींही दिसत नाहीं. असं म्हणतात, कीं जेव्हां खूप मोठी ओहोटी येते, तेव्हां समुद्रांत बुडालेल्या त्या मंदिरांचीं शिखरं काय तीं दिसतात.

एकाच पाषाणांत कोरलेल्या मंदिरांचा दुसरा व्यूह इथून अदमासें मैल, दीड मैलावर आहे. या व्यूहांतलीं मंदिरं, पावसाच्या पाण्यानं जी खडकांची धूप झाली असेल, तीवेगळीं अक्षुण्ण आहेत. पांचही पांडवांचीं पांचही मंदिरं पाषाणांतून सलग कोरलेलीं, एका शेजारीं एक अशीं आहेत. एका बाजूस आहे एक हत्ती, पाषाणांतून कोरून वेगळा काढलेला. मंदिरांची रचना सुंदर आहे. शिल्प तसं ठसठोंवसच आहे, पण तें प्रमाणबद्ध आहे.

तिसरा मंदिरव्यूह इथून कांहीं अंतरावर. हाही तसाच पाषाणांतून कोरून काढलेला. मंदिरांवेगळया इथं दोन विलक्षण गोष्टी : एकमेकां-शेजारीं बसलेल्या माकडांची एक जोडी पाषाणांतून कोरून काढलेली, आणि एका भल्याथोरल्या पाषाणखण्डावर कोरलेले दोन उठावदार हत्ती! त्यांतला एक तर भला प्रचण्ड, चांगला तीन पुरुष उंचीचा. त्याच्या पायांखालीं एक हत्तीचं पिल्लं बसलेलं, आणि एक उभं. त्याच्या मागं दुसरा त्याहून ठेंणगा हत्ती. त्याचा डोळा जो काय सुबक कोरला, म्हणून सांगूं? काय त्याचा कान, काय त्याच्या सोंडेची मुर्डीव! काय त्याचा लहानसा सुळा! छे छे! या कोरक्यासमोर, आपले दंडवत! हत्तींच्यावरही कित्येक दांपत्यं उठावदार पद्धतीनं कोरलीं आहेत. जणूं तीं गगनमार्गानं उडत कोण्या देशास निघालीं आहेत!

कुणाबरोबर आलं, कीं एक होतं. कसं तरी स्थलावलोकन उरकून माणसं भराभरा बसमध्यें जाऊन बसतात. अनिच्छेनं आपल्यालाही त्यांच्यामागं फरफटत जावं लागतं !

इथून निघालों, ते दुपारीं साडे अकराच्या सुमारास पक्षितीर्थावर पावते झालों.

टेकडीचा चढाव सोपा आहे. दुतर्फा झाडांची शीतळ सावली आहे. सगळ्या बांधीव पायऱ्या आहेत. टेकडीवर पोंचलों. माथ्यावर चहूं बाजूंनीं परकोट, मध्यभागीं महादेवाचं भव्य मंदिर. आम्हांला हवी होती पक्षी येतात, ती जागा. चौकशी करतां कळलं, कीं थोड खालीं उतरावं लागतं, तिथं एका बाजूला पक्षी उतरतात. उतरलों. बांधीव पायऱ्यांवरून. तिथं गजांचं एक कुंपण आढळलं. पलिकडे मोकळा, प्रशस्त खडक. कुंपणाअलिकडे शेंदोनशें माणूस आम्हांआधींच गोळा झालेलं पाहिलं. भरंवसा आला, कीं अजून पक्षी यायचे आहेत. बारा वाजायला आले होते.

त्या शेंदोनशें दर्शकांमध्यें सुमारें पन्नास विद्यार्थी गट करून बसले होते. कर्णाटकांतले. आळीपाळीनं विद्यार्थ्यांचींच भाषणं चाललेलीं होतीं. भाषा कळत नव्हती, पण सगळा समूह हंसत होता, अन् बोलण्यांत डिसिप्लिन, इन्‌डिसिप्लिन, संयमा, सदाचारा, असे कांहीं शब्द कळत होते. तों त्या विद्यार्थ्यांबरोबर असलेले प्राध्यापक उभे असलेले दिसले. कुतूहल म्हणून पुसलं, कुठले ? तर कर्णाटकांतले. आले कुठं ? तर पक्षितीर्थ पाहायला, अजून वेळ आहे. इंजीनिअरिंग विषयाचे विद्यार्थी. प्राध्यापक तत्त्वज्ञानाचे. त्यांनीं माझी चौकशी केली. खोदखोदून. साहित्य अकादमीचं पारितोषिक मिळालेलं, तें बंगळूरला, कर्णाटकांत, हें सांगावं लागलं. त्यांनीं विद्यार्थ्यां-पुढं नेऊन उभं केलं. कन्नडमधून परिचय करून दिला. मग तुटक्या-फुटक्या इंग्रजींतून जन्मांत पहिलं भाषण ठोकलं. पांच मिनिटं.

गर्दी जमत चालली. साडेबारा वाजून गेले. गजांपलिकडे कांहीं माणसं उभीं होतीं. एक सेवक आला, आणि त्यानं त्या सर्वांना तिथून काढून खडक मोकळा केला. पक्ष्यांच्या येण्यांतला क्रम माहीत नव्हता. केवळ उत्सुकता दाटली होती. गजांना कॅमेरे चिकटवून उभे राहिलों. थोडक्या वेळानं एक लुंगी लावलेला, शेष शरीर उघडं असलेला अर्ध्या वयाचा बापया एक घागर, तांब्या आणि वाटी घेऊन, गज ओलांडीत खडकावर जाऊन थांबला. एका सेवकानं पाट मांडला. त्यावर तो बसला. घागरीभंवतीं तांब्यातलं पाणी मार्जन केलंन्. समोरच्या आकाशांत निरखलंन्. अन् मग हाताशीं छत्री होती, ती उघडून तिच्या सांवलींत बसून राहिला. छत्रीखालीं बसलेला तो पुजारी गजांपलिकडे, अलिकडे आम्ही सगळे उत्सुकता दाटलेले दर्शनेच्छू !

आम्हां जमलेल्यांमध्यें एक पंचवीस वर्षं वयाची तरुणी दिसली. रूप शंभरजणींसारखं, पण तिचे केश ! ती उभी होती, आणि तिनं वेणी घातली होती, तिचा शेपटा थेट भुईपासून चार अंगुळं, इतका लांब ! चांगले लांबलचक केश असलेल्या अनेकी पाहिल्या आहेत. आमच्या लतादीदीचे केशही असेच लांबसडक, थेट गुडघ्यांपर्यंत. पण इतके लांब केश आजपर्यंत पाहिले नव्हते ! नांवगांव विचारायचं म्हटलं, पण स्त्री दाक्षिण्य आड आलं !

पुजारी वारंवार आकाश निरखीत होता, आणि आतां त्यानं छत्री मिटली. घड्याळांत पाहिलं. एक वाजायला आला होता. तो पाहत होता, तें आकाश निरखलं, तर चार दोन घारी आणि कावळे उंच आकाशांत घिरट्या घालीत असलेले दिसले. अचानक दिसले दोन पांढरे ठिपके ! बहुधा तेच पक्षी असावेत.

पुजाऱ्यानं घागरींतली वट्ट खीर—तिला पायस म्हणायचं—वाटींत काढली, आणि ती वाटी उजव्या बाजूस सारून वाट बघत राहिला, तों त्या दोन

ठिपक्यांतला एक ठिपका उजव्या बाजूच्या खडकावर झेंपावत उतरला.

आला ! पक्षी आला !

पांढऱ्या पिसांनीं आच्छादलेलं शरीर. मान आणि डोक्यावर मात्र पिवळीं पिसं. असा तो गरुडाएवढा पक्षी होता तिथंच बसून राहिला. पुजारी खडकावर वाटी खडखडवूं लागला. कांहीं मिनिटांनीं पक्ष्यानं त्या पुजाऱ्याच्या दिशेनं चालत यायला प्रारंभ केला. आम्हां सर्वांच्या मनींची उत्सुकता कळसास पोंचली. त्या दोघांपासून सुमारें सात–आठ हात अंतरावर गजांआड कॅमेरे त्या दिशेनं रोखून आम्ही उभे होतों. श्वास रोखून.

तो महागृध्र पुजाऱ्यापासून पांच हातांवर येऊन थांबला. इतकं पांच-सातशें माणूस त्याला पाहायला गजांआड दाटलेलं. पोरं किंचाळत असलेलीं. पण त्यानं आम्हांकडे ढुंकूनही पाहिलं नाहीं. काय ऐट ! काय रूपगौरव ! काय आत्मविश्वास !

पुजारी वाटी खडखडवूं लागला. उदासीनपणं कुणीकडे तरी पाहत असलेला तो पक्षिराज. शेवटीं त्याला दया आली असावी. तो या दिशेस वळला, आणि एकेक पाऊल टाकीत तो पुजाऱ्यापास आला. वाटींतलं पायस खाऊं लागला. चार–दोन घास त्यानं खाल्ले. त्या खाण्यांत वखवख नव्हती. आधासलेपण नव्हतं.

मग पुजाऱ्यानं घागरींतलं पायस उजव्या हातावर घेतलं. तो हात पक्ष्यापुढं केला. क्षणभर थांबला, आणि मोठ्या डौलानं पक्षी पुजाऱ्याजवळ आला. त्याच्या हातावरचं पायस चोंचीनं टिपूं लागला ! सगळे कॅमेरे टिक-टिकले. तो क्षण त्या सगळ्यांनीं धरून ठेवला.

चार–दोन घास खाल्ले, आणि निःस्पृहासारखा थोडा लांब सरून पक्षी आकाशांत झेंपावला. हा वेळपर्यंत दुसरा, त्याचा जोडीदार आकाशांत भराऱ्या मारीत होता. पुजारी त्याकडे पाहत वाटी खडकावर खडखडवूं

लागला, पण हा आकाशांत पोंचतांच दोघे मिळून उत्तर दिशेकडे भरारते झाले !

सगळी गर्दी हलली, आम्हीही टेकडी उतरूं लागलों.

केवढं नवल ! शेकडों वर्षं होऊन गेलीं, या स्थळीं ही प्रथा सुरू आहे. या पुजाऱ्याचा बाप, त्याचा बाप, त्याचा बाप, सगळे हेंच करीत आले. माध्यान्हीस असेच पायस घेऊन पक्ष्यांची वाट पाहत राहिले. असेच ते महागृध्र भर दुपारीं उतरले. असेच आकाशांत उडून दिसेनासे झाले. हेच दोन पक्षी नव्हेत, यांच्याही पिढ्या ! खरोखरी आश्चर्य आहे !

कुणी म्हणालं, कीं त्या पायसांत कांहीं मादक पदार्थ घातलेला असतो. त्याच्या लालचीनं पक्षी येतात. हें काळोखाएवढं असत्य आहे. त्या पक्ष्याचं सतत मी निरीक्षण करीत होतों. त्याच्या वर्तनामध्यें मला तिळाइतकीही व्यसनाधीनता, वखवख दिसली नाहीं. आपला डौल, आपला गौरव त्यानं शेवटच्या क्षणापर्यंत कायम राखला. एकच आला, दुसरा तर उतरलाच नाहीं.

हे गृध्र किती वर्षं जगतात ? यांच्यामागं यांचा वंश रोज मध्यान्हीस इथं येतो ? आणि एक–दोनच कसे ?

हे प्रश्न अनुत्तरित राहिले. यांचं समाधान करणारा कुणी भेटला नाहीं.

उतरलों, तळांत अन्नब्रह्म सिद्ध होतं. आहुती दिली. घोषणा झाली : आतां पॉंडिचरी !

पॉंडिचरीचं नांव स्मरतांच मनश्चक्षूंसमोर उभा राहिला स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास. धगधगता बंगाल. महाराष्ट्राइतकाच पेटलेला. आठवले कारागृहांतदेखील चिंतनशील अरविंदबाबू. त्यांना तिथं झालेला साक्षात्कार. त्यांनीं ब्रिटिश सत्तेतला परतंत्र भारत सोडून केलेलं फ्रेंच पांडेचरींत प्रयाण.

तियं आश्रमाची स्थापना. दिलीपकुमार रॉयांसारखे त्यांच्या भंवतालीं एकत्र झ लेले साधक. माताजी. त्यांचं प्रेम असलेला तांबडा गुलाब. अरविंदाचं झालेलं निधन. तीन दिवस होतं तसंच राहिलेलं अविकृत शरीर. मुखावरती तीच ती आभा.

मात्र गाडी ज्या इमारतीसमोर जाऊन उभी राहिली, तिचा भंवताल पाहून थोडा निराश झालों. कल्पना केली होती, कीं नगराबाहेर आश्रम असेल. भरपूर मोकळी जागा. सर्वत्र वृक्षलता असतील. वडापिंपळांचीं झाडं असतील. त्यांखालीं ओटे असतील. मध्यभागीं ठेंगणी एकमजली वा दुमजली इमारत असेल. भंवतालीं आश्रमहरिणी असतील.

आमची गाडी जिथं थांबली, तो सुरेख डांबरी रस्ता होता. दों बाजूंना आणि भंवतालीं फ्रेंच पद्धतीच्या इमारती. गोव्यांतील घरांवर पुर्तुगेज छाप आहे. वागांच्या मधें चौसोपी, उतरत्या छपरांचीं घरं. समोर वल्काव. म्हणजे दोन्ही बाजूंस सायंकाळचं बसून गप्पा मारण्यासाठी दोन ओटे. त्यांच्या मागं उतरतीं टेकणं. फ्रेंच थाट थोडा वेगळा. उभीं, दुमजली, कांचांच्या खिडक्यांचं बाहुल्य असलेलीं घरं.

उतरलों. पादत्राणं गाडींतच ठेवलीं. आश्रमांत शिरतां तिथल्या शांत वातावरणाचा गंध भंवताले भरून राहिलेला आढळला. सगळीकडे पराकाष्ठेची स्वच्छता. नाना देशींचे साधक आहेत. भारतीय. पाश्चात्त्य. पौर्वात्य. पण कुणी कुणाशीं मोठ्यानं बोलतही नाहीं. आधीं बोलायचंच नाहीं. आणि गरजच पडली, तर अगदीं हळू. सर्वांचे स्वच्छ वेष. एक विलक्षण आदब. आम्हां सर्वांवर त्या वातावरणाचा परिणाम झाला. आंत अरविंदांच्या समाधीशीं पोंचलों. एक चौथरा. त्यावर भरपूर फुलं रचलेलीं. तींही फुलांचा ढीग घालून नव्हे. त्यांत शृंगार तर आहे, पण उथळपण नाहीं. नीट लावून ठेवलेलीं. समाधीचं सौंदर्य न बिघडतां तिला एक रूपगौरव लाभला आहे.

तिच्या भंवतालीं अनेक साधक पद्मासन झालून, ध्यानस्थ बसले आहेत. कुणी आपल्या प्रापंचिक वा मानसिक व्यथा मौनपणं श्रीगुरूला सांगण्यासाठीं समाधीला मस्तक लावून, तिच्या आधारानं बसलं आहे. आम्हीही मौनपणं कांहीं क्षण उभे राहिलों. नंतर माडीवर गेलों. तिथं अरविंदांचं आणि माताजींचं भव्य छायाचित्र. सर्वत्र फुलांची आरास. इतके साधक चहूं दिशांस वावरताहेत, पण कुणी मोठ्यानं बोलत नाहीं! तळांत अरविंदांच्या समाधीजवळ ग्रंथागार. अरविंदांचीं पुस्तकं तिथं विक्रीस ठेवलेलीं. ग्रंथपालांचं—कां ग्रंथपालिकांचं? स्मरणांत नाहीं, वर्तन अत्यंत शालीन!

त्याच वातावरणानं भारून बाहेर पडलों, आणि गाडींत बसून पॉंडिचरीच्या बाहेर, समुद्रतीरावर असलेल्या यूथ होस्टेल असोसिएशनच्या दुमजली वसतिगृहांत पोंचलों. इथंही तशीच स्वच्छता. शौचस्थानं. स्नानगृहं. सगळं अदबशीर. आधीं पत्रव्यवहार झाला असल्यानं कांहीं अडचण आली नाहीं.

पंधराची सकाळ. पाहाटे स्नानसंध्या उरकली आणि कॅमेरा गळ्यांत अडकवून बाहेर पडलों. कांपौंडच्या भिंतीपलिकडे समुद्र. म्हणजे पूर्वसमुद्र. अगदीं कुंपणाबाहेर एक पडकी इमारत. तिचं तुटून पडलेलं दार. शेजारीं एक माड. इमारतीशीं शेकोटी पेटवून दोन गरीबगुरिबीं शेकत बसलेलीं.

वा:! त्या दारांतून उगवता सूर्य दिसणार आहे. हा सगळा समोरचा आकार—पडकी भिंत, शेजारीं पडकी इमारत, तिला असलेलं दार, आणि तिच्यांतून सूर्यबिंब! शेजारीं एका माडाचं खोड! कांपौंडच्या भिंतीला टेकून कॅमेरा रोखून उभा राहिलों. सूर्योदय होण्यापूर्वीच्या अरुणप्रभेचं एक चित्र घेऊन टाकलं. मग तसाच भिंतीला टेकून सूर्योदयाची वाट पाहत राहिलों. कांहीं मिनिटांतच तो उगवला. क्षितिज सोडून थोडा वर

आला, आणि कॅमेऱ्यांत धरून ठेवला. मग तसाच धांवत ऐन सागरतीरीं गेलों. मच्छीमार आणि समुद्रांत निघालेली त्यांची नाव. पलिकडे क्षितिजाशीं थोडकं वर आलेलं सूर्यबिंब. समुद्रावर थेट मजपर्यंत पोंचलेली त्याची आभा. चित्र घेऊन टाकलं. आमचे आजरी चांगले उत्तम पोहणारे. निर्भय. ते स्नानासाठीं समुद्रांत शिरले. त्यांना समुद्रजळाचं अर्घ्य सूर्याला देत उभं केलं, आणि त्यांचंही एक चित्र. मात्र हें चित्र थोडं विस्कटलं. आजरी थोडे उंच उठायला पाहिजे होते. म्हणजे मीं पाण्यांत शिरून त्यांच्याजवळून, कॅमेरा खालीं धरून चित्र घ्यायला हवं होतं !

मग एकटाच समुद्रावर भटकत राहिलों. काय मौज पाहा ! इथं पूर्वेस सूर्य समुद्राआडून उगवतो, आणि धरतीवरील क्षितिजाआड तो मावळतो ! पश्चिमतीरावर नेमकं उलटं. डोंगराआडून त्याचा उदय, तर समुद्रजळीं त्याचं बुडी देणं !

जेवण–व्यवस्थेंत थोडा असंतोष. थोडी तणातणी. शेवटीं निर्णय असा, कीं आमचे प्रताप पाटील, डॉ. कुलकर्णी, आजरी आणि गरगटे–चौघांच्या अधीन सगळीं सूत्रं करावीं, आणि आजारी हवालदारांनीं कोल्हापुरीं परतावं. पुढील यात्रेंत या चौघांच्या मदतीला हुबळीचे कलघटगी आले.

दुपारीं चारला निघालों, आणि सायंकाळीं साडेसातला चिदंबरमला पोंचलों. इथं एकटं शंकराचं मंदिर नाहीं. मंदिरांचा व्यूह आहे, तशीच ती स्वच्छता. तशींच भव्य मंदिरं. मुख्य मंदिरांत नटराजाची ती भव्य मूर्ति. एक पाय खालीं असुराच्या शवावर. दुसरा नृत्यमुद्रेंत उचललेला. दोन्ही हातही नृत्यमुद्रेंत. पाहून रावणाच्या शिवतांडवस्तोत्राचं स्मरण झालं.

जटावी गलत् ज्वलत् प्रवाहपावितः स्थले
गलेऽवलम्ब्यलंबितां भुजंगतुंगमालिकाम्
डमड्डमड्डमड्डमड् निनादवत् डमर्वयम्
चकारचंडतांडवं तनोतुः नः शिवः शिवम् ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
शाखा (स्थळ प्रत)

इथले पूजक थेट दाक्षिणात्य. म्हणजे भल्या मोठ्या शेंडीचा बुचडा बांधलेले! पूर्वी असं खूप दिसे. लहानपणीं नागपुरीं धनतोलीवर राहत असूं. तिथं राहणारे कित्येक मद्रदेशीय दिवसां कोट–पातळून नेसून हपिसां-तून कुरूकुरू लेखण्या चालवायचे, टाइपरायटर बडवायचे, घरीं परतल्यावर मात्र स्नान, मुंडु, भाळीं भस्म, आणि डोईवर एवढाल्या त्या शेंड्यांच्या गांठी वागवीत जोरजोरानं, हेल काढून बडबडत ग्लासांमधून कॉफी पीत असायचे. आतां तें उणावलं आहे.

रात्रीं एक विश्रांतिगृहांत झोंप. पाहाटेस सर्वांना उठवण्याचं काम मजकडे. तें निष्ठेनं केलं, आणि दिनांक सोळाला पाहाटे प्रवासास प्रारंभ केला. आतां प्रवास दक्षिणेकडील सर्वांत समृद्ध, सुपीक प्रदेशांतून होणार होता!

चिदंबरम् सोडतांना आमचे बाळ गद्रे म्हणतात, तें गीत सारखं स्मरत होतं :

शिव चिदंबरम् येन मनंक निंदिड–

तळीं दिसूं लागलीं. त्यांतून तांबडीं–पांढरीं कमळं. ऋतु सुंदर होता, अजून थंडी मावळली नव्हती. त्यामुळं आपल्या सीटवरून, सुरेख रस्त्या-वरून प्रवास करणं आनंददायी होतं.

कालव्यांचं जणूं जाळंच पसरलं आहे. त्यामुळं भाताचं दुसरं पीक घेतां येत असलं पाहिजे. भातंही खुरटीं नव्हेत. चांगलीं कंबरेएवढीं उंच. म्हणा कांहींही, असोत भातं उंच, पण आमच्या मावळी आंबेमोहोराचा घमघमाट कांहीं या उंच, भरघोस पीक देणाऱ्या भातांचा नव्हे. आमच्या मावळांतून सराई पिकली, म्हणजे चालूं लागावं. आंबेमोहोराच्या सुगंधानं वेडावून जायला होतं!

मात्र कितीक तलाव जलपर्णी—हायसिंथनं केवळ भरून गेलेले आढळले. ही जलपर्णी वनस्पति पाण्यांत वाढणार, आणि जमीन सगळी महाराष्ट्रांत चांदणी—काँग्रेस गवतानं व्यापली! दोन्ही खूप गतीनं वाढताहेत. पाणी वाहतं असो वा स्थिर असो, जलपर्णीचं बीज एकदां रुजलं, कीं पाहतां पाहतां ती सगळ्या नदी-तळ्यांच्या पात्रांत भरून जाते!

गरिबांचीं घरं उतरत्या छपरांचीं. वरतीं पेंढ्यांचा शाकार. बहुधा सगळीं लंब चतुष्कोणी. धुंधुर्मास सुरू आहे. प्रत्येक हिंदूच्या घरापुढं सुंदर सारवलेलं. त्या सारवणावर प्रशस्त रांगोळी. मधोमध गाईच्या शेणाचा पाऊ, आणि त्यांत सुंदर फुलं खोचून ठेवलेलीं. हें चित्र दक्षिणेंत सर्वत्र आढळलं. मार्गांत एखादं बरं गांव लागलं, कीं माडांच्या राया सुरू व्हायच्या. बाजारांत शहाळ्यांचे ढीग रचून ठेवलेले. तीं दोन प्रकारचीं. एक कोवळं, त्यांत नुसतं पाणी. दुसरं किंचित् जून, त्यांत पाण्यासवें कोवळं खोबरं. तुम्ही शाहाळं घेण्यासाठीं उभे राहिलांत, कीं तें हातांत धरून विक्रेता त्यावर सपासप कोयतीचे घाव घालणार. तोंडाचा भाग मोकळा करणार. करवटीचा टवका उडवणार. त्यांत प्लास्टिकची नळी घालणार, तुमच्या हातीं देणार. पाण्याचा नारळ पिऊन टाकून द्यायचा. खोबरंपाण्याचा पुनः विक्रेत्याच्या हातीं द्यायचा. तो त्याच्याच भेंवतालाची कोयतीनं एक खापली काढणार. एका घावांत त्याचीं दोन भकलं करणार. खापलीनं सगळं खोबरं एकत्र करणार, आणि तुम्हांहातीं देणार. दुधाच्या सायीतें म्हणे परती सर, अशी ती लुसलुशीत चव! या सगळ्या प्रवासांत मीं निष्ठेनं दिवसांतून एकदां तरी शाहाळीं भक्षून—पिऊन घेतलीं. त्यामुळं तर एवढ्या सुदीर्घ प्रवासांतदेखील माझी प्रकृति उत्तम राहिली.

माडांच्या सवेंच ताडवृक्षही गगनावेरीं वाढलेले. आंब्यांची झाडं. त्यांना लटकत असलेल्या कैऱ्या, काजवी, त्यांना धरलेले बोंडू. मध्येंच सुरूंची दाट लागवड. शेतांमधून ऊस. केळीं. वांगीं. अळवाचे खाचे. असा

सगळा कोंकणी मामला, कोंकणासारखे डोंगरच काय ते नाहींत.

लोकसभेची निवडणूक अगदीं दारांत उभी राहिलेली. इकडे सभा-मिरवणुका फारशा आढळल्या नाहींत. मात्र आय् काँग्रेस आणि द्राविड-मुन्नेत्र कळघमचीं प्रचारचिन्हं चहूं दिशांस रंगवलेलीं. काँग्रेसचा हात, आणि कळघमचीं दोन पानं. कळघमची आणिक एक शाखा—मला वाटतं, अण्णा द्राविड मुन्नेत्र कळघम; तिचं प्रचार-चिन्ह दोन टेकड्यांआडून उगवत असलेला सूर्य असावं. रंगवणं म्हणजे किती ? एक मार्गावरची भिंत कांहीं रंगविल्याविना मोकळी ठेवली नाहीं !

कुंभकोणम्ला देवदर्शन न करतां सरळ जाऊन तंजाऊरला उभे राहिलों !

चजाऊर, चंदावर, तंजापुरी, चेंजावर, तंजावर, टँजोर—मराठ्यांचे प्राण तिथं गुंतून पडले पाहिजेत. शिवछत्रपतींविषयीं आदर असणाऱ्या प्रत्येकानं जीवनांत जसा एकदां राजगड—रायगड पाहिला पाहिजे, तसंच त्यानं एकदां तंजावर पाहिलं पाहिजे. कारणं ? पुष्कळ आहेत. शाहाजीराजांचे दुसरे पुत्र, शिवाजीराजांचे सापत्न बंधु व्यंकोजीराजे, यांची ती राजधानी होती.

पण याही आधीं कित्येक सहस्रकं तंजावर नाना कारणांनीं सुविख्यात होतं. शेजारून कावेरी नदी वाहते. तिचे कालवे काढून प्राचीन राज-कुळांनीं हा प्रदेश अतिशय समृद्ध करून टाकला आहे. दक्षिणेंतील नंदनवन अशी याची प्रसिद्धि. महाभारतामध्यें उल्लेख असलेले पांड्य, चोल, चेर हे तिन्ही राजवंश तंजावरला नांदून गेले. आपापल्या परीनं त्यांनीं तंजावरच्या संपन्नतेंत भर घातली. पैकीं चोलराजकुलाचं या प्रदेशावर फार ऋण आहे. इ. स. ५० ते ९५ या कालखंडांत नांदून गेलेल्या कारिकाल चोल राजानं पांड्य आणि चेर यांच्या सैन्यांचा पराभव केला. प्रदेशाच्या समृद्धीसाठीं तो अहर्निश झटला. वारेमाप वाढलेलीं अरण्यं

तोडून तिथं त्यानं लागवडीस योग्य जमीन तयार केली, इतकंच नव्हे, तर तलाव, पाट, घरणं अशी सगळी पाण्याची सोयही त्यानं उपलब्ध करून दिली. साहित्यावर त्याचं प्रेम होतं. दक्षिणेंतलीं कित्येक ग्रंथकौस्तुभं कारिकालाच्या कालखंडांत निर्माण झालीं आहेत.

त्यानतर नांव प्रामुख्यानं पुढं येतं राजराज चोलाचं. विद्यावैभव, कला, नृत्य, गायन, वादन, आदि सर्वांचा रसज्ञ. अनेक नृत्यविद्यालयं यानं निर्मिलीं. बृहदीश्वराचं नजर फिरवून टाकणारं अतिभव्य, प्रमाणबद्ध मदिर, हें राजराज चोलाचं अद्वितीय स्मरणचिन्ह आहे.

मंदिरास लागणारा सुंदर पाषाण या प्रदेशांत मिळत नाहीं. तो उत्तरेमधून आणावा लागला. हजारों, लाखों मण वजनाचे हे दगड पाठीवर वाहत बैलांचे तांडे उत्तरेकडून तंजावरच्या दिशेनं निघाले आहेत, असं एक कल्पनाचित्र माझ्या दृष्टीसमोरून तरळून गेलं.

एकूण किती रचना ? तर भंवतालीं प्रचण्ड कोट. हत्ती सहज जाऊं-येऊं शकेल, असं प्रवेशद्वार. मंदिराचं गर्भगृह. अर्धमंडप. महामंडप. आस्थापना मंडप. वाद्यमंडप. नृत्यमंडप. आणि हे सगळे मंडप हजारों मूर्तींनीं शृंगारलेले ! गर्भगृहांत नर्मदेंतून आणलेलं प्रचण्ड शिवलिंग. त्यामागें अतिशय देखणी नटराजाची मूर्ति.

पुढं नंदीमंडपांतला नंदी एक आश्चर्य आहे. उंची बारा फूट. रुंदी आठ फूट. लांबी वीस फूट. हा संपूर्ण नंदी एका पाषाणाचा ! देवळांचा प्रचण्ड भंवताल फरसबंदीनं सजवलेला.

विशेष आहे शिखराचा. या बृहदीश्वराच्या बृहत्‌मंदिराचं प्रचण्ड शिखर एका अखण्ड प्रस्तराचं आहे. त्याचं वजन ? तें आहे ब्याऐंशी टन ! हें वरतीं कसं चढवलं ? तीही एक कथा आहे. इथून अदमासें सात किलोमीटरवर एक गांव आहे, सारापल्लम्. तिथपासून तंजाऊरपर्यंत मातीचा एक चढाव तयार केला. त्याची पातळी सारापल्लम्‌ला जमिनी-

बरोबर. हळूं हळूं ती वाढवीत तंजाऊरपर्यंत मंदिराच्या विमानाएवढी उंच केली! किती रुंद? अदमासें दहा-बारा हात! सारापल्लमूला तें शिखर तयार केलं. मग चहूंबाजूंनीं दोर बांधून, तें हत्तींच्या गळ्यांत अडकवून, त्यांच्या वळें ओढीत तें तंजाऊरला नेलं! सात किलोमीटर हां! इ. स. ९८५ ची ही कथा. एक हजार वर्षांपूर्वींची.

हत्तींकडून तें ओढीत असतां बाजूला घसरायची भीती! शेकडों मजूर तें नीट मधोमध राहील, असं दोरांनीं धरून त्या शिखरामागं चालले असतील! सारापल्लमहून तंजाऊरपर्यंत तें आलं असेल. हत्ती विमाना-पलिकडे पोंचले असतील. मग ते सोडवून यथास्थान बसवलं असेल. म्हणतात, कीं इतका लांब नव्हे, पण तीन-चार किलोमीटरचा भराव विरुद्ध दिशेलाही केला होता, हत्ती उतरण्यासाठीं. सगळंच विस्मयकारक!

इजिप्तमधले पिरामिडस् असेच बांधले आहेत. त्यांचीं बांधीत असतां-नाचीं कल्पनाचित्रं उपलब्ध आहेत. टाइम-लाइफनं लिओनेल कॅसनच्या संपादकत्वाखालीं एन्शन्ट ईजिप्त नांवाचं पुस्तक प्रकाशित केलं आहे. तें मजपाशीं आहे. निक् सोलोव्हिअॉफ, आणि ऑटो व्हॅन् इरेसल या दोघां चित्रकारांनीं ती चित्रें काढलीं आहेत. त्यांमध्यें पिरॅमिडच्या भंवतालीं असाच वर्तुळाकार भराव रचीत ते प्रचंड दगड वर नेले आहेत. मात्र गुलामांकडून! व्याघ्रचर्म पांघुरलेले अधिकारी हतींच्या दंडांच्या धाका-खालीं गुलामांकडून काम करवून घेत आहेत. ते सगळे गुलाम उघडे, केवळ लंगोट्या लावलेले आहेत.

मुख्य मंदिराच्या उजवीकडे एक गणपतिमंदिर आहे. तें उत्तरकाळांत महाराज सरफोजी भोसल्यांनीं बांधलं आहे. विशेष असा, कीं त्याच्या चौथऱ्याच्या चहूं बाजूंस देवनागरी लिपींतला, मराठी भाषेंतला सर्वांत मोठा शिलालेख सरफोजींनीं कोरवून त्यांत भोंसल्यांचा समग्र इतिहास सांगितला आहे. तो सरफोजींपर्यंत येऊन पोंचला तसा, कांहींसा विपर्यस्त

आहे खरा, पण त्यांत भोंसल्यांचा पूर्वज कुणी शरभ नामा होता, असा उल्लेख आहे. शाहाजींच्या मातुश्रींचें नांव या लेखांत उमाई असें दिलें आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या मतें हा शिलालेख म्हणजे बखरच आहे, केवळ ती दगडावर कोरलेली !

असं सगळं निरखांत असतां माझं लक्ष मात्र राजप्रासादाकडे, आणि त्यांतील सरस्वती महालाकडे लागलेलं होतं. तंजावर ही मराठ्यांची दक्षिणेकडील राजधानी. शिवछत्रपतींचे बंधु व्यंकोजीराजे, यांनीं तंजावराभवतालीं जी निर्नायकी निर्माण झाली होती, ती शमवून तंजाऊर हस्तगत केलं, आणि तिथून राज्यकारभार करायला प्रारंभ केला. ही कथा १६७५ ची.

स्वतः शिवाजीराजे राज्याभिषेकानंतर दक्षिणेंत आले. पैतृक संपत्तीबद्दल व्यंकोजीशीं त्यांचा वाद झाला. शेवटीं जिंजी, तसंच कोलार, इत्यादि कांहीं प्रदेश शिवाजीराजांनीं स्वतःकडे ठेविला, आणि तीन लक्ष होन घेऊन शेष राज्य व्यंकोजीराजांकरतां ठेवलं.

तंजावरचा आणखी एक विशेष असा, कीं गुप्तवेष लेऊन, शिवाजीराजे तंजावरच्या किल्ल्यांत हिंडून, किल्ला पाहून गेले होते ! त्यांनीं व्यंकोजींस लिहिलेल्या पत्राचा उल्लेख या शिलालेखांत आहे, तें पत्र येणेंप्रमाणें :

> —तुम्हीं संपादिलेलें राज्य आम्हीं पाहिलें. तुमचा किल्ला गरुडाद्रि आहे. थोर किल्ल्यास चारी बाजूंस किल्ले आहेती. पण पुढें राखणें कठिण पडेल, याकरितां दक्षिणेकडील उपकिल्ला मात्र पाण्याच्या आसपास आहे, तेवढा किल्ला रोखून वरकड पाडून सोडणें. आम्ही किल्ल्यांत आलों, तेव्हां येका दुकानांत आमचा शिखा (पागोटं) टाकून (तारण टेवून) शेरणी (शिधा) घेतली, तो शिखा पाठविणें.

पत्र अतिशय महत्त्वाचें आहे. राजे गुप्त वेषें तजावरमध्यें शिरले. त्यांनीं किल्ला चहूं बाजूंना न्याहाळून पाहिला. दोष वाटला, तो काढून टाकायला सांगितला. आपण येऊन गेलों, याची खूण पटावी, म्हणून एका दुकानांत आपलं पागोटं ठेवून शिधा विकत घेतला. पुढं लिहिलं, कीं ती खूण पटवून तेवढं आमचं पागोटं धाडून द्यावं !

शाएस्तेखानाच्या वाड्यांत शिरणं, आग्र्याच्या किल्ल्यांतून निसटून येणं, या शिवछत्रपतींच्या चातुर्याशीं हा प्रसंग अगदीं सुसंगत आहे !

व्यंकोजीराजे स्वतः विद्या, कला, साहित्य याची आवड असणारे होते. संस्कृत, तेलगु या दोन भाषांत त्यांच्या काळींच विपुल रचना झाली. १६८५ मध्यें ते वारल्यावर द्वितीय शाहाजीराजे राज्यावर आले. राजाराम जिंजीस आला असतां यांनींच त्याला सैन्य धाडून साहाय्य केलं. शाहाजीराजे अनेक भाषांचे जाणकार होते. त्यांना संतति नसल्यानें शरफोजी आणि तुकोजी या त्यांच्या दोघां बंधूनीं राज्यकारभार चालविला. तुकोजीचे पुत्र बाबासाहेब, नंतर प्रतापसिंह, तुळाजी आणि त्यांचा दत्तक पुत्र शरफोजी ! द्वितीय !

'सरस्वती महाल' ही अद्‌भुत रचना या शरफोजींची ! त्यांचा काळ १७९८ ते १८३२. चोल राजांपासून एकत्र होत असलेलं ग्रंथभांडार त्यांनीं एकत्र केलं. त्याचे विभाग पाडले. तेलुगु, संस्कृत, मराठी, प्राकृत, मोडी, अशीं हजारों ताडपत्रांकित आणि कागदावर लिहिलेलीं हस्तलिखितं नीट विभागवार रचून ठेवलीं ! याही परते त्यांनीं कित्येक फ्रेंच, डॅनिश, इंग्रजी, आदि पाश्चात्त्य भाषांतले ग्रंथही सरस्वती महालसाठीं मिळविले. एवढंच नव्हे, तर देवनागरी लिपींतील पहिला शिळाप्रेस त्यांनीं यत्नपूर्वक काढला !

शरफोजींचे वंशज शाहराज, यांपास थांबून आपण एक मुजरा केला पाहिजे. कारण असं, कीं या विद्वान् राजानं तेवीस मराठी नाटकं लिहिलीं! तेलुगु वीस! तामिळ एक. संस्कृत एक. हिंदी एक. पांच भाषांत एक! असा हा मराठा राजा मराठी भाषेंतला आद्य नाटककार होता! त्याच्या 'मार्कंडेय' या नाटकाची प्रत मीं पाहिली. तिचा शेवट टिपून घेतला, तो असा आहे :

इतिश्री भोसल कुलांबुधिसुधाकर
श्री शाहमहाराज विरचितं मृत्युंजय-
चिरंजीविचरित्रं सकळश्रेय:प्रदं
सकल रसिक विद्वज्जन प्रीतये
सांबाशिवार्पणमस्तु। (मार्कंडेय नाटक संपूर्ण)
श्रीत्यागेश्वरार्पणमस्तु।

आधाशासारखा सरस्वती महालांत शिरलों. किती पाहूं आणि किती न पाहूं! अहो, इथं अडुतीस हजार सहाशें छत्तीस हस्तलिखितं आहेत! चौतीस हजार मुद्रित ग्रंथ आहेत! असा उणापुरा पाऊणलाख संग्रह इथं व्यवस्थित रचून, काळजी घेऊन रचून ठेवला आहे. त्यांपैकीं जवळजवळ पांच हजार हस्तलिखित आणि मुद्रत ग्रंथ मराठी आहेत! कुठं राहिला महाराष्ट्र! कुठ तंजावर! त्या तंजावरला एका मराठा राजानं केलेला मराठी ग्रंथांचा हा संग्रह अद्वितीय! आणि इतका प्रचण्ड संग्रह जगांत दुसरा नाहीं! मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकानं एकदां जाऊन त्या सरस्वती महालाचं दर्शन घेतलंच पाहिजे!

नम्र भावनेनं, नतस्तक होऊन त्या भव्य इमारतींत शिरलों. अदबीनं मुख्य ग्रंथपालांच्या कार्यालयांत प्रवेश केला. त्यांचं नांव ए. पंचनाथन्.

एम्. ए. असून ग्रंथालयशास्त्राचे स्नातक असलेल्या त्या शालीन गृहस्थांना नमस्कार करून म्हटलं, मी महाराष्ट्रांतून आलों आहे, इथला मराठी विभाग पहावा, अशी माझी इच्छा आहे. त्यांनीं दाखवल्या दिशेनं मराठी विभागाचे पंडित श्री. भीमस्वामी यांस शोधीत चाललों. चहूं दिशांना कांचेच्या कपाटांमधून हजारों पुस्तकं अत्यंत दक्षतेनं लावलेलीं. टेबलां-समोर त्या त्या विभागांतले कर्मचारी कुरूकुरू लेखण्या चालवताहेत, शिपाई याच्याकडून त्याच्याकडे फायली पोंचविताहेत. एखाद्या शासकीय कार्यालयासारख वातावरण, पण त्याहून अधिक दक्ष, अधिक तत्पर. भिंतीवर लाविलेलीं दुर्मिळ छायाचित्रं आणि रेखाचित्रं. त्यांमधून नवलानं चालत पलिकडील दालनांत प्रवेश केला, आणि शिपायानं दाखविलेल्या टेबलासमोर उभा राहिलों. एक मध्यमवयीन, सौम्य मुद्रेच्या गृहस्थांनीं मजकडे पाहून म्हटलं,—इंग्रजींत,

येस्, सर, हौ कॅन् आय् हेल्प यू ?

हंसून विचारलं,

आपण भीमस्वामी ?

होय—

मी महाराष्ट्रांतून आलों आहें, या मराठी विभागाचं केवळ दर्शन घ्यायला. मजपाशीं वेळ अगदीं थोडा आहे....

नांव आपलं ?

मी गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर !

अत्यंत अगत्यानं त्यांनीं उत्थापन दिलं. म्हणाले,

तंजावरकर भीमस्वामी, समर्थ शिष्य, त्यांचा मी आठवा वंशज. इथला मराठी विभागाचा पंडित.

त्यांनीं सांगितलेली माहिती खरोखरी विस्मयचकित करणारी होती. राजवाडे इथं येऊन गेले. बनहट्टी इथं येऊन गेले—ज्ञानेश्वरीच्या हस्त-

लिखितांच्या शोधासाठीं. सुचेता भिडे कथाकलीच्या अभ्यासासाठीं इथं आल्या होत्या. हैद्राबादेच्या माया सरदेसाई मराठी नाटकांच्या शोधासाठीं इथं येऊन गेल्या. आद्य मराठी नाटककार शाहाजीराजे भोसले यांच्याविषयीं अभ्यास त्यांना करायचा होता. दासबोधाची चित्रांकित प्रत इथं आहे. समर्थांसमोर नम्रपणं उभे असलेले शिवराय, असं चित्र त्या प्रतीवर आहे. मी आधाशीपणं म्हणालों,

मला ती प्रत पाहतां येईल काय ?

त्यांनीं शिपायाकडून ती प्रत आणविली. पाहून मी स्तंभित झालों. विचारलं,

याची एक छायाचित्र–कृति मी करून घेऊं काय ?

प्रमुख क्यूरेटरना विचारून त्यांनीं संमति दिली. लगेच तें चित्र बाहेर उन्हांत ठेवून त्याचं कॅमेऱ्यावर एक चित्र घेऊन टाकलं. म्हणालों,

मी आपल्याला दोन पुस्तकं–मीं लिहिलेलीं– धाडून देईन. मोगरा फुलला, दास डोंगरीं राहातो.

इथंच नमूद केलं पाहिजे, कीं माझा शब्द मीं पाळला. त्यांच्या उत्तरांतील एक वाक्य उद्धृत करतों :

It is pleasant to share my experience got by reading these books with my other friends and devotees. I am sure that these books shall definitely pave way to create interest in the minds of the devotees of Ramadas and Gnyaneshwar like me.

त्यांनीं एका सद्गृहस्थांचा परिचय करून दिला. ते तेलुगु पंडित. संस्कृतचे जाणकार. नांव विश्वनाथम्. 'श्रीशहाजीपदें' नामक शाहाजीराजे भोसल्यांच्या पदांचें मराठी पुस्तक संपादित करून प्रसिद्ध केलें. मात्र पूर्ण उपेक्षित. इथं आलेल्या प्रत्येकास त्यांनीं भरभरून साहाय्य केलं, पण

ऋणनिर्देश एकानंही केला नाहीं !

पुनः परत सवडीनं येईन—मुद्दाम सरस्वती महालासाठीं, असा त्यांना शब्द दिला. आणि मन तिथं ठेवून परतलों !

आतां गाडी निघली मदुरेकडे. एकदां तंजाऊर जिल्हा मागं पडला, आणि मग रूक्ष प्रदेश सुरू झाला. अगदीं आमच्या धोंडज-जेजुरी-वाल्ह्याचं स्मरण व्हावं, असा. मधें मधें थोडी नीलगिरीची लागवड आढळली, तेवढंच वैचित्र्य. एरवीं तसेच दगडी टोळ. तशीच ओसाड, नापीक जमीन. तांबड्या वाळूचं मिश्रण असलेली.

मदुरा सत्तर किलोमीटर राहिली असतां एक देखणा स्थलदुर्ग लागला. सुंदर तट. उत्तम बुरूज. भव्य महाद्वार. त्याचं नांव पुदुकोटे. एक इकडील बुरुजांचा विशेष असा, कीं ते चौकोनी असतात !

माड कुठं फारसे नाहींत, फड्या निवडुंगाचीं कांहीं बेटं मात्र दिसलीं.

हें पीक पन्नास एक वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत अमाप होतं. प्रत्येक खेड्या-भंवतालीं जणूं निसर्गानंच निर्मिलेला तो तटच असायचा. चांगले वीट वीट कांटे, विषारी. त्याला लागणारीं बोंडं मात्र पिकल्यावर मधुर गरानं लबालब भरलेलीं.

कांहीं मशिदीही दिसल्या. पैकीं एक चांगली डगळ होती. मुसल-मानांची वस्ती अधिक असावी, हा त्याचा अर्थ.

प्रचण्ड भुरके कातळही आढळले.

आमच्या प्रताप पाटलांजवळ मोठमोठे नकाशे होते. ते उलगडून आम्ही कुठून कुठं निघालों आहोंत, वाटेंत गांवं कोणकोणतीं, तें पाहतां येत असे. महाराष्ट्रांत गांवांचीं नांवं नीटस, सुटसुटीत. उदाहरणार्थ, खेड. वांगी. वाडें. इकडे एक तर भलींथोरलीं नांवं. तींही रोमन लिपींत लिहिलेलीं. वाचतां वाचतांच आमची मोटार पुढं धांवत जायची. उदाहरणार्थ :

METTUPALAYAMPATTANAM

म्हणजे मेट्टुपालयम्पट्टणम्! अशी मजा!

दि. १७ ला सकाळीं ७ च्या सुमारास मदुरेंत प्रवेश केला. खरं बोलायचं, तर मदुराईंत मदुरेचं मीनाक्षी मंदिर गेल्या वेळीं पाहिलं होतं. त्याच्या प्रचण्ड उत्तर गोपुरांत असलेल्या जिन्यावरून मृणाल, छोटी मधुरा, वीणा, जामात, असे सगळे चढून गेलों होतों. तिथून दिसणारं आसमन्ताचं भव्य दृश्य पाहिलं होतं. मंदिराचा विस्तीर्ण परिसर न्याहाळला होता. या वेळीं मी आणि पत्नी— दोघांनीं शांत, प्रसन्न दर्शन उरकलं, आणि थोडक्या खरेदीला बाहेर पडलों. इथं हातमाग चालविणाऱ्यांची सहकारी तत्त्वावर चालणारीं कांहीं दुकानं आहेत. वाजवी भावांत हात-मागावर विणलेलीं सुती पातळं आणि लुंग्या उत्तम मिळतात. खिसा चाचपला. आवश्यक तें कापडचोपड घेतलं, आणि मग कानांत घालायच्या कर्णभूषणांसाठीं खडे शोधीत निघालों. आमच्या गाइडनं एका दुकाना-समोर नेऊन उभं केलं. दहा-वीस मिनिटं वाट पाहावी लागली. दुकान उघडलं. दुकानदार भला माणूस दिसला. त्यानं खडे दाखवीत असतां थोडी तोंडीं लावण्यापुरती राजकारणाची मार्मिक चर्चा केली. उत्तम खडे निवडले. तो म्हणाला, कीं हे लंकेतून इकडे येतात.

असं बाजार भटकणं झालं. मंदिराच्या प्रचण्ड प्राकारांतून पुनः एकदां भटकून आलों, आणि सायंकाळीं सात वाजतां रामेश्वरम्‌च्या दिशेनं प्रवास सुरू झाला.

भिन्न रुचिर्हि लोकः, हें खरं. सहप्रवाशांपैकीं अनेकांना गाडींत उपलब्ध असलेल्या व्हीडियोचं आकर्षण होतं. त्यावर एक सुमार रुचीची हिंदी फिल्म दाखवली जात होती: मी अगदीं पुढं, व्हीडियोच्या पडद्याजवळ.

त्याचे दोन्ही कर्णे माझ्या कानांशीं. त्यामुळं तो त्रास प्रवासभर सोसावा लागला. व्हीडियो संपे, आणि मग ' मेरे आंगनेमें तुम्हारा क्या काम है ' या जातीचीं गीतं ! बरोबरचीं मुलं आणि तरुण हंसाय-खिदळायचे. व्हीडियोच्या वेळीं डोळे मिटून बसतां येत असे. पण गीतं वाजत, तेव्हां मग सहन करणें ! दुसरा उपाय नव्हता !

रात्रीं दहा, साडेदहाला रामेश्वरसाठींचं स्टेशन आलं. उतरून तिकिटं काढून सगळे स्टेशनवर पांगून उभे राहिलीं. सूचना दिल्या गेल्या, कीं गाडींत फार गर्दी असणार. जागा मिळेल, तिथं घुसा. कसेबसे रामेश्वरला पोंचलों, कीं झालं !

गाडी स्टेशनांत येऊन उभी राहिली, तों जवळजवळ रिकामी ! आमच्या डब्यांत आम्ही दोघं, डॉ. कुळकर्णी, आणि सताठ त्या देशींचे व्यापारी— रोज येजा करणारे ! हां, माशांच्या रिकाम्या पाव्या मात्र होत्या, त्यांच्या वासानं डोकं उठलं. रात्रीं खिडकींतून बाहेर पाहत राहिलों. कांहींसुद्धां दिसलं नाहीं. मात्र इतकं जाणवलं, कीं गाडी समुद्रांत बांधलेल्या प्रचण्ड पुलावरून चालली आहे.

अर्ध्या पाऊण तासाच्या प्रवासानंतर गाडी रामेश्वरम् स्टेशनमध्यें जाऊन थांबली !

बाहेर टांगे उभे होते. त्यांत संयोजकांनीं बसवलं. बर्वे नामक पुजारी तिथं सुप्रतिष्ठित आहेत. त्यांचं राहतं प्रशस्त घर आहे. त्यावेगळी त्यांनीं एक धर्मशाळेसारखी मोठी उतारूशाळा बांधली आहे. तिथं गेलों. अंथरूणं अंथरलीं. तास, दोन तास झोंप काढली.

दि. १८ ला पाहाटे एकटाच उठलों. आमचे रामभाऊ सोमण आणि त्यांची पत्नी मंगल, यांच्या सहवासांत आमचा प्रवास सुखाचा चालला होता. म्हटलं, बायको त्यांच्यासवें देवदेव करील. प्रातःकर्म उरकलीं.

देवळाच्या दिशेनं निघालों.

रामेश्वराचं मंदिर हें नवल्यासाठीं एक जंतरमंतर आहे. अहो, त्या मंदिराच्या प्राकारांत हजारों सुबद्ध, कोरीव भव्य खांब आहेत. मंदिर निर्माण झालं, तेव्हांपासूनचे. अगदीं आजपर्यंत त्यांची घडाईजुडाई, कोरकाम चाल-लंच आहे. जुना खांब काढून टाकतात. तिथं नवा कोरून, तासून तुसून बसवितात. ते खांब वाहून नेतां येतील, असे बैठे गाडे चार-दोन तरी दिसले, आणि दिसली नव्या खांबांची जडाईघडाई. देवस्थानचा हत्तीही त्याच्या हस्तीशाळेंत ठाणबंद केलेला दिसला. एकदां नुसताच वणावणा चहूं दिशांनीं प्राकारभर भटकलों.

इथं प्राकारांत सताठ कुंडं आहेत—वेगवेगळ्या स्थळीं. त्या प्रत्येक कुंडां-तल्या पाण्यानं स्नान करावं लागतं. हातीं बादल्या घेऊन सेवेकरी उभेच असतात. त्यांच्यासमोर आठ-दहा, पंधरा-वीस स्नानेच्छूंचे थवे. सेवेकऱ्यांनीं कुंडाच्या कठड्यावर उभं राहायचं. बादली उपसून एकेकाच्या डोईवर ओतायची. सगळे भिजले, कीं दुसऱ्या कुंडावर. मग तिसऱ्या. मग चौथ्या.

मीही एका स्नानेच्छूंच्या तुकडींत घुसलों. केवळ लुंगी लावून हा सगळा दक्षिणप्रवास मीं केला होता. रामेश्वराची हवा मुंबईसारखी. उकाडा भरपूर. पुरोहित, सेवेकरी—सगळे उघडेबंब. मींही आंगी एक्या बाजूस ठेवली, आणि सेवेकऱ्याकडून दोन-तीन बादल्या पाणी मस्तकावर ओत-वून घेऊन स्नान उरकलं. यथासंभव दक्षिणा त्याच्या हातीं दिली. मग तसाच ओलेता दर्शनेच्छूंच्या रांगेंत जाऊन उभा राहिलों.

अजून उजाडायचं होतं. उजाडल्यावरचा सगळा वेळ मीं सागरदर्शना-साठीं वेगळा काढून ठेवला होता.

रामेश्वर. श्रीरामानं लंकाविजयापूर्वी स्थापन केलेलं शिवलिंग. त्यासमोर जाऊन क्षणभर उभा राहिलों. थेट शिवलिंगापाशीं जातां येत नाहीं. दारा-

बाहेरून दर्शन घ्यावं लागतं. तिथं दाराशीं उभं राहून रामेश्वर न्याहाळला. मनीं म्हणालों, कीं, रे बाबा, किती शतकांपासून तूं इथं असा आसन मांडून बसला आहेस! किती किती कोटि कोटि सश्रद्ध थेट उत्तरेंतून गंगोत्रीचं जळ कावडी भरून घेऊन, हें एवढं प्रचंड अंतर चालत तुज-पाशीं आले! त्यांनीं त्या जळानं तुला न्हाऊं माखूं घातलं! किती त्यांच्या भाषा! कसे त्यांचे वेष! महाराष्ट्रिक, गुजराती, पंजाबी, राजस्तानी, पुरभय्ये, बिहारी, बंगाली, नेपाळी, भूतानी, लेपचे गुरखे, तिबेटी, असमिये, नागा, केरळीय, आंध्र, कर्नाटक—

अवघे भाषाभेद एक्या अंगास सारून ते तुजपास आले. तुला गंगा-जळान न्हाऊं घालून कृतकार्य झाले. मूठभर तुजजवळची वाळू त्यांनीं पपरांत बांधली. ती नेऊन गंगेत विसर्जित केली. असं उत्तर दक्षिणेचं सामरस्य गेलीं अनेक सहस्रकं स्थापित होतं आहे. प्रचार न करतां, भाषणं द्यावीं न लागतां या देशाच्या एकतेचं हें सुचिन्ह हे सगळे मूकपणं प्रस्था-पित करताहेत! आणि या एकत्वाचा तू साक्षी! तुला नमस्कार! या भेदापलिकडे अभेदरूपानं तूं आहेस, तुला नमस्कार! सगळीं शांकर-पीठं ज्याच्या दर्शनासाठीं इथं एकवटलीं आहेत, त्या तुला नमस्कार! वारंवार नमस्कार!

जन्मभर नाना तीर्थं हिंडलों. आयुष्याच्या उतारवेळीं तुजसमोर येऊन उभा ठाकलों आहे. आळंदीचा मी कापडी आहें. माझ्या ज्ञानोबा-तुकोबाचा वहाणाधर म्हणून तुला नमस्कार! माझ्या सेना न्हाव्याचा-चोख्याचा प्रतिनिधी म्हणून तुला नमस्कार. ज्यांनीं जन्मभर पापं केलीं, त्यांचा दूत म्हणून तुला नमस्कार. आमच्या आशूचा बंधुबांधव म्हणून तुला नम-स्कार! तुला शत शत नमस्कार! सहस्र सहस्र नमस्कार! लक्ष लक्ष नमस्कार!

असा नमस्कार यथास्थान पोंचवून रिता झालों, आणि मग पुनः

मुक्कामावर आलों. रामभाऊ—मंगल—नीरा असं हें त्रिकूट स्नानं उरकून तयार होतं. त्यांना म्हणालों, कीं लवकर दर्शनास जा, आतां फारशी गर्दी नाहीं.

मग एकटाच समुद्रदर्शनासाठीं बाहेर पडलों. मंदिराच्या पश्चिम द्वारांतून आंत शिरून पूर्वद्वारानं बाहेर पडलं, कीं थोडकं चालल्यावर समुद्र. इथं समुद्र तसा शांत आहे, फारसा कल्लोळत नाहीं. तीरावर स्नानेच्छूंची गर्दी होती. स्त्रिया-पुरुष निःसंकोच मनांनीं स्नानं उरकीत होते. त्यांना पुनः कुंडस्नानं करून देवदर्शनाला जायचं होतं. मी उजव्या किनाऱ्यानं निघालों. यात्रेकरूंनीं करून ठेवलेलं टाळीत.

इथं हा थेट समुद्र. तीरावर असंख्य शंख-शिंपले, आणि जलवनस्पतींचीं कलेवरं. कश्या वनस्पती ? एक झुबा, इवलाल्या द्राक्षांच्या घडासारखा. कोवळा लुस. अति देखणा. नुकता तीरावर येऊन पोंचला होता. प्रवाळाच्या झुबक्यांसारखे कांहीं घोस. वाळून गेलेले. कांहीं रंगारंगांचे शंख. लहान आकारांचे. एक उजवा सांपडला. कांहीं सुंदर शिंपले. चुकलंच तें ! पिशवी आणायला पाहिजे होती. हें सगळं साठवूं कशामध्यें ?

पुनः परतलों. आमच्यासवें आळंदीकर गोखले. त्यांना म्हटलं, चला, शंख-शिंपले गोळा करूं. मग ते अन् मी समुद्रतीरावरच पण डावीकडे निघालों. प्रारंभीं एखादा घोस सुंदर वाटे. तो उचलून झोळींत टाकावा, तर पुढं त्याहून सरस दुसरा ! मग पहिला टाकून द्यायचा, दुसरा उचलायचा. स्पंज असावेत, तश्या शुष्क सागरी वनस्पती तर पुढ शेंकडों पडलेल्या. नाना रंगांच्या. हिरव्या, पारव्या, तांबूस. मग माजुऱ्यासारखे जवळचं टाकून देत नव्या देखण्या शंख-शिंपले,वनस्पतींनीं पिशवी तुडुंबली, आणि परतलों. चांगले मैलभर गेलों होतों.

गांवांत शिरलों, तर बर्व्यांचं प्रशस्त घर लागलं. वृद्ध बर्वे ओटीवर बसले होते. वर शिरलों. नमस्कार केला. परिचय दिला. गप्पा सुरू झाल्या. भले

भले नामवंत त्यांच्या इथंच उतरून, देवकृत्य करून गेले होते. मीं विचारलं,

"या परभाषिक देशीं देवाचं पुजारीपण तुम्हांस कसं मिळालं? किती पिढ्या इथं झाल्या?"

ते म्हणाले,

"पिढ्या नव्हे, मीच इथं आलों. वैदिकी म्हटली होती. परीक्षा दिली. चांगला उत्तीर्ण झालों. मग पुजारी नेमला गेलों. आतां थकलों, मुलं पाहतात."

बऱ्यांशीं बोलून झाल्यावर देवळाला वळसा घालून मुक्कामावर परतलों, तंवर स्टेशनावर जाण्याची घाई सुरू झाली होती. गाडींत बसल्यावर या-वेळीं मात्र बेटाचं संपूर्ण रूप ध्यानीं आलं.

पांच-सात मैल लांबी-रुंदी असलेलं हें बेट मुख्य भूमीपासून अगदीं सुटावलेलं आहे. समुद्रांत प्रचंड पूल आहे. बराच वेळ गाडी त्या पुलावरून जात असते. वसईजवळचा पूल, कलकत्त्याचा गंगेवरला पूल, भडोच-जवळील नर्मदेचा पूल, असे कांहीं पूल ध्यानीं आले खरे, पण या पुलाचा विशेष असा, कीं हा सगळा ऐन समुद्रांत बांधलेला आहे. स्टेशनवर उतरलों, तंवर सांजावलं होतं. आमचा व्हीडिओ कोच आमची वाटच पाहात होता. बसलों, आणि दि. १९ च्या पाहाटेस कन्याकुमारीला विवेकानंदपुरम्‌मध्यें पावते झालों.

कन्याकुमारीला एकूण तीनदां येणं झालं. पहिली वेळ, सुमारें तीस वर्षांपूर्वीं. श्री. मराठ्यांसवें केरळमध्यें महिनाभर भटकत होतों, तेव्हां. त्या-वेळीं मुख्य आकर्षण कन्याकुमारीचं होतं. देखणं मंदिर आणि त्यांतील अतिशय सुंदर मूर्ति पाहून केवळ लुब्ध झालों होतों. भारतभर हिंडणं झालं, कित्येक मूर्ती पाहण्यांत आल्या. जम्मूला रघुनाथजीच्या मंदिराभंवतालीं

असंख्य लहानुलीं मंदिरं आहेत. त्यांत एक काळ्या पाषाणाचा रांगता बाळकृष्ण आहे. निरुपम सुंदर ! बिर्लांच्या दिल्लीच्या वैभवशाली मंदिरांचे व्यवस्थापक मजसवें होते. त्यांना म्हटलं, भाईसाहब, तुम्ही इतक्या समृद्ध मंदिरांची व्यवस्था पाहतां, अशी सुंदर मूर्ति तुमच्या इथं आहे का, तें सांगा !

तो प्रामाणिक माणूस मान हलवीत म्हणाला, खरं सांगू ? मींही पुष्कळ मूर्ती पाहिल्या आहेत, पण या सारखी हीच !

दुसरी मूर्ति आठवते विदर्भांतली, मेहेकरची, श्रीविष्णूची. भव्य मूर्ति. मूर्ति नव्हे ती, जणूं मूर्तिकाराला पडलेलं तें स्वप्न आहे !

तिसरी ही अजोड मूर्ति कन्याकुमारीची. मुखावर जी काय कोवळीक आहे, म्हणून सांगूं ! ओहोहो ! अगदीं शपथपूर्वक सांगायचं, तर या पुजाऱ्यांनीं मूर्तींना वस्त्र नेसवून, अलंकारांचीं ओझीं घालून मूळ मूर्तिकारानं निर्मिलेलं सौंदर्य अगदीं झांकून टाकलेलं असतं !

एक विसरलोंच, आमची कराडची उत्तरालक्ष्मीची प्रतिमा. बिचारी लक्ष्मी खरी, पण निर्धन आहे. थोडी भंगलेली आहे. पण मूर्तिकारानं आपलं सगळं कसब पणाला लावलं आहे !

तर ती कन्याकुमारी पाहावी, ही आस होतीच, पण त्याहीपेक्षा याखेपेस आकर्षण होतं श्रीविवेकानंदांच्या खडकावरील भव्य स्मारकाचं. अकादमी पुरस्काराच्या निमित्तानं आम्ही सगळीं दक्षिणयात्रेला निघालों होतों, त्याही वेळीं याच स्मारकाच्या दर्शनाची ओढ लागली होती. योग असा, कीं त्या वेळीं या स्मारकाची कल्पना सर्वेषां अविरोधेन साकार करणारे एकनाथजी रानडे तिथं भेटले.

एकनाथजी जेव्हां मध्यप्रदेशांत आमच्या संघाचे प्रांतप्रचारक होते, त्या वेळींच मी तिकडे जिल्हा-प्रचारक होतों. मी थोडासा कवि आहें, तुकबंदी करूं शकतों, हें ही एकनाथजींना माहीत होतें. त्यामुळं त्या खेपेस



शाखा

आम्ही सगळे खासे पाहुणे म्हणूनच तिथं वावरलों. खासे म्हणजे काय? तर इतर बहुजनांच्या खोल्यांसारख्या खोलींतच एकनाथजींचं वास्तव्य. तशीच आमची व्यवस्था. तिथं सार्वजनिक उपाहारगृह—भोजनालय. त्यांतच आम्ही जेवलों. पण सगळीकडे अदब होती, आदर होता, आपुलकी होती.

जेटीवरून स्मारकाकडे जायची व्यवस्था तेव्हां विवेकानंद केंद्राकडे होती. आम्ही पाहुणे. तेव्हां आम्ही खास नौकेनं केंद्राकडे गेलों. तिथं मुक्त दर्शन घेतलं. एकनाथजींकडून सगळे प्रयास ऐकले. आपल्या एका परिचित मित्रानं हें एवढं अति भव्य आकारास आणावं, याची अतिशय धन्यता वाटली.

या वेळींही आमचं आरक्षण विवेकानंदपुरम्‌मध्येंच होतं. मात्र थोडी अव्यवस्था होती. आम्ही जवळजवळ चाळीस-बेचाळीस प्रवासी. कांहींची उतरायची व्यवस्था कुठं. कांहींची कुठं. स्नानगृह—शौचाची व्यवस्थाही लांब. पण हें महत्त्वाचं नव्हतं. महत्त्वाचा होता सूर्योदय. भराभरा सगळं उरकलं, आणि कॅमेरा घेऊन धांवलों किनाऱ्याकडे.

हें एकमेव स्थळ असं, कीं जिथं एका ठिकाणीं उभं राहून जलक्षितिजामधून उगवणारा आणि त्यांतच मावळणारा सूर्य पाहतां येतो! पौर्णिमेदिवशीं तर फारच मौज. इकडे सूर्यबिंब समुद्रांत बुडी देत असतं, आणि पूर्व समुद्रांतून त्याच क्षणीं पूर्ण चंद्रबिंब समुद्रांतून वर उठत असतं!

दोन उत्तम चित्रं घेतलीं. समुद्रांत कांहीं होड्या होत्या, त्यांच्या शेजारीं उगवणारं सूर्यबिंब—त्याचेही उत्तम फोटो. हळूहळू गर्दी जमूं लागली होती. मग तिथून सटकलों. भोजनगृहांत न्याहारी उरकून आम्ही दोघंच सिटीबसनं तिथून दीड-दोन मैलांवर असलेल्या कन्याकुमारीच्या मंदिराकडे धांवलों.

सकाळची वेळ. गर्दी अजून व्हायची होती. शांत, प्रसन्न दर्शन झालं. बाहेर असलेलीं असंख्य शंख-शिंपल्यांचीं दुकानं उघडत होतीं. हे शंख-

शिंपले हीं माणसं कुठून गोळा करतात, याचं मोठं कुतूहल होतं. रामेश्वरला तें शमलं होतं. पावसाळ्यांत समुद्र खवळतो, तेव्हां मेलेल्या जीवांचीं असंख्य कवचं तो लाटांबरोबर किनाऱ्यावर फेकतो. हे लोक किनाराभर हिंडतात, आणि तीं गोळा करतात. शंख-शिंपल्यांचे असे ढीगच्या ढीग कन्याकुमारीच्या दुकानांच्या वखारींतून पाहायला मिळाले. मात्र ते विकायला ठेवतात, तेव्हां जितके स्वच्छ असतात, तितके स्वच्छ किनाऱ्यावर सांपडत नाहींत. समुद्रजळांत असलेलं नाना परींचं गदळ, घाण, चिखल, असं त्यांच्यावर चिकटलेलं असतं. हे विक्रेते ॲसिडनं तें सगळं धुऊन काढतात. ॲसिडयुक्त पाण्यांत कांहीं काळ भिजत ठेवले, कीं हे शंख-शिंपले स्वच्छ, विकण्याजोगे होतात. पुनः त्यावर ॲसिडचीच प्रक्रिया करून हे व्यापारी शंखांवर चित्रं कोरतात, ग्राहकांचीं नांवं कोरून देतात. रामेश्वरला जाण्यासाठीं गाडींत बसायला बसमधून उतरलों, तेव्हां या विक्रेत्यांनीं आम्हांला गांठलं होतं. ज्यांना आपलं नांव शंखांवर कोरून हवं होतं, त्यांच्याकडून त्यांनीं कांहीं बयाणा घेतला होता, आणि पूल ओलांडून पुनः बसमध्यें बसूं लागलों, तेव्हां असे ते नांवं कोरलेले शंख घेऊन ते विक्रेते बसवर हजर झाले हो . हा एक चांगला उद्योग आहे. पण कुणीं तरी त्याला शिस्त लावायला हवी. नाना आकारांचे, असे पायचेंडूएवढाले शंख इथं पाहायला मिळाले. औषधिदृष्ट्या हा केवळ कॅल्शियम चुना असतो! कसकसे विचित्र त्यांचे आकार! कसे रंग! सगळंच अद्भुत! इथं भावटाव करावे लागतात. प्रारंभीं पंचवीस रुपये किंमत सांगून पुढं आठ-दहा रुपयांना तो शंखशिंपला मिळूं शकतो.

आमच्या संजीवनी मराठ्यांचा प्रताप अंदमानांत वायुदलाचा ऑफिसर म्हणून होता. त्यानं रिकाम्या वेळीं हजारों शंख-शिंपले गोळा करून पुण्यास आणले होते. त्यांची माहिती गोळा केली. पुस्तकं वाचलीं. जाती

ओळखून त्यांना नांव दिलीं, आणि मग टिळक स्मारक मंदिरांत त्यांचं प्रदर्शन भरवलं होतं! नखाएवढाल्या शिंपल्यापासून पायचेंडूपर्यंत सर्व आकारांचे शंख-शिंपले तिथं मांडले होते! उद्योग शोधील, त्याला निसर्ग हवा तिथं कच्चा माल पुरवीत असतो!

विवेकानंदपुरम्‌मध्ये परतलों, तो तिथं आमचे मित्र डॉ. वि. रा. करंदीकर पत्नींसह आलेले भेटले! मग गप्पाष्टकं! केन्द्रामध्यें योगा-विषयींचा एक वर्ग सुरू होता. देशभरांतून अभ्यासक तिथं गोळा झाले होते. त्या विद्यार्थ्यांसमोर 'गीतेचा संदेश' कीं अशाच एका विषयावर वि. रां. चं भाषण होतं. मात्र तें इंग्रजींत. इंग्रजी एरवीं मला कळत नाहीं. पण विषय परिचित होता. व्याख्यानास जाऊन बसलों. वि. रा. ही थोडे साशंक होते. इंग्रजींतून प्रगटपणं बोलायची त्यांना संवय नव्हती. ते मराठीचे पंडित. पण जाणकाराला कांहींही अशक्य नसतं. तासभर ते उत्तम बोलले. सगळ्या स्नातकांना व्याख्यान बहु आवडलं.

मला पाहिल्यावर व्यवस्थापक मजकडे आले. म्हणाले, आज करंदीकर गीतेच्या बाह्य स्वरूपाविषयीं बोलले, आपणही बोलावं, अशी आमची इच्छा आहे. म्हटलं, करंदीकर गीतेचे पण्डित. त्यांचा डॉक्टरेटचा विषयच वामन पडितांची यथार्थदीपिका असा होता. त्यांनीं नाना टीकाकारांचा तौलनिक अभ्यास केलेला, इंग्रजीचे ते जाणकार. मींही यथामति गीतेचं अध्ययन केलं होतं. तेव्हां गीतेच्या अंतरंगाविषयीं मी बोलेन. मात्र तें हिंदींतून. इंग्रजींतून मी हा विषय मांडूं शकणार नाहीं. तुटकं फुटकं बटलरी इंग्रजी मला येतं. त्यापलिकडे नाहीं.

शिबिरार्थी भारतभरांतून एकत्र झाले होते. त्यांना हिंदी भाषण कळलं असतं. पण— !

भाषण होऊं शकलं नाहीं! बहुत काय लिहिणें, हे विनंती!

सायंकाळीं आम्ही सगळेच पुनः मंदिरापास पोंचलों, सूर्यास्त पाहण्यासाठीं. आमचं सौभाग्य, कीं आकाश स्वच्छ होतं. उत्तम सूर्यास्त दिसला. उत्तम छायाचित्रं घेतलीं. समाधानांत परतलों.

दि. २० ला उठलों, पुनः गाडी घेऊन सगळींच मंदिरापास धडकलों. पुनः तिथून सूर्योदय धरून ठेवला, अन् मग उत्तर दिशेनं गाडी धावूं लागली. तासा दोन तासांत शुचिंद्रम्‌ला पोंचलों.

इथं एक विशेष आहे. ब्रह्मा-विष्णु-महेश-तिन्ही देवांची पूजा एकत्र केली जाते. आणि एक गंमत. मंदिराच्या प्राकारांत हनुमन्ताची प्रचण्ड, उभी मूर्ति आहे. हा मल्लांचा देव, तेव्हां स्वाभाविकच त्याला लोणी खायची आवड. त्या काळ्या कुळकुळीत मूर्तीवर लोण्याचा लेप करतात. पण शेवटीं हनुमंत हा वनवासी. तेव्हां त्याची पक्षिकुळाशीं मित्रता गृहीत धरायला हवी. एक काकपक्षी त्याच्या खांद्यावर बसून मानेपासलं लोणी भक्षीत होता !

दक्षिणेंतल्या कोरक्यांचा आणखी एक विशेष ध्यानीं आला. मंदिरांच्या गोपुरांवर वीर योद्धयांच्या असंख्य मूर्ती इकडे कोरलेल्या आढळतात. कां, कोण जाणे; पण त्या सर्वच सुदर्शन मूर्तींना दोन हत्तींसारखे सुळे कोरलेले आढळले ! दोनच ! दोन्ही ओठांबाहेर डोकावणारे.

मग गाडी जी धांवली, ती त्रिवेंद्रम्—तिरुअनन्तपुरम्‌ला थांवली. इथं एक बरं संग्रहालय आणि पशुसंग्रहालय आहे. तें पाहून घेतलं. सगळयांना ओढ हाती कोवालम्‌चा देखणा समुद्रकिनारा पाहायची. जवळच असलेल्या त्या सुंदर समुद्रकिनाऱ्यावर जाऊन पोंचलों. शेष सहयात्रिक समुद्रस्नानांत गुंतले, मी कॅमेऱ्याच्या साह्यानं समुद्रांत बुडी देणाऱ्या सूर्यमंडळाशीं कुस्ती खेळूं लागलों. किनाऱ्यावर उपलब्ध असलेल्या उपकरणांचा—चल

आणि अचल– उपयोग करून उत्तम सूर्यास्त घेतले. आमचे आजरी नुकते समुद्रस्नान करून परतले होते. त्यांना आसन मांडून किनाऱ्यावर बसवलं. दोन्ही हात अंजुळी करून मस्तकावर उभारायला सांगितले. त्यांवर सूर्यबिंब टेकतांक्षणीं एक चित्र ठोकलं.

कुणी दोघे चिनी पर्यटक शेजारीं उभे होते. मला ते जपानीच वाटले. मोठ्या कौतुकानं ते माझी धांवाधांव पाहत होते. मी त्यांना मोडक्या इंग्रजींत म्हटलं, कीं हा तुमच्या देशीं तयार झालेला कॅमेरा वापरून हें कौतुकाचं चित्र मी घेतों आहे. हंसून ते म्हणाले,

ओः ! वुई चायनीज़् ! नो जापनीज़् !

म्हटलं, मनांतल्या मनांत–मरा, मेल्यांनों !

सूर्य मावळून गेल्यावर तिरुअनन्तपुरम्‌ला मुक्काम केला. यूथ होस्टेलच्या इमारतींत राहिलों, आणि सकाळीं बस अलेप्पीच्या दिशेनं भरधांव निघाली. अलेप्पी ते कोट्टायम्, असा जवळजवळ तीन तासांचा प्रवास लॉंचमध्यें बसून खाडींतून करायचा होता. त्या प्रवासाविषयीं मोठं कुतूहल होतं. तीस वर्षांपूर्वीं मराठे आणि मी, दोघे असेच या मार्गानं अलेप्पीला उतरून कोट्टायम्‌पर्यंत खाडींतून प्रवास करीत गेलों होतों, त्याचं स्मरण झालं.

लॉंचमध्यें बसलों. या बंदरावर कित्येक लॉंचेस् उभ्या असतात. अर्ध्या-अर्ध्या तासानं त्या कोट्टायम्‌कडे सुटत असतात. आमच्या लॉंचचं नांव ‘सांता मारी’ कीं असं कांहींसं होतं. लॉंच यथाकाळ सुटली. दों बाजूंस पसरलेल्या अलेप्पीच्या, माडांनीं झांकलेल्या घरांमधून विस्तारलेल्या खाडीं-तून प्रवास सुरू झाला. कॅमेरा सरसावून बसलों, आणि भराभरा चित्रं घेऊं लागलों.

खाडी दोन्ही तीरांनीं बांधून काढली आहे. पाणी संथ असतं, प्रवास

अतिशय सुखाचा असतो. पण जलपर्णीचं इथं बाहुल्य आहे. ती कापीत सगळा प्रवास. मार्गांत अनेक बंदरं. बंदरं म्हणजे धक्के. घंटी वाजतांच लाँच त्या धक्क्याशीं लागायची. उतारू उतरले, कीं पुनः टण टण, कीं लाँचचा प्रवास सुरू. तीरावर सर्वत्र माड, आणि भाताचीं खाचरं. वाटेंत कोट्टायमहून येणाऱ्या लाँचेस् आणि वल्ह्यांवर चालणाऱ्या नावा भेटायच्या. भराभरा चित्रं घेत सुटलों, आणि अचानक ध्यानीं आलं, कीं फिल्म संपली आहे.

कॅमेरा नूतन परिचित होता. त्याच्या जोडणीशीं परिचय व्हायचा होता. कॅमेऱ्याच्या तळाशीं एक कळ असते. फिल्म गुंडाळण्यापूर्वी ती दाबावी लागते, हें ध्यानीं राहिलं नाहीं. तसाच मस्ती करूं गेलों. अलि-कडील गुंडी फिरवूं लागलों. ती धड फिरेना. मग सॉकेट उघडून कॅमेरा उघडायला धडपडलों. झडप उघडली. फिल्म बाहेर आली—

कन्याकुमारीचा सूर्यास्त, सूर्योदय, कोट्टायम्‌चा सूर्यास्त, अलेप्पीच्या खाडीचीं सुंदर चित्रं–सगळं वाया गेलं ! आई म्हणायची, चुलींत गेलं कृष्णार्पण ! हिंदींत म्हण आहे, फिसल पडे, हर गंगे !

आमच्या गडकऱ्याला शरण गेलों. त्याच्याकडून दुसरी फिल्म भरून, घेतली, आणि पुढल्या चित्रीकरणासाठीं सज्ज झालों.

अलेप्पीहून कांहीं अंतरावर खाडीचा फुगोटा खूप मोठा आहे. वाट नवख्याच्या ध्यानीं येत नाहीं. कुठं जायचं आहे, कळत नाहीं. मात्र लाँचच्या चालकांना ते बरोबर ठवकी असतं. ते योग्य दिशेनं, वळणं वळसे घेत, लाँच चालवीत असतात. खाडीला वाटेंत चौक आहेत—सडकांसारखे ! उजवा–डावीकडे फाटे गेलेले. नाक्यावर एखादी बत्ती टांगलेली. दों बाजूंस लहान लहान घाट. त्यांवर स्त्रीपुरुषें स्नान करीत असलेलीं. मधूनच एखादी नाना रंगांचीं पातळं नेसलेल्या सागरकन्यांनीं भरलेली नाव सामोरी येत असलेली. एका नावेतून पाणी उपसायचं एक

एंजिन वाहून चालवलेलं. असा तो प्रवास मोठा सुखाचा झाला. शेवटीं खाडी चिंचोळी होऊं लागली. दोन्ही तीरं जवळ येऊं लागलीं, आणि कोट्टायम् आलं. इथं मात्र खाडीच्या पाण्याला अतिशय दुर्गंधि येत होती!

कोट्टायम्ला आमचा कुमार गाडी सडकेनं इथवर आणून हजर झाला होता. एका खानावळीत जेवलों, शहाळी प्यायलों आणि बस पेरियारच्या दिशेनं सुसाट निघाली.

पेरियार! एक बहुत सुंदर अभयारण्य. पेरियार नदी अडवली. तिच्या पाण्याच्या दहा-बारा मैल औरसचौरस फुगोटा. त्यांत गच्च वनानं झाकलेली एक खूप मोठी टेकडी. चहूं अंगांस फाटे फुटलेली. तिच्या एक्या अंगास पेरियार हाऊस, आणि दुसरं एक वनविभागाचं उत्तम उतारूगृह. तिथपासून तों धरणापर्यंत एक घाट बांधलेला. वनविभागाच्या उतारूगृहांत त्या प्रचण्ड जलाशयांत ज्या नौकांमधून फिरून टेकडीवरील वन्य पशू निरखतां येतात, त्या नौकांचं आरक्षण करतां येतं. नौकांमधील प्रवास अदमासें दोन तासांचा. त्या दोन तासांत नाविक दर्शनेच्छूंना त्या प्रचण्ड टेकडीभोंवतीं फिरवतो. हें झालं नौकाप्रवासाचं. त्यावेगळ्या दोन सोयी तिथं उपलब्ध आहेत. हत्तीवर बसून अरण्यांत फिरतां येतं. त्याची व्यवस्थाही तिथंच होते. शिवाय कुणाला पायीं अरण्य भटकायचं असेल, वनविभागाचे दाखवडे तिथं उपलब्ध होतात.

यावेगळं कांहीं थोडा नौकाप्रवास केल्यावर लागणारं एक महागडं विश्रामगृह तिथं आहे, भर अरण्यांत शिवाय वॉच–टॉवर्स आहेत – थेट अन्तर्भागांत. रात्रीं त्यांवर बसून पशुजीवन निरखतां येतं.

पायीं भटकणं मला आवडलं असतं. पण तितका वेळ आम्हांपाशीं नव्हता. दि. २१ ला रात्रीं पेरियार हाऊस या शासकीय वसतिगृहांत

मुक्काम केला. खूप खोलवर अरण्यांत हें सुंदर वसतिगृह. पाहाटेस लवकर उठलों आणि एकटाच वसतिगृहासमोरच्या वनपथावर जाऊन बसलों.

भंवतालीं आकाशावेरीं पोंचलेल्या उंच उंच वृक्षांची दाटी. अति निबिड. चिखलाचा गोळा सुरीनं मधून दुभंग करावा, तसा त्या वृक्षसृष्टींत तो वनपथ कोरलेला. समोर वसतिगृहाची इमारत. इमारतीपासून इथपर्यंत असलेले विद्युद्दीप वगळतां शेष सर्वत्र गच्च अंधार दाटलेला. त्या वनपथाच्या दो भागीं रोवलेल्या दगडांपैकीं एकावर एकटा मी. आणखी कोणीही तिथं नाहीं. थोडं धुकं आकाशांतून उतरत असलेलं.

—आणि एकेक ध्वनि कानीं पडूं लागला. हूफ् हूफ् हूफ् ! बाक् बाक् बाक् ! ऊऽ ! ऊ ! ऊ !

रानकिड्यांचा चिरचिराट भेदीत वर उडणारे ते ध्वनि अति सावधपणं ऐकूं लागलों. कुणाचे हे ध्वनी ! भंवतालीं इतकं गच्च रान आहे. हें महाराष्ट्रांतलं, आपल्या परिचयाचं नाहीं. आईन नाहीं. बाहवा नाहीं, हिरडा नाहीं. खैर नाहीं. हीं झाडं बहुधा अपरिचित आहेत. आपल्या रानांत यांवेगळे कोल्हे, तरस, ऊद, डुकरं, ससे, भेकरं असे नित्य परिचयाचे प्राणी जे अनेकदां पाहिले आहेत, त्यांचा आवाजही परिचयाचा आहे. मात्र हे स्वर आजच कानीं पडताहेत. चित्त एकाग्र करून, ते ऐकत बसून राहिलों. एखाद्या पुतळ्यासारखा.

ऐकलं वाचलं होतं, कीं या रानांत वाघ आहेत. फार मोठी आशा नव्हती, पण उगीच वाटत होतं, कीं वाघाची दीर्घकाळ वनांत घुमणारी आरोळी कानीं पडेल. पण पडली नाही. हत्तींचं चित्कारणं मात्र खूप दूरवरचं कानीं पडलं. अगदी अस्पष्ट.

मजसारखंच कुतूहल आमच्या ठाण्याच्या कुलकर्ण्यांना असावं. ते एकटेच त्या धुक्यांतून उमटले. नाकावर बोट ठेवून त्यांना गप्प राहायचा संकेत केला, आणि दिवस उजाडण्यापूर्वीचं तें पशुसंगीत ऐकण्यांत भागीदार

करून घेतलं.

हळूं हळूं उजाळ वाढला. डांबरी वाटेवरून एक जण सायकलवर बसलेला वननिवासाच्या दिशेनं गेला. एकदम ताण उणावला. कळलं, कीं इथल्या रहिवाश्यांना हें नेहमींचंच असलं पाहिजे. मग त्या ध्वनींचं नवीनपणही मावळलं.

उठलों, प्रातःकर्मं उरकलीं, आणि बायकोला घेऊन वननिवासाकडे गेलों. नौकांचीं आरक्षणं होतीं, तिथं जाऊन तिकिटं काढलीं, आणि नौकांच्या घाटावर जाऊन उभा राहिलों. समोर पाण्यांत सताठ नौका तिष्ठत होत्या.

समोर वळणांवळणांमधून घुसलेलं तें पाणी. हा पाण्याचा तुंबारा त्या स्थळीं साठेपर्यंत त्या रानीं असलेल्या गगनभेदी वृक्षांचे त्या पाण्यांत उभे असलेले सांगाडे. पैल ती प्रचण्ड टेकडी — वृक्षांनीं गच्च झांकलेली. असा तो जागा मोठ्या नवलाचा, हें तर खरंच. आमचे संगीसाथी आणि वननिवासांत उतरलेले आणखी प्रवासी घाटावर जमू लागले. थोड्याच वेळांत वनविभागाचा कुणी एक शीख अधिकारी, त्याच्या मागं बंदुका खांद्यांवर असलेले दो चौ वनरक्षक, आणि दो चौ दुय्यम, अशी तुकडी येऊन घाटावर उभी राहिली. नौकावाहक एका नावेंत प्रवेशला. त्यानं इंजिन सुरू केलं. नाव घाटाला लावली. त्यांत तो अधिकारी आणि बंदूकधारी असे सगळे बसले, आणि भुर्रदिशीं नौका पाण्यांत शिरून दिसेनाशी सुद्धां झाली. दहा-वीस मिनिटांत आमच्या नौकेचे चालक पोंचले. नौकेचे नांव तरंगिणी, नवलिका, पुष्पवती, असं कांहींतरी बंगाली धाटणीचं असावं. चालकानं नौका घाटावर आणून लावली. आधीं वननिवासांत राहलेल्या प्रवाशांना त्यानं नौकेंत घेतलं. त्यांनीं पटापटा आंतल्या खुर्च्या धरल्या. मग आमचा क्रमांक. आमच्या नौकेंतील लोकांना छपराबाहेरच उभं राहावं लागलं. पण शेवटीं ध्यानीं आलं, कीं आम्हीच

भाग्याचे. सहज चहूं दिशा वळून पाहूं शकत असूं. यांतले खुर्च्याजीराव मात्र हें स्वातंत्र्य गमावून नुमतेच गणपतीबाप्पासारखे बसून राहिले. त्यांनाही मग आमचा हेवा वाटला असावा.

नौका निघाली. साकळलेलं धुकट चिरीत. जणूं सगळे वन्य पशू आमच्या नौकेची वाट पाहत, पाण्यापाशीं येऊन, आम्हांला 'कसं काय? बरं आहे ना? पोरं बाळं ठीक? तब्येत काय म्हणत्ये?' असं विचारण्यासाठीं ताटकळत असावे, अशी आमची धारणा. गळ्यांतली दुर्बीण काढून चहूं दिशा निरखूं लागलों. झाडांचे खुंट अथाह जळांत उभे, त्यांवर कांहीं पक्षी बसले होते, ते वगळतां चिटूट सुद्धां नाहीं! सपासपा पाणी कापीत नौका चालली अन् पलिकडील अरण्य-प्रदेशांत एक कुटीर उभारलेलं, त्या जवळच्या घाटावर जाऊन थांबली. रात्रीं तिथं मुक्कामास असलेला एक गोरकाय आणि मुखाला चर्चिलेल्या पावडरच्या सुवासानं महकत असलेली त्याची पत्नी— दोघं नौकेंत चढून आम्हां शेजारींच छपरावर येऊन बसलीं. त्या गोऱ्याजवळ एक चलत्चित्र ग्राहक होता. तो त्यानं स्टँडवर लावून ठेवला. नौका पुढं निघाली. बराच वेळ नुसताच वनप्रदेश. दोन्ही बाजवांना उंच उंच वृक्ष. त्यांच्या आश्रयानं उभ्या असलेल्या लता. अशी गच्च दाटी, तीपरतं कांहीं नाहीं.

अचानक कलकलाट झाला,

"आना! आना!"

'आना' म्हणजे हत्ती! होय. डाव्या हातास बेटावरील उंचवट्यावरच्या उंच उंच गवतांत दोन-तीन हत्ती स्वस्थ मनानं चरत असलेले दिसले. मीं त्या दिशेनं, दुर्बीण वळवली. बरोबर. तीन हत्ती होते. एक भला धिप्पाड, दोन ठेंगणे. मोठ्याला भले लांब सुळे. त्यांनीं आमची दखलही घेतली नाहीं. आपलं इथं तिथं सोंड वळवीत गवत उपटीत आणि तो कवळ तोंडांत खुपशीत राहिले!

गति थोडी मंद करीत नौका क्षणभर थबकली, अन् पुन्हां आपल्या वाटेनं निघाली. थोडे पुढं गेलों, तों तिची गति पुन्हा मंद झाली आणि पुकारा झाला :

"बैसा!"

होय, दोन की तीन पुष्ट गवे डाव्या हातास चरत असलेले दिसले. वळलेलीं शिंगं. पायांवर पांढरे पट्टे. केवढाले खांदे! मस्तींत ते चरत होते. हत्तींसारखे ते उंचावर नव्हते. तळांत होते. आम्हांला सहज दिसूं शकत होते. मजपाशीं दुर्बीण होती, मी स्वच्छ निरखूं शकत होतों. म्हटलं' एवढा स्वार्थ बरा नव्हे. बायकोलाही तें दृश्य दिसलं पाहिजे. मग तिला दुर्बीण दिली. अडचण अशी, कीं दुर्बिणीचीं भिंगं कमीअधिक करून तिला आपल्या दृष्टीशीं जुळती करून घ्यावं लागतं. बायको 'दिसलं, म्हणाली. खरं खोटं, ते गवे जाणोत! पुनः दुर्बीण हस्तगत केली, आणि चहूंकडे निरखूं लागलों.

नौका-चालक दोघे होते. एक नाव चालवीत होता, दुसरा आम्हांपास उभा राहून आम्हांला प्राणी दाखवीत होता. थोड्या वेळानं त्यानं एका झाडाच्या शेंड्यावर असलेला एक बनबिलाव – रानमांजर – दाखवला, आणि सताठ रानडुकरांची एक झुंड. एवढं वगळतां त्या सुंदर वनप्रदेशाची दोन तास सहल करूनही कांहीं पदरांत पडलं नाहीं!

मग थोडकं हंसून आम्हांपास उभा असलेला प्रदर्शक म्हणाला, सर, तुम्ही चुकीच्या वेळीं नौकेंत चढलांत. अजून वन्य पशू आपापल्या जागा सोडून बाहेर पडले नाहींत. दुपारीं चारच्या सुमारास ते सगळे स्वच्छंद हिंडत असलेले पाहायला मिळतात. आपल्या नांवें स्वतंत्र नौका राखून ठेवतां येते. भाडं केवळ एंशीं रुपये.

उतरतां क्षणीं आधीं जाऊन स्वतंत्र नौका आरक्षित केली, सायंकाळीं चार वाजतांची.

सकाळचे नऊ साडे नऊ वाजले आहेत. भरपूर वेळ हाताशीं आहे. काय करावं ? कीं हत्तीवर बसावं ?

लग्न झालं, तेव्हां वरात निघाली नव्हती. एक-दोनदां हत्तीवर बसलों होतों, पण एकदां बहुत वर्षांपूर्वीं एका साधूच्या हत्तीवर, आणि दुसऱ्यांदा पुण्यास पेशवे पार्कमध्यें नातीला घेऊन. पण वनविहार केला नव्हता, आणि बायकू आणि मी, असे दोघे कधींच मिरवलों नव्हतों.

हत्तीच्या स्वारीचं बुकिंग होत होतं, तिथं गेलों, आणि दोन तिकिटं काढलीं. तासाभरांत हत्ती येऊन हजर झाला. मात्र त्याच्या पाठीवर पुरेसं पालाण नव्हतं. गोणपाटाची एक गादी होती, दोरांनीं बांधलेली. माहुताला हिंदी–मराठी-इंग्रजी एक अक्षर कळत नव्हतं. तिकीट दाखवूं शकणाऱ्या प्रवाशांना हत्तीवर बसवायचं, आणि रानांत फिरवून आणायचं.

त्यानं हत्ती घाटाशेजारच्या खड्ड्यांत उभा केला. आधीं बायकोला वर चढवलं, आणि मग गळ्यांत कॅमेरा, दुर्बीण असलेले गोनीदा स्वतः गजारूढ झाले. दोर घट्ट धरून ठेवायला सांगितलं. माहुताच्या हातीं केवळ एक काठी होती. हत्तीच्या कानांमागं त्यानं पायांनीं डिवचलं, आणि हत्ती चालूं लागला.

एक तर आसन हें सुखासन नव्हतं. पाय फांकून बसावं लागलं होतं. दुसरं, हत्तीच्या पाठीचा कणा ढुंगणाला चांगला रुतत होता. तिसरं, हत्ती मागंपुढं झोले देत चालला होता. नीराही कशीबशीं जीव मुठींत धरून बसली होती. पण मग ‘ बाळपणींचा काळ सुखाचा ’ जगत असतां पाठ केलेला एक श्लोक स्मरला :

देतें नृपास सुखदुःखहि राज्य तैसें
छायार्थ छत्र धरिलें स्वकरांत जैसें ॥

छत्रीची सावली उपभोगायची असेल, तर मग हातानं तिचा दांडा

धरून ठेवल्यामुळं लागणारी कळही सोसायला हवी. गजारोहणाची हौस ना! मग हे कष्ट भोगले पाहिजेत!

मन त्या विपत्तींतून बाहेर काढलं, अन् मार्ग निरखूं लागलों. हत्ती पेरियारच्या पात्राच्या कडेनं चालला होता. स्थानिक स्त्रिया धुणं धुवीत होत्या. आपल्या इकडं जनाबाई, ठकुबाई, दगडाबाई ओढ्या-नद्यांवर धुणीं धुतात, तशाच. तशीच बडबड. तसाच कल्लोळ. भाषा न कळणारी, इतकाच भेद. नदीचं पात्र रुंद, पाणी कमी. नदीला मिळणारा एक ओढा ओलांडीत हत्ती पलीकडे गेला, अन् मग तो झाडांच्या दाटींत शिरला. झाडं-झुडुलीं खूप उंच. माथे एकमेकांत मिसळलेले. त्यांच्या सावलींतून तो मंद गतीनं झोके खात चालला. मी कॅमेऱ्याचा उपयोग करीत क्षण धरून ठेवूं लागलों. अवचित एका वृक्षाच्या माथ्यावर एक पांडा दिसला. मुंगसा-सारखं हें जनावर, पिंगट रंगाचं. शेंड्यावर बसून तो स्वस्थपणं भंवताल निरखीत होता. टाळी वाजवून त्याचं लक्ष आपल्याकडे वेधावं, असा विचार आला. पण आसन डगमगत होतं, मागंपुढं झोके खावे लागत होते. एका हातानं दोर गच्च धरून ठेवला होता. एकाच हातानं टाळी वाजवायची कला अवगत नसल्यानं तो बेत रद्द केला.

दुसऱ्या एका झाडाच्या बेचक्यांत एक मजेदार पक्षी बसला होता. काळीं लांब पिसं, गळ्याखाली पांढरा पट्टा. तोही ध्यानस्थ असावा. हें असं सृष्टिनिरीक्षण करतां ध्यानीं आलं, की हत्ती आतां सडक ओलांडून पैलच्या झाडींत शिरतो आहे. तिथंही झाडांचा तसाच कालोवा. गर्द छाया, मधून मधून उन्हाचे कवडसे. मध्येंच वाटेंत एखाद्या ठिकाणीं फांद्या खूप लोंबलेल्या. माहूत, नीरा, मी, तिघांनाही खालीं वाकावं लागे. हत्ती मात्र तसाच फांदोऱ्यांची तमा न बाळगतां त्यांमध्यें शिरत असे.

कांहीं काळ असं वनभ्रमण केल्यावर हत्ती पलिकडील मोकळवनांत निघाला. आतां उजवीकडे गर्द झाडी, तर डावीकडे पेरियारला मिळणारा

आणखी एक प्रवाह.

शेवटीं घाट आला. हत्ती नेमक्या जागीं जाऊन उभा राहिला. उच्या मारीत खालीं उतरलों. बायकोकडे वळून म्हटलं,

"नीरे, आतां वरात निघाली नव्हती, असं तुझं गाऱ्हाणं तुला गातां येणार नाहीं हां!"

ठणकत असलेलं अंग चेपीत ती हूं म्हणाली!

जेवण उरकलं, डुलकी काढली, अन् चार वाजतां सोमण दांपत्य, प्रताप पाटील, रेखा पाटील, पिंकी-रमा हीं कच्चीं निंबं, डॉक्टर कुलकर्णी, चलच्चित्रकार गडकरी पतिपत्नी, अशीं दहा-वीसजणं जाऊन घाटावर पावतीं झालों. आमची वेगवती येऊन घाटावर हजर झाली. तिकिटं तपासलीं गेलीं, नौकेंत बसलों, आणि ठरल्या मार्गानं निघालों. अगदीं संध्याकाळीं देखील अर्धा पाऊण तास कांहींच दिसलं नाहीं. पण मग अचानक वन्य पशूंची कृपादृष्टी आम्हांवर वळली, आणि किती पाहूं आणि किती न पाहूंसं होऊन गेलं!

टेकडीच्या माथ्यावर सहा हत्ती. चांगले धिप्पाड. उत्तम दर्शन घडलं. अगदीं ते दृष्टीआड होईपर्यंत दुर्बीण डोळ्यांसमोरून काढलीच नाहीं. नाव आपल्या गतीनं चालली, तों पुन: ओरडा झाला, हत्ती हत्ती!!

होय, दहा हत्तींचा एक कळप चरत होता. त्यांचे कान थडाथडा हलत होते. शेपट्या माश्या वारीत होत्या. सोंडा झाडांचे फांदोरे तोडीत होत्या, तोंडांत खुपशीत होत्या. नावेची गति मंद झाली. एका गज-राजानं आवाज काढला. कोणी म्हणालं, तो आपल्या थांबण्यानं नाराज झाला आहे. पण माझ्या मतें तो बहुधा विचारीत असावा, कीं तुमच्या देशीं निवडणुकीचं वातावरण काय म्हणतंय्?

पुढं निघालों, तर एक गवा आम्हांकडे दृष्टी लावून सावकाश स्वस्थ

उभा होता. नौका वळण घेऊन पुढं चालली, तर एका मैदानांत चांगला तीस-पस्तीस सांबरांचा कळप ! तीं सगळीं पांगून चरत होतीं. आमच्या उपस्थितीची त्यांनीं दखलसुद्धां घेतली नाहीं. कांहीं क्षण तिथं रेंगाळून नौका पुढं चालली, तों चार हत्ती मैदानांत स्वस्थपणं चरत होते. गड-कऱ्यांनीं त्यांचं भरपूर चित्रण केलं. ते चांगले निवांत, हव्या तशा पोझेस् देत होते.

कामना सफल झाली होती. एकटा वाघ कुठं दिसला नव्हता, पण तो दिवसा दिसतही नसावा. अतिशय संतुष्ट मनानं नावेंतून उतरलों, तों अगदीं जवळ, पेरियारला मिळणाऱ्या ओढयापलीकडे दहा-वीस रानडुक-रांचा कळपच्या कळप ! एक एकुल असा माजलेला ! परस्परांच्या हातांवर टाळ्या देतां देतां हात अगदीं दुखूं लागले.

तृप्त मनानं झोपलों, दिवसभराचं आठवीत. तेवीसची पहाट उजाडली, तों वार्ता कळली, कीं नळाला पाण्याचा थेंब नाहीं ! मग खालीं जाऊन कसंबसं हाततोंड धुतलं, सामान गाडीपाशीं आणून टाकलं अन् एकटा कालच्या जागीं जाऊन उभा राहिलों. कुणी उत्तरेंतले लष्करी अधिकारी बसच्या थांब्यावर येऊन थांबले होते. ते, त्यांचं सगळं कुटुंब. रामराम शामशाम झालं. त्यांनीं पुसलं, केव्हां आलांत ? कायकाय पाहायला मिळालं ? सगळी यादी दिली. ते कपाळ ठोकीत म्हणाले, गेले चार दिवस पायीं जंगल भटकलों, एका हरणापलिकडे कांहींही सांपडलं नाहीं !

पांच-दहा मिनिटांत आमची बस आली, आणि माझ्यासमोरच बंद पडली ! इंजिनांत कांहीं बिघाड झाला होता ! चला, म्हणजे दोन-तीन तासांची निचिंती !

मग त्या शांत, वरून धुक्याचे थेंब टपटपत असलेल्या धुईभरल्या पहाटेस एकटाच पुढं निघालों. गळ्यांत कॅमेरा. पक्ष्यांचे अनेक आवाज

एकांत एक मिसळलेले, सगळा मार्ग निर्मनुष्य. दोन्ही बाजूंस प्रचण्ड वृक्षांची दाटी, आणि त्यांच्या माथ्यांवर गच्च धुकट साकळलेलं. चालतच राहिलों. कांहीं वेळानं प्रकाश वाढूं लागला, धुकट मात्र कमी झालं नाहीं. एक मोठं वळण. पुनः वृक्षसृष्टि. दूरवर पिंगट रंगाचीं वानरं ओरडताहेत. आतां वृक्ष परिचयाचे भेटूं लागले. फताड्या पानाचा साग. चंदन. हिरडा. तळांत गुलबक्षी. टणटणी.

अनेक पांखरांचे स्वरही ओळखीचे. कवडा. नवल असं, कीं केवळ पावसाळ्यांतच सह्याद्रींत गाणारी गोपिका इकडे चक्क हिवाळा डोकावूं लागला असतां आपल्या मधुर तानांनीं आसमन्त व्यापून टाकीत होती.

रस्ता चालत एक–दोन रानकोंबडेही मला ओलांडून पैल गेले.

तृणपुष्पं तर अगणित होतीं. एक जांभळ्या पेलेदार फुलांचं रोप. त्याला शिडशिडीत उंच तुरा. त्यावर चहूं दिशांनीं पराग. लाजाळूचं रोपही आढळलं, त्याच्या पानांवर दंवबिंदू सांकळले होते. तरोटा होता, एरंडही डोकावला. झेंडूसारखं, पण तांबडंभडक एक तृणपुष्प. दो बाजूंना ब्राह्मी आढळली. उंच वृक्षांवर रानमिऱ्यांचे वेल चढलेले दिसले. क्वचित् कॉफीचीं रोपीं. आणि वस्तीच्या खुणा आढळूं लागल्या, तसे फणस घमघमूं लागले.

वस्ती दाट झाली, आणि पोटांत कांहीं घातलं पाहिजे, अशी जाणीव झाली. तंवर आठ वाजायला आले होते. एक लहानसं उपाहारगृह दिसलं. इकडे या देशीं इडली, दोसे, उत्ताप्पा, सांबार, चटणी, पापडम् असा आहार कुठंही मिळूं शकतो. यावेळीं नशिबांत असेल, तर गरम गरम इडली-चटणीही मिळण्याची शक्यता.

अंबाभवन, अशी इंग्रजी पाटी. आंत शिरलों. दोन जुनाट टेबलं, तीन खुर्च्या. एक तरतरीत मुलगा सामोरा आला.

“ इडली है ? ”

" हां–"

" चटनी ? "

" मिलेगी–"

" हां, तो लाना, दो इडली चटनी–"

थोड्याच वेळांत वाफा निघत असलेल्या दोन इडल्या एका बशींत घेऊन तो हजर झाला. दुसऱ्या बशींत चटणी. मन प्रसन्न झालं. इडली तोडून मुखीं घास घातला. वा वा ! अशी मऊ ! लुसलुशीत ! तोंडांत ठेवतांच विरघळली ! या सगळ्या प्रवासांत इतकी सुंदर इडली मिळाली नव्हता. आणि मूल्य ? एका इडलीचे केवळ तीस पैसे ! आणखी दोन इडल्या मागवल्या, आणि विचारलं,

" दूध है ? "

" मिल्क ? "

" हां हां–"

" मिलेगा ! "

थोड्याच वेळांत ग्लासभर साखर घातलेले उत्तम दूध ! किंमत एक रुपया ! वाहवा ! पोटभर न्याहारी झाली. बाहेर पडलों, तों पायीं येत असलेले आमचे सहयात्रिक दिसले. सगळ्यांना शुभवार्ता कथन केली. सगळ्यांनीं अंबाभवनमध्यें धांव घेतली. हां हां म्हणतां सगळं इडलीपात्र रिकामं झालं ! दूधही खलास !

हो ना करतां करतां दुपारीं दोन वाजतां आमचा कोच दुरुस्त झाला, आणि एक मुश्किल घाट उतरून, कोट्टायम डावीकडे टाकून कुमारनं रात्रीं ८ च्या सुमारास कोच कोचीनमध्यें नेऊन उभा केला. ठरलं, कीं इथं चावम्याव खाऊन घ्यावं, आणि मुक्कामाला कालाडीस जावं, तिथं पोंचून एका बऱ्या विश्रांतिगृहाचा शोध घेऊन हाडकं बिछान्याच्या स्वाधीन केलीं. कोचीन हें फार मोठं नगर. स्मरतं, कीं एक उत्तम बंदर.

पण या वेळीं आम्हांला बंदर आणि गोद्या पाहण्यांत फारसा रस नव्हता. आदि शंकराचार्यांचं गांव डोळेभरी पाहावं, हें या वेळचं आकर्षण.

डिसेंबरची चोवीसावी तिथि. पहाटेस उठलों. एका भिडूला सवें घेऊन पूर्णा नदी शोधीत गेलों.

सुमारें तीस वर्षांपूर्वीं एकदां कालडी पाहिली होती, मराठ्यांसवें. तेव्हांच अंधुक स्मरण असं, कीं नदीला सुंदर घाट होता. तिथं स्नान उरकलं होतं. श्रद्धायुक्त मनानं आदि शंकराचार्यांच्या मंदिरांत जाऊन दर्शन केलं होतं. कुठं तरी एक रात्र राहिलोंही होतों. त्यावेळीं एकूणच हें तीर्थ आवडलं होतं.

पूर्णा नदीच्या पात्रांत उभं राहतांक्षणीं ध्यानीं आलं, कीं तीं स्मरणं अंधुक होतीं. पूर्णा नदीच पात्र भलं रुंद. पाणी फार नाहीं. मोठंथोरलं वाळवंट. मग परतून सगळ्या सहप्रवाशांसवें आमचा कोच घेऊन पुनः नदीवर गेलों. वाळवंटांत वस्त्रं ठेवून स्नान उरकलं. उगवत्या सूर्यास अर्घ्यप्रदान केल. शांत मनानं गायत्रीजप केला. मोठं प्रसन्न वाटलं. मग अगदीं तीरावर असलेल्या शंकर मंदिराकडे गेलों

जिथं शंकराचार्यांच घर होत, तिथंच आतां मंदिर आहे. स्वतः त्यांचं, आणि शेजारीं त्यांच्या मातेचं, आर्यांबेचं. शिवगुरू आणि आर्यांबा या सद्‌गुणी मातापितरांच्या उदरीं हें लेकरूं जन्मलं. बालपणींच सर्वज्ञता वरी तयातें, हा ज्ञानोबांनीं सांगितलेला सिद्धांत इथं अगदीं तंतोतंत खरा उतरला. अतितरळ मेधा, चारी वेदांचं अध्ययन वयास आठ वर्षं पूर्ण होतां होतां संपवलं. विरक्ति उपजली. कौमार्यांतूनच संन्यास घ्यावा, अशी इच्छा बळावली. माता संमति देईना. एके दिवशीं हें लेकरूं नदीवर स्नानास गेलं. तिथं मगरीनं पाय धरला हें पाहून नदीवरील आर्यांबा आक्रोश करूं लागली. लहानग्या शंकरानं तिला म्हटलं, कीं तूं संन्यास

घ्यायला अनुमति देशील, तरंच हा मगूर पाय सोडील. नाहींतर तुम्हां अम्हां हेचि भेटी! आर्यांबा म्हणाली, बाबा, रे, संन्यासी का होईनास, तूं मला हवा आहेस! मगरानं आपला पाश काढून घेतला. लेकरूं बाहेर पडलं, आणि उत्तरेच्या दिशेनं चालूं लागलं. नर्मदातीरावर आलं. तिथं ब्रह्माणीस गोविंदयति किती वर्षांपासून या शिष्योत्तमाची वाट पाहत होते. गुरुशिष्य भेटी झाली. संन्यास ग्रहण झालं. बाराव्या वर्षापर्यंत शास्त्रांचं अध्ययन पूर्ण केलं. श्रीगुरूंनीं गीता, उपनिषदं आणि ब्रह्मसूत्रं यावर काव्यं लिहिण्याची आज्ञा केली. सोळावं वर्ष उलटेपर्यंत काव्यं लिहिलीं. पुढं दिग्विजयास निघाले. बौद्धमताचं निरसन कुमारिलभट्टांनीं केलं होतं. त्यांचे शिष्य मंडनमिश्र यांच्याशीं वाद करून त्यांना जिंकलं. त्या काळीं सांख्य मताचा प्रभाव सर्वत्र मोठ्या प्रमाणांत होता. त्याच्या प्रकृति पुरुषांवर आपल्या तीव्र बुद्धिमत्तेनं नवं रूप चढवलं. त्यांना माया ब्रह्माची कुंची लेववली. अद्वैताची स्थापना केली. चहूं दिशा हिंडले. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम, सर्वत्र–मठस्थापना केली. केवळ एक लंगोटी आणि एक कमंडलू घेऊन तो महात्मा त्या काळीं बदरीकेदारला गेला, श्रीनगरला गेला. जगन्नाथपुरीला गेला. द्वारकेस गेला. रामेश्वरास गेला. या लंगोटीधारी योग्यानं भारतभर अद्वैत मताचा प्रचार–प्रसार केला, आणि बत्तिसाव्या वर्षीं समाधि घेतली.

मध्यंतरीं आईचं देहावसान झाल्याचं कळलं. तिचं प्रेत तसंच पडलेलं! संन्याशाची आई! अग्निसंस्कार करणार कोण? मग स्वतः पुनः कालाडीस आले. एकट्यानें प्रेत नदीवर नेलं. तिथं अग्निसंस्कार केला. तिचं मंदिर स्थापन केलं!

अशा या लोकोत्तर पुरुषाच्या मूर्तीसमोर उभा राहिलों. नम्र झालों. मंदिरांत वरतीं चहूं बाजूंस चित्रपट्टिका कोरून संपूर्ण शंकरचरित्राचं दर्शन घडवलं आहे. तें पाहिलं. कृतकृत्य झालों. या दक्षिणयात्रेंतील एक प्रधान

हेतु अशा रीतीनं संपन्न झाला !

मंदिराबाहेर आलों, तों कळलं, कीं इथून पुण्यास फोन लागूं शकतो. दुसऱ्या क्षणीं लागतो.

लावला ! वीणा फोनवर आली. देव आले. कुठं पुणं ! कुठं कालाडी. पण नंबर फिरवतां क्षणीं दुसऱ्या क्षणीं एकमेकांचं कुशल एकमेकांना कळलं. नंतर ऐकलं, कीं ही उपग्रहाची कृपा. थेट त्यावरून दुसऱ्या क्षणीं कुठलंही केन्द्र मिळूं शकतं.

चिंता होती भोपाळची. तिथं ते विकट मृत्युकाण्ड नुकतं घडून गेलं होतं. भोपाळला कितीतरी आत्मीय. त्यांचेकडे एक्सप्रेस, रिप्लायपेड तारा केल्या होत्या—निघण्यापूर्वीं, कीं कसे आहांत, तें कळवा. उत्तरं आलीं नव्हतीं जीव तसेच टांगणीस लावून दक्षिण—यात्रेचं प्रस्थान ठेवलं होतं. फोनवर कळलं, कीं ते सगळे कुशल आहेत ! श्वास टाकला !

व्हीडियो कोच गुरुवायूरच्या दिशेनं निघाला, आणि कालाडीबाहेर एक प्रचंड स्तंभ आहे, तिथं थांबला. शांकरभक्तांनीं हें एक अद्वितीय करून ठेवलं आहे !

केरळ देशीं खिश्चनांचं आणि मुसलमानांचं बाहुल्य. सर्वत्र त्यांच्या चर्चेस्‌चे कळस आणि मशिदींचे मीनार आकाशांत मिरवत असलेले. इथं भक्तमंडळीनं हा आठमजली स्तंभ उभारला ! प्रत्येक मजल्यावर शंकर-चरित्र कोरलेलं. हा उत्तुंग स्तंभ त्या सर्वच कळस—मीनारांपेक्षां उंच आहे, अद्वैताचं यश गातो आहे !

गुरुवायूर ! तें फार वर्षांपूर्वी मंदिरप्रवेश सत्याग्रहामुळं सर्वत्र गाजलेलं तीर्थ !

भलं प्रचण्ड मंदिर. इथला विशेष, म्हणजे बाहेर सर्वत्र प्लास्टिकच्या पिशव्यांमधून बंद केलेले चुरमुरे ! ढीगच्या ढीग लागलेले ! ते ओलांडीत मंदिरांत पोंचलों. भला प्रशस्त प्राकार. देवदर्शनासाठीं भक्तांची खूप दाटी.

मंदिर श्रीकृष्णाचं. मूर्ति फार सुंदर. पण उपचारांनीं वेढून टाकलेली. मोकळं पोटभर दर्शन नाहीं.

दर्शनाचा उपचार उरकला. मंदिराबाहेर वाघनखं मिळालीं. भलीं थोरलीं. खरेदी केलीं; आधीं दोनशें म्हणाला. मग वीसला दिलीं.

आतां परतीचे वेध लागले आहेत.

दिवसभर प्रवास सुरू. एका धरणावर तासभर थांबलों, आणि सायंकाळीं मेट्टापालयम्‌ला पावते झालों. इथून उदकमण्डलम्–उटीला रेल्वेनं जातां येतं. एका हॉटेलमध्यें उतरलों. शेष प्रवासी रेल्वेनं उटीला जाणार होते. आम्हीं दोघांनीं कोचनं जाणं पसंत केलं. कारण, कुठंही तो थांबवितां येणार. छायाचित्रं घेतां येणार!

दि. २५ ला उठतांक्षणीं नीलगिरीचं दर्शन झालं. विशेष असा, कीं केरळांत किंवा आंध्र–कर्नाटकांत अन्यत्र कुठं फारशा दिसल्या नाहीत, त्या पोफळींच्या गर्द बागांची इथं केवळ दाटी होती!

सकाळीं सातला आमचे इतर मित्र समोरच्याच रेल्वे–स्टेशनकडे निघाले. आमचा कोच आम्हां दोघांस घेऊन उटीच्या दिशेनं. जों जों डोंगर चढूं लागलों, तों तों देखण्या दृश्यांची जणूं झडी लागली. खूप गर्द झाडी. खूप उंच डोंगर. किती? तर उटीजवळच्या दोडाबेट्टा शिखराची उंची समुद्रसपाटीपासून ८६४० फूट आहे! म्हणजे आमच्या कळसूबाईपेक्षां सुमारे तीन हजार फूट उंच!

वळणं आणि वळणं, प्रत्येक वळणागणिक नवं दृश्य समोरून जाई. ज्ञानोबांनीं म्हटलं :

> मागीलिये क्षणींची अंगें। पारुसीं म्हणोनिया वेगें।
> दृष्टि सांडोनि रिगे। नवेया रूपा॥

आधल्या क्षणाचं अंग शिळं झालं, म्हणून चित् प्रतिक्षणीं नव्या

रूपांत प्रविष्ट होते!

उटी चढत असतां त्या चित्‌चा साक्षात्कार प्रतिक्षणीं होत होता! उंच आकाशांत एकुटवाणा मेघ होता, आणि त्याच्या तळवटीं उदक-मडलम्‌चा विस्तार! एक, सुंदर लाल फुलं फुललेला वृक्ष दिसला. मीं त्याचं नामकरण शाल्मलीवृक्ष असं केल. खरोखरीच्या शाल्मली शब्दाचा अर्थ कोशांत सिल्क कॉटन ट्री असा आहे. असेना का! या क्षणीं तर हा वृक्ष म्हणजे शाल्मली वृक्षच!

वाटेंत कोन्नूर नांवाचं गांव. ह्याच्या अलिकडे एका थांब्यावर कुमारनं गाडी उभी केली. इडली—चटणी इत्यादि प्रातरुपाहार संपन्न झाला, आणि मग विक्रेत्यांच्या जवळ जाऊन उभा ठाकलों. काय होतं त्यांच्यापाशीं? तर लवंगा, मिरीं, जायफळं, वेलदोडे! तीस वर्षांपूर्वीं हें विपुल आणि स्वस्त होतं. आतां महाग आणि प्लास्टिकच्या लहान लहान पिशव्यां-मधून! ठीक आहे, बाबा! करतां काय? गरज आहे, घेतलं पाहिजे. तुकाराम बाबा सांगून गेले,

आपणा लागे काज वाण्याघरीं गूळ। त्याचें यातिकुळ काय कीजे॥

कशांतून का आणा ना! वाण्याच्या यातिकुळाशीं आपला काय संबंध? आपल्याला हवा गूळ. तो मोकळा असो, कीं प्लास्टिकच्या पिशव्यांत असो!

सकाळीं दहा वाजतां उदकमण्डलम् स्थानकाबाहेर कोच उभा राहिला. उनाडायला बाहेर पडलों.

उंची, एक सुंदर उद्यान, आणि दोडाबेट्टा हें दक्षिणेंतील सर्वांत उंच ठिकाण, यापलिकडे उटीला पाहण्याजोगं कांहीं नाहीं. उंची खूप आहे, थंडी चांगली सुरेख असते. म्हणजे दुसरे दिवशीं सकाळीं दंवाच्या थेंबांचं गोठून बर्फ झालं होतं. यावेगळी उटी ही मुंबईच्या फोर्ट विभागासारखी;

खूप महागडी आवृत्ति आहे, इतकं म्हटलं, कीं पुरे !

११॥ वाजता आमचे सहप्रवासी घेऊन छोटीशी गाडी उलटं एंजिन लावून स्टेशनांत प्रवेशली, आणि तिनं फुस्स् करीत दम टाकला. सगळे यूथ होस्टेलमध्यें मुक्कामास गेलों. लागतं जोगतं करून, नव्या वाहनांत बसून दोडाबेट्टा या सर्वोच्च शिखरावर पावते झालों.

खूप दूरवरचं दिसतं. लांब आकाशांत फिरणारीं मेघमंडलं. तळांत इवलीं इवलीं गांवं. शिखरावर तृणपुष्पांची आणि फुलोरलेल्या वनस्पतींची दाटी. थंड, प्रसन्न हवा. चार–दोन छायाचित्रं घेतलीं, आणि तासाभरानं उतरलों, ते उद्यानांत पावते झालों. दक्षिणेंत एक वैशिष्ट्य. प्रत्येक ठिकाणीं तिकिट काढावं लागतं. वनस्पति–उद्यान, आणि त्याच्या उतरत्या पातळीवर सुंदर हिरवळ. एका झाडापाशीं कुण्या दाक्षिणात्य चित्रपटाचं शूटिंग सुरू होतं. झाडाच्या दुबेळक्यांत बसलेलीं प्रियकर आणि प्रेयसी मशीनवर सुरू असलेलं गीत म्हणत प्रेम करीत होतीं. पुनः, पुनः, पुनः तोच अभिनय. प्रेयसीशीं प्रेमसंकेत करीत प्रियकर खालीं उडी मारतो, असं तें दृश्य होतं. असं प्रेम करीत असतां प्रेयसीच धबेलदिशी खालीं कोसळली. मग धांवाधांव. डॉक्टर. मलमपट्टी. मग रंगभूषाकार धावले. पुनः नायिका ताजीतवानी झाली, आणि मग प्रियकरावर प्रेम करायला तिला दोघां-तिघांनीं पुनः झाडावर चढवली ! अशी मज्जा !

संध्याकाळ होऊं लागली होती. बाजारांत भटकण्यांत मला रस नव्हता. मग यूथ होस्टेलच्या चहूं दिशा भटकलों. रात्रीं सपाटून थंडी पडणार होती. होस्टेलमध्येंच भाड्यानं ब्लांकेटं मिळतात, त्यांतलीं दोघांसाठीं दोन आणलीं. चुटुपुटु मिळालं तें खाऊन घेतलं. झक्क बंदोबस्त करून निद्राधीन झालों.

सव्वीसची पहाट. गरम पाणी उपलब्ध होतं. स्नान उरकलं. गवतावर पसरलेले हिमकण निरखीत चहूं दिशा भटकत राहिलों.

एक गोष्ट मनांत पक्की रुतून बसली आहे. या यात्रेनं दुसरं काय दिलं, तें असो, दोन मानसकन्या मिळाल्या. पहिली, आमच्या रामभाऊ सोमणांची पत्नी, मंगल. उटीचंच स्मरण— पहाटे गच्चीवर उभा होतों ब्लांकेट पांघरून. तों ती आमच्या निवासांतून गच्चीवर आली. म्हणाली.

" आप्पा, एक काम आहे...."

" सांग ना, ग, बाई ! "

" कांहीं नाहीं, एक नमस्कार करायचा आहे.... "

नवलानं पुसलं,

' नमस्कार ? अजून परतायची वेळ तर दूर आहे ! '

" नाहीं, हो ! आज इथं उटीला काकडत्या थंडींत मीं पहाटेस गार पाण्यानं स्नान केलं...."

" शाब्बास ! शाब्बास ! काय आशीर्वाद देऊं ? "

" हवा तो ! "

तिनं नमस्कार केलान्, नुसताच पुटपुटलों. शब्द कांहीं मुखावाटे फुटला नाहीं. कदाचित् थंडीमुळं असेल.

दुसरी, आमचे प्रताप पाटील— त्यांची वहिनी, रेखा ! शाब्बास या मुलीची, कीं आपल्या तीन लहान मुली घेऊन एवढ्या मोठ्या प्रवासासाठीं बाहेर पडली ! धाकटी रमा, असं मोकळं प्रसन्न हंसूं !

कुणी म्हणालं, आम्ही आप्पांचे फोटो पळवूं !

रेखानं काय म्हणावं ? म्हणाली,

" तुम्ही फोटो पळवा, मी आप्पांनाच पिशवींत घालून माझ्या घरीं घेऊन जाईन ! मग ? "

तेंही असो, नऊच्या सुमारास उटी सोडून कोच खालीं निघाला. अनेक

दुर्गम वळणं. अरुंद रस्ता. नीलगिरीचीं गहन वनं. मार्गात एक पाश्चात्त्य, अर्धी चड्डी नेसलेला, उघडा, सायकलला अडकविलेल्या दोन पिशव्या, असा घाट चढत असलेला दिसला! कसे निर्भय असतात हे पाश्चात्त्य प्रवासी!

तळांत गुडलूर. तिथं अन्नब्रह्माचं सेवन केलं, आणि दुपारीं दोन वाजतां मृदुमलाई अभयारण्यांत पावते झालों.

मृदुमलाई मद्रास राज्यांत, तर बांदीपूर कर्णाटकांत, अशीं हीं दोन्हीं अभयारण्यं एकास एक जोडलेलीं आहेत. म्हणजे मृदुमलाईमध्यें जे आपण शिरतों, ते सडकेनं बरंच अंतर धांवल्यावर एकदम बांदीपूरची हद्द ओलांडून कर्णाटकांत शिरतों. बांदीपूर अभयारण्य मागील खेपेस आम्हीं सर्वांनींच पाहिलं होतं. ॲकॅडमी अवार्डच्या वेळीं वीणा, विजय, मृणाल, मधुरा, रवि, अशोक, नीरा अशीं आम्हीं सगळींच वनविभागाच्या जीपमध्यें बसून, बांदीपूर अभयारण्यांत शिरलों होतों. तीन–चार हत्ती, पांच–सात हरणं असं किरकोळ पदरीं पडलं होतं.

बरीच चर्चा झाल्यावर एक ट्रक ठरवला. सामान सगळं मृदुमलाईच्या, मयूरनिवासांत ठेवून सगळे ट्रकमध्यें आरूढ झालों, आणि तो आमचा युद्धरथ वनपरिक्रमेस निघाला.

हैद्राबादेस सफारी–अरण्यांत वेगळा अनुभव. तिथं सिंह वनांत मोकळे, आपण बंदिस्त यानांत बसून आखीव मार्गानं भटकायचं. कांहींसा तसाच अनुभव इथ. ठरलेले रस्ते. त्यांवरून गाडी धावणार. पदरीं पडेल, तें पडेल. साडेचारशें रुपये देऊन ट्रकांत आरूढ झालों, पैसे पाण्यांत गेलेसा साक्षात्कार पदरीं पडला. गाडी रानांत शिरली. किती वेळ आपली वनपथ तुडवते आहे. कावळासुद्धां दिसला नाहीं. शेवटीं प्रवास अगदीं संपतां संपतां दोन गवे दिसले. वीणा ज्या वृत्तीला माजुर्डी वृत्ती म्हणते, तसे

माजुर्डे. त्यांनीं आम्हांकडे ढुंकूनही पाहिलं नाहीं. पुढं सताठ सांबरांचा एक थवा. जिला पांडा म्हणून ओळखलं जातं, ती एक जंगली खार एका झाडाच्या शेंड्यावर बसली होती. माथ्यावर तुरा असलेला घारीएवढा एक पक्षी चुटतापुटता दिसला. चोवीस किलोमीटर अंतर पार केल्यावर शेवटीं अगदीं मार्गाशेजारीं एक शिंग गळालेला सांबर. संपले साडेचारशें रुपये!

परतलों, तों कळलं, कीं इथं जवळ हत्तींचं ट्रेनिंग सेंटर आहे. मग तसेच तिकडे धांवलों. पंधरा-वीस हत्ती ठाणबंद केलेले. एक भला थोरला मतंगज अगदीं काळा कुळकुळीत. दोघांना भले थोरले सुळे. एका पिलाला माहूत रोट चारीत होता. तें उगीच टिवल्याबावल्या करीत रोट भक्षीत होतं.

परततांना मात्र हत्तींच्या पिल्लांनीं केलेली गणपतीपूजा पाहायला मिळाली, बुवा! एक लहानसं गणेशमंदिर. त्यासमोर दोन माहूत दोन पिलांसवें उभे. त्यांनी संकेत करतांच एका पिलानं सोंडेंत तबक धरून आरती केली. त्याच वेळीं दुसरं सोंडेंत धरलेली घंटा वाजवीत होतं. मग दोघांनीं मिळून मंदिरास प्रदक्षिणा घातली. त्या भटजीबुवांनीं ताम्हण आम्हासमोर फिरवलं. आम्हीं त्यांत टाकलेले पैसे माहुताच्या खिशांत!

याच रात्रीं मयूरनिवासाच्या ओसरींत झोपलों असतां रात्रभर अनेक वन्य पशूंचे आवाज तेवढे ऐकायला मिळाले!

दि. २७ ची सकाळ. मयूरनिवास सोडलं, साडेसहा वाजतां, आणि निघालों बांदीपूरकडे. निघतांक्षणीं डाव्या हातास एक ठिपक्याचं हरीण दिसलं. चारदोन किलोमीटर गेल्यावर रस्त्याच्या अगदीं कडेला दिसला एक हत्ती! थोड्या अंतरावर, भुईवर बसून सोंडेनं माश्या मारीत असलेला! इतका जवळ हत्ती तर पेरियारलाही नाहीं, मुदुमलाईलाही नाहीं! काय आम्ही भाग्यवंत! गाडी थोडी मागं घ्यायला लावली. सावधपणं सगळे

उतरले. जपून, तो अंगावर धांवला, तर पळायचा मार्ग सुरक्षित राखीत त्याकडे चालले.

पण फुस्स ! तो थोडा एक्या अंगास वळतांक्षणीं त्याच्या गळ्यांतली घंटा वाजली ! म्हणजे हा पाळीव ! हात्तिच्या !

पुन: वाहनारूढ झालों, आणि बांदीपूर वनविभागाच्या इमारतीसमोर येऊन उभे राहिलों. पाहिलं, तर वनखात्यांतलेच बहुधा चाळीस-पन्नास जवान सगळ्या जीप्सपाशीं थांबले होते. जीपा अगदीं सुटण्यांत होत्या. म्हणजे तें दार बंद. आमचा रथ आंत न्यायची सोय नाहीं. हत्तींवर बसून वनांत हिंडतां येतं, म्हणे, पण हत्तीही मोकळे नाहींत ! थोडा वेळ तसेच तिथं रेंगाळलों. तों सताठ सांबरं दिसलीं. निर्भयपणं तीं वनपथावर चरत होतीं. शेजारीं चौथऱ्यावर हत्तीची कवटी मांडून ठेवलेली.

शेवटीं शहाण्यांनीं निर्णय घेतला, कीं इथं जीप्सची वाट बघत ताटकळावं लागेल. त्या मिळाल्या, आणि भटकायला बाहेर पडलों, भाडं द्यावंच लागेल अन् कांहीं वन्यजीवन दिसेलच, असा भरंवसा नाहीं ! तेव्हां चलो म्हैसूर !

ठीक आहे, बाबा ! म्हैसूर तर म्हैसूर !

दहा वाजतां चामुंडी टेकडीवर पोचलों. चार-दोनदां देवीचं दर्शन घेतलं असल्यामुळं मी दर्शनाऐवजीं छायाचित्रणासाठीं इकडे तिकडे भटकत राहिलों.

महिषासुराची भली मोठी मूर्ती एक्या चौथऱ्यावर उभी आहे. थेट मारवाडी रंगांत रंगवलेली. एक्या हातीं भला थोरला नाग धरलेला. कंबरेस प्रचंड तरवार.

पाहिलं, कीं दहा—वीस पाश्चिमात्य प्रवासी येऊन महिषासुरासमोर गाडींतून उतरले. सगळे महिषासुराच्या मूर्तीसमोर बसले, आणि त्यांनी आपलीं छायाचित्रं काढवून घेतलीं ! सुंदर गोऱ्या स्त्रिया, आणि मागं तो

धिप्पाड, भ्यासूर पुतळा !

उत्तम शहाळीं विकायला होतीं. त्यांच्याजवळच मोठमोठ्या पपया. मग यथेच्छ न्याहारी केली. तिथून निघालों, ते तळांत राजवाड्याजवळ जाऊन थांबलों. वाड्यांतले कित्येक विभाग बंदच होते ! एक विचार मनीं डोकावून गेला, कीं एका पुरुषासाठीं– त्याच्या कुटुंबासाठीं म्हणूं या, पण केवढा प्रचंड हा प्रासाद ! त्यांत किती सोयी ! कशीं कशीं सोनेरी दालनं !

आठवण झाली गडकऱ्यांच्या चिंतातुर जंतूची. जाऊं द्या, झालं !

भोजनाची वेळ टळून चालली होती. एका उपाहारगृहांत शिरलों, आणि तिथं पंधरा–वीस दिवसांनंतर प्रथम पालक–पनीर आणि परोठा भक्षायला मिळाला.

एका अतिथिगृहांत सामान टाकलं, आणि कलासंग्रहालय पाहण्यास बाहेर पडलों.

मोह होता रविवर्म्यांचीं मूळ चित्रं पाहायचा. त्या आधीं खालच्या दालनांत म्हैसूरच्या एका मिशाळ, जेमतेम रूप असलेल्या राजाचीं चित्रं पाहावीं लागलीं. रेसिडेंटबरोबर. हत्तीवर बसलेला. रंगपंचमी खेळत असलेला ! काय हा सोस !

वरच्या मजल्यावर रविवर्म्यांचीं भलीं प्रचण्ड चित्रं लटकावून ठेवलेलीं. इतक्यांदा तीं पाहिलीं, पण मन कांहीं भरत नाहीं. वाटतं, आतां ही सैरंध्री डोळ्यांवरचीं तीं मृदु लांब बोटं बाजूस सारील, आणि तिच्या मुखावाटे त्या उन्मत्त कीचकासाठीं शापवाणी बाहेर पडेल !

रविवर्म्यांचं कसब असं, कीं गेलीं पन्नास पाऊणशें वर्षं तीं चित्रं आमच्या अगदीं परिचयाचीं होऊन गेलीं आहेत. चौकटींतून खालीं उतरून आम्हांसवें वावरूं लागलीं आहेत. मत्स्यगंधा ही अशीच असेल. तो शंतनुही असाच असला पाहिजे. मात्र तिचा पिता काय हींच वस्त्रं

लेत असेल ? काय कीं, बाबा !

मन तिथं रेंगाळत ठेवून जे बाहेर पडलों, ते थेट वृंदावन उद्यानांत.

केवढं प्रचण्ड उद्यान ! किती लक्षावधि विद्युद्दीप ! कशी ती त्यांची शोभा ! अगदीं खुळावायला होतं. आणि हें उद्यान पाहण्यासाठीं सगळा भारतवर्ष इथं एकत्र झाला आहे. बगाली, पंजाबी, शीख, जाट, पुरभय्ये, वऱ्हाडी, खानदेशी, असमिया, माळवदेशीय, गुजराती, नेपाळी, एतद्देशीय, पाश्चात्त्य, पौर्वात्य. हजारों स्त्रीपुरुष इथं या सोनेरी सायंकाळीं एकत्र झाले आहेत. विद्युद्दीपांची आणि जळधारांची ती देदीप्यमान क्रीडा पाहताहेत. पुलकित होताहेत. कुठं आहेत ते कानडी–मराठी वाद ? कुठं आहेत तीं प्रांताप्रातांचीं भांडणं ? छे छे ! कांहीं खरं नाहीं, एवढंच एक सत्य ! शेष सर्व मिथ्या !

माणसं ! माणसं ! माणसं ! अगदीं मुंबईच्या लोकलमधील गर्दीचं स्मरण होतं. नको त्या ठिकाणीं !

रात्रीं शांत झोंप. दि. २८ ला पाहाटे जाग, तों कानांवर पडलं,

श्रीवेंकटेशाचलपते तव सुप्रभातम् !

किती बरं वाटलं ! दक्षिणेंत सर्वच या वेंकटेश्वरचलपतीचं साम्राज्य आहे. सुस्वर म्हटलेली ती प्रार्थना मन स्थिर करायला कशी साहाय्यभूत होते ! बायबलांत म्हटलं आहे,

The word was God !

किती खरं आहे ! अगदीं औरंगाबादेस पाहाटेच्या वेळीं ऐकलेली सुस्वर अजान देखील अशीच सुखवून गेली होती ! पण इथवरच हें चक्र थांबत नाहीं. मग सुरू होतात दुराग्रह. तुमच्या मंदिरांचे कळस आमच्या मशिदींच्या मीनारांहून उंच असतां कामा नयेत ! मरा, रांडेच्यांनो !

साडेसहाला म्हैसूर सोडून बाहेर पडलों, रंगनथेतु पक्षिअभया-

रण्याच्या दिशेनं. वाटेंत शें शें, दोन दोनशें पाळीव बदकांचे थवे दिसले. कावेरीचे पाट. तळीं. भरपूर ऊस. भाताचीं खाचरं.

अभयारण्याच्या प्रवेशद्वारीं गाडी थांबली. उतरलों, आणि वॉचटॉवर-पाशीं उभे राहिलों. दारुण निराशा! भीषोण! दारुण! एक तळं, मध्य-भागीं कांहीं झाडं. त्यांवर दहा–वीस जलकाक. पांच–दहा वटवाघुळं. चार–दोन मोर दिसले.

अरे, धूत! आमचं वेदान्तंगल कसं समृद्ध होतं!

साडेआठाच्या सुमारास श्रीरंगपट्टणम्ला पावते झालों. श्रीरंगाचं प्रचण्ड मंदिर. टिपूचं, हैदरअलीचंही समाधि–स्थळ. त्याचा उन्हाळी राजवाडा. मुख्य म्हणजे टिपू ज्या स्थळीं मारला गेला, तें स्थळ तिथं एक छोटासा दगड उभारला आहे. त्यावर कोरलं आहे :

The body of Tipu Sultan was found here.

गेल्या वेळीं आमच्या मधूला त्या स्मृतिस्थळाजवळ बसवून त्याचं एक बरं छायाचित्र घेऊन ठेवलं होतं. टिपूची समाधि मात्र वैभवशाली आहे. सुंदर काळे संगमर्मरी स्तंभ. आमच्या मंगलचं एक सुरेख चित्र घेऊन टाकलं.

शहाळीं मिळालीं, आधाशासारखीं पिऊन घेतलीं. खरोखरी या देवा-घरच्या औषधाला तुलना नाहीं. वीस–बावीस दिवसांचा हा अथक प्रवास, हें प्रतिदिवशीं मिळेल तिथं, मिळेल तें अन्न भक्षिण्याचे अत्याचार–हें सगळं सुसह्य झालं असेल, तर तें शाहाळ्यांमुळं!

आतां ओढ लागली आहे. श्रवणबेळगोळ्याची. कोच त्या दिशेनं धावूं लागला. जमिनीचं सुपीकपण संपलं. पुनः नगर जिल्ह्यासारखी ओसाडी सुरू झाली आहे. नापीक भूमि. मोठमोठाले धोंडे. तांबडी भुरभुरीत शेत-जमीन. ऊन्ह तापतं आहे.

अकरा वाजतां श्रवणबेळगोळा आलं. इथं यायची ही तिसरी खेप. गेल्या वेळीं आमचं कुटुंब सगळं इथं येऊन पोंचलं, त्या वेळीं दिवस मावळला होता. अंधार झाला होता. द्वारं बंद !

किती विनवण्या रावण्या केल्या. म्हटलं, सुदूर महाराष्ट्रांतून इथं मुद्दाम दर्शनासाठीं आलों आहोंत. वीणा मराठीची प्राध्यापिका तिला—

श्रीचामुंडरायें करवियलें
गंगराजें सुत्तालें करवियलें

हा आदिम मराठी भाषेंतला शिलालेख — तो पाहायचा आहे.

पण नाहीं ! बाहुबलीचं टेंकडीवरील मंदिर, म्हणे, दोघांच्या ताब्यांत. पुराणवस्तु विभाग, हें केंद्राचं खातं. त्या वेगळी एक स्थानिक समिति. मंदिर बंद करताना दोघांचींही कुलुपावर सिलं लागतात. तेव्हां आतां तें उघडणं अशक्य. तुम्ही इथं रात्रीं राहा. तुमची सर्व व्यवस्था करतों. पाहाटेस मंदिर उघडेल, तेव्हां सुखानं दर्शन घ्या !

निराश होऊन परतलों होतों. तो वीणेच्या वाटचा नमस्कार त्या शिलालेखाला घालायचा होता !

इथला बाहुबलीचा पुतळा म्हणजे एक फार मोठं आश्चर्य आहे. भुरक्या खडकाची नुसती बोडकी टेकडी. वर औषधासाठीं देखील गवताचं एक पातं उगवत नाहीं. टेकडी नांवानं जो बोध होतो, त्याहून अगदीं वेगळं असं हें प्रकर्ण आहे. पृथ्वींतून वर उमटलेला एक प्रचण्ड पाषाण. निमुळता होत गेलेला. त्याचा वरचा, भाग चहूं अंगांनीं तासून काढला. शेंसवाशें हात उंचीचा एक भला प्रचण्ड स्तंभ तेवढा मधोमध ठेवून शेष खडक फोडून मोकळा केला. आणि मग त्या प्रचण्ड स्तंभांतूनच एक अतिशय सुंदर, उभा, मुद्रेवर शांत, स्निग्ध भाव असलेला पाऊणशें फूट उंचीचा नग्न पुतळा कोरला. केवढं नवल ! पुतळा संपूर्ण नग्न आहे. केवळ कमरे-भोंवतीं एका वेलीचीं चार दोन पानं. मस्तकावर कुरळे कुंतल. म्हटलं आहे :

तैसे जयाचे हात। निर्व्यापार ॥
जे सदा रिते मोकळे।

ज्ञानोबांना अभिप्रेत असलेले हात पाहायचे असतील, तर ते बाहुबलीला – श्रवणबेळगोळयाला आलं पाहिजे. मराठी भाषकांना गर्व वाटायला हवा, कीं हा पुतळा ज्यानं कोरविला, आणि त्या भंवतींची पौळी ज्यानं रचली, ते दोघेही – चावुंडराय आणि गंगराज, मराठी भाषक होते! हें महाराष्ट्राचं कर्णाटकावर ऋण आहे.

पोंचतांक्षणीं टेकडीच्या सुमारें पांचशें कोरीव पायऱ्या चढायला प्रारंभ केला. पायऱ्या उंच नाहींत, आणि दो बाजूंना गज लावले आहेत. मात्र जुतीं खालीं ठेवून, मोकळ्या पाउलीं पायऱ्या चढाव्या लागतात. हें स्थान दिगंबर जैनांचं. त्यांचं महातीर्थ आहे हें. दिगंबर मुनि श्री एलाचार्यजी यांनीं पांच–सात वर्षांपूर्वीं बाहुबलीच्या मूर्तीला पूर्णाभिषेक करविला होता. दक्षिणेंत जात असतां एलाचार्यजी तळेगांवीं आले होते. त्यांच्या दर्शनास गेलों होतों. तेव्हां त्यांनीं स्वाक्षरी करून दिलेलं एक पुस्तक मजपाशीं आहे.

मूर्तीपास गेलों. बहु गर्दी होती. चार–दोन छायाचित्रं घेतलीं. अवघड असं आहे, कीं समोरून संपूर्ण पुतळ्याचं छायाचित्र घेतां येत नाहीं.

उतरूं लागलों, तों तळांतल्या तलावांत मधोमध कारंजं उडत असलेलं दिसलं. वरूनच तो चतुष्कोणी तलाव, भंवतालचीं घरं, माड, कारंजं या सर्व व्यूहाचं एक सुबक चित्र घेऊन टाकलं. खालीं पोंचल्यावर कळलं, कीं भोजनास अजून वेळ आहे, आणि तलावाच्या पैल चंद्रगिरी नामक दुसऱ्या टेकडीवरही सुंदर मंदिरं आहेत. चढाव कांहीं मूळ टेकडीएवढा नाहीं.

मग ती चढून गेलों. ओहो हो! छायाचित्रकारासाठीं तर हा स्वर्ग आहे! काय काय घेऊंसं होऊन गेलं. वर चंद्रगुप्त मौर्यकालीन एक

सुंदर मंदिर आहे. बाहुबलीची मुख्य मूर्तीहून लहान दुसरी मूर्ति आहे. आणि ज्यानं गोमटेश्वराचं तें देखणं शिल्प कोरलं, त्यानं आपल्या हस्ताक्षरांत कोरलेला एक लेख आहे. एक सुंदर, पन्नास पाऊणशें फूट उंचीचा स्तंभ आहे. मंदिरं इतकीं आहेत! असे सुंदर त्यांचे आकार! शेवटीं उतरावं लागलं, कारण जठराग्नीला आहुती देऊन हळेबीडला निघायचं होतं.

अडीचला प्रवासास प्रारंभ, सवाचारला हळेबीडला पोंचलों. छे छे! वर्णन सुद्धां करतां येणार नाहीं, असं दिव्य शिल्प इथं आहे. केवढं भव्य मंदिर! गर्भगृह, विमान, मंडप, सभागृह—सगळं सगळं मूर्तींनीं खच्चून भरलेलं. सुमारें सहाशें वर्षं हें मंदिर उभारलं जात होतं! शेवटीं वेड लागायची पाळी आली. काय मूर्तींचं देखणेपण! कसे त्यांचे हावभाव! कसा त्यांचा अभिनय! कशा त्यांच्या मुद्रा! मान खालीं घातली, कॅमेरा बंद करून ठेवला, आणि परतून देवळाभंवतालच्या कट्ट्यावर बसून राहिलों! हें पेलविणही अशक्य!

गाइड बडबडत होता, कीं हें महादेव मंदिर होयसळांनीं रचलं. यवनांच्या आक्रमणावेळीं सगळं मंदिर मातींत पुरून ठेवलं होतं. कळस नाहीं. माझं तिकडे अजिबात लक्ष नव्हतं. मी माझ्यांतल्या छायाचित्रकाराच्या पराभवाची खंत करीत बसलों होतों. एवढं खरं, कीं ही मनुष्यनिर्मिति नव्हे, अहा देवकृत्यमिदम्!

चांगलं अंधारल्यावर बेलूरला पोंचलों. एका सभागृहांत पथारी टाकली. सकाळीं छन्नकेशवाचं मंदिर—जें पूर्वीं पाहिलं होतं—पाहण्याचे संकल्प करीत झोंपलों.

एकोणतीस उजाडली. पाहाटे गृहस्वामीनं एक रुपया घेऊन स्नानास गरम पाणी दिलं. उत्तम उपमा खाऊं घातला. दिसूं लागतांच कॅमेरा घेऊन

मंदिराकडे पळालों.

आनंदराव नामक उत्तम गाइड लाभला. तो परोपरीचं सांगत होता. एकेका मूर्तीचं वैलक्षण्य सांगत होता. एकेक मुद्दा उलगडून सांगत होता. एक अभिसारिका. एक रूपगर्विता. एक नम्रा. एक शीलवती. एक दर्पणांत रूप न्याहाळीत असलेली. एक केशसंवाहन करीत असलेली. पण आतां त्याच ऐकूं, कीं यांचीं छायाचित्रं घेऊं ? मग मीं त्याची क्षमा मागितली. आणि कॅमेरा घेऊन सुटलों.

विष्णुवर्धन होयसळानं जकणाचार्य अमरशिल्पी या कोरक्याकडून मंदिराचा प्रारंभ करविला. त्याच्या चार पिढ्या एकशें पांच वर्षं मंदिर बांधीत होत्या ! गोपुराच्या बांधणींत विजयनगरच्या कृष्णदेवरायाचा हातभार लागला आहे.

नुकता सूर्योदय होत होता. मग गोपुराचं उगवत्या सूर्यासमवें एक चित्र घेतलं. समोर एक मण्डप. सूर्यबिंब त्याच्या आड ठेवून त्याचं एक चित्र घेतलं. आमच्या तुकडींतल्या धासाळकरपत्नीला खांबां-जवळ उभी करून चित्रं घेतलीं. अशीं जवळजवळ पन्नास छायाचित्रं एका वेलूर मंदिराचींच घेतलीं ! तिथंच एक षड्भुज गणपति दिसला. ज्ञानो-बांचा गणपति षड्भुज आहे. सहसा न आढळणारं हें शिल्प. तेव्हां त्याचंही चित्र घेऊन ठेवलं.

शेवटीं साडेदहा वाजतां सहप्रवासी फारच निकड करूं लागले, तेव्हां कॅमेऱ्याचं झाकण लावून गाडींत बसलों, आणि मग प्रवास सुरू झाला चिकमंगळूर–शिमोग्याच्या दिशेनं. वळखीचा देश सुरू झाला. नांवं कधीं काळीं ऐकलेलीं. मुंबईस कितीक कारवारकडले मित्र आहेत. गांवांचीं नांवं, तींच मुळीं त्यांचीं आडनांवं. उदाहरणार्थ, हळदीपूर !

ठीक सव्वा पाच वाजतां कुमारनं गाडी गिरसप्पाच्या धबधब्यापाशीं नेऊन उभी केली !

हे दक्षिणेंतले दोन्ही धबधबे कर्णाटकांत. तिसरा दूधसागर, तोही गोव्यांत, म्हणजे दक्षिणेकडेच. नर्मदा दोन-तीन ठिकाणीं पात्रांतच उडी घेते. धावडीकुंड. भेडाघाट. पण तिथं कोसळत्या प्रपाताची उंची फार नाहीं. शें-दीडशें फूट, म्हणजे डोक्यांवरून पाणी गेलं. खांडव्याहून इन्दूरकडे रेल्वेनं निघालं, कीं पाताळपाणी नामक स्टेशन आहे. तिथं असाच एक प्रपात, पण तोही इतका खोल नव्हे. आमच्या या इथं खंडाळ्याजवळ उल्हास नदी. दरींत उडी घेते, मोठं सुंदर स्थळ. पण शें-पांचशें फूट खोली, झालं डोक्यावरून पाणी. आणि तिथं पाणी अगदीं थोडं. उन्हाळ्या-नंतर उल्हासची धारा अगदींच क्षीण होते. महाबळेश्वरीं वेण्णा नदीचीही तीच कथा. त्याचं क्षीण स्मरण झालं. सतलजच्या भाकडा गांवाजवळ सिटापा नामक कोंडीमधून सतलजही अशीच खूपच वेगानं दरींत उडी घेते. भाकडा गांव आतां धरणाखालीं गेलं आहे. तें अस्तित्वांत होतं, तेव्हां मी त्याच्या चौकांमधून हिंडलों होतों. त्याचं एक सुरेख छायाचित्र मजपास आहे. नवल जोग धबधब्याचं—गिरसप्प्याचं दुसरं नांव—हें, कीं इथं एक तर प्रवाह सर्वाधिक खोल उडी घेतो. शिवाय पाणलोट खूप मोठा—होता, कोणे एके काळीं. काका कालेलकरांनीं त्या जलप्रपाताचं इतकं वेधक वर्णन करून ठेवलं आहे ! तें वाचून मोठी उत्सुकता होती—हा धबधबा पाहायची.

गोकाक पाहून झाला होता, तोही खूप वर्षांपूर्वी. गाडगेबाबांसवें असतां मी आणि बाबा दोघेही गोकाकला गेलों होतो, एकोणीसशें छत्तीस सालीं. तेव्हां वेळांत वेळ काढून धांवत धांवत तो प्रपात पाहून आलों होतों. आतां इतक्या सायंकाळीं हा जोग पाहायचा योग अगदीं सामोरा चालून आला होता. सायंकाळ झालीच होती—वयाची आणि दिवसाचीही!

बस थांबतांच कॅमेरा सांवरला, आणि सरळ धबधब्याकडे धांवलों. राजा, राणी, रोअरर अशा तीन नांवांनीं पाण्याचे हे तिन्ही प्रवाह

ओळखले जातात. रोअरर ? कुठं आहे त्याची गर्जना ?

अगदीं माथ्यावर जाऊन उभा राहिलों. कठडे बांधले आहेत, जिथून सुखेनैव पाहतां येईल, अशीं ठिकाणं तयार केलीं आहेत. अगदीं रेलिंग-वरून वांकून पाहिलं !

छे ! आचमनीभर पाणी खडकावरून खालीं उतरत होतं ! अगदींच निराशा झाली !

इथं वरतीं शरावतीला धरण बांधलं आहे, म्हणे ! सगळा प्रवाह तिथं अडविला आहे. धरण भरल्यावर उरतं, तें चुळूकभर पाणी खालते सोडतात. धरण बांधणारांनीं केवढं प्रचण्ड सौंदर्य दृष्टीआड करून टाकलं आहे ! आठवड्यांतून एक दिवस पाणी सोडतात, म्हणे ! बाकी सहा दिवस धबधबा पाहायला येणारांनीं काय करायचं ?

पूर्वीं गोकाक आणि जोग, दोन्ही धबधब्यांतून घटप्रभा आणि शरा-वती—दोन्ही नद्या आपले संपूर्ण जळभार खालीं ओतीत असत. आमचे वा. म. जोशी आणि हिंगण्याच्या विद्यार्थिनी, यांची कथा तर प्रसिद्धच आहे. विद्यार्थिनींची तुकडी घेऊन ते हा धबधबा पाहायला गेले. रोअररची गर्जना मैल, दोन मैलांपर्यंत उत्तम ऐकूं येत असे. थेट धबधब्यापाशीं तर तो ध्वनि अंतराळ भेदीत वर उठत असे. वा. म. आणि मुलींचा तो तांडा थेट रोअररच्या माथ्यावर जाऊन उभा राहिला. दोन्ही हात उंचावून वा. म. म्हणाले,

- आतां तुम्ही क्षणभर गप्प बसाल, तर रोअररची ती जगप्रसिद्ध गर्जना तुम्हांला ऐकूं येण्याची शक्यता आहे !

भाष्य करायची गरज नाहीं !

छे छे ! आतां त्या रोअररचं गर्जन तर्जन तर असो, पण कुजबुजही ऐकूं येईना झाली आहे. काप गेले, आणि उरलीं केवळ भोकं !

हां, त्याची उंची मात्र उणावली नाहीं. म्हणजे खालीं. अजूनही जोग

धबधबा हा नायगारापेक्षांही अधिक खोलवर उडी घेतो. त्या बाबतींत त्याचा पराभव कुणीही करूं शकणार नाहीं.

जिथं जिथं दर्शन—स्थळं बांधलीं आहेत, तिथं तिथं जाऊन त्या पडत्या प्रवाहाचं दर्शन घेतलं. प्रपातापाशीं खडकाचे थर तिरके आहेत. एका ठिकाणीं तर वर्षानुवर्षांच्या घसणीनं खडक झिजून गेला आहे. एक लहानशी घळ निर्माण झाली आहे. वरून पाणी त्या घळींत उतरतं. दृष्टीआड होतं अन् मग तें प्रगटतं तिथं, ज्या बिंदूपासून तें खालतीं उडी घेतं.

चार-सहा चित्रं घेऊन टाकलीं. एक स्थानिक गाइड होता. तो उगीच लुडबुड करीत होता. इथं जा, तिथं जाऊं नका. त्याला झिडकारून टाकलं, आणि थेट धबधब्याच्या माथ्यावर पोंचलों. सहप्रवासी माझ्या आधींच तिथं पोंचून चहूं दिशा भटकत होते. त्यांना केवळ शोभा पाहायची होती, मला ती कॅमेऱ्यांत धरून ठेवायची होती.

चहूं अंगां विखुरलेलं तें पाणी एक्या ठिकाणावरून खालते झेपावत होतं. अगदीं त्याच्या माथ्यावर पोंचलों. गाइडच्या आरड्या-ओरड्याकडं मुळींच लक्ष दिलं नाहीं. मजपासून दोन-तीन हातांवरून तो प्रवाह खालीं उडी घेत होता. तत्क्षणीं तो फुटत होता. त्याचे असंख्य थेंबुटे होत होते. ते त्या अंतराळांत स्वतःला फेकून देत होते. एका खडकाला अंग टेकून शक्य तितकं खालीं वांकलों, आणि धबधब्याचा तळ आणि हे थेंबुटे, दोन्हींची दोन चित्रं घेऊन टाकलीं. मजजवळील छायाचित्रांमध्यें तें एक दुर्लभ, उत्तम छायाचित्र आहे!

सूर्यास्त होऊं आला, मग मन मागं ठेवून परतलों. बसमध्यें बसलों. धबधब्यापासून तीन-चार किलोमीटरवर यूथहोस्टेलचं एक निवारागृह तिथं जाऊन पडाव टाकला.

सहप्रवाशांनीं चकितच केलं. आमची रेखू आमच्या खोलींत आली; अन् म्हणाली,

"चला, आप्पा!"

"अग, कुठं? आतां चांगला झोंपलों आहे..."

"उठा, अंगांत घाला!"

"घालतों, बाबा!"

"आई, तुम्हीही उठा!"

दोघंही निघालों. पाहिलं, तर शेजारच्या ओसरींत सगळे सहयात्रिक जमले होते. स्त्रिया, पुरुष, मुलं–सगळे. प्रताप पाटील, गडकरी, धासाळकर, गरगटे, कुलकर्णी, गोखले, सोमण, आजरी, सातपुते, कलघटगी–सगळे सगळे! आम्हां दोघांसाठीं दोन खुर्च्या. निरुपाय! बसलों! मग नीरेला, पातळ-नारळ. मला शाल-नारळ. मग भाषणं!

उभा राहिलों. म्हणालों,

गडे हो! अनपेक्षित केलंत! असो! एरवीं होणारा परिचय खरा नव्हे. इतके दिवस बरोबरीनं प्रवास करताहोंत. आतां खरा परिचय झाला आहे. एकमेकांचे गुण ध्यानीं आले, दोषही! कुण्या एका निमित्तानं आपण सगळे एकत्र आलों. दक्षिणेचं दर्शन घेतलं. जेवलों, खाल्लं. अडचणी आल्या, त्या सोसल्या. स्वर चढले, उतरले. आतां घरीं परतल्यावर हें सगळं विसरून जायचं. ध्यानीं ठेवायचे ते वेदान्तंगलचे पक्षी. पेरियारचे ते वन्य पशू. तीं मदुरा, रामेश्वरचीं भव्य मंदिरं. ती तंजावर नगरी. आपल्या पूर्वजांनीं मोठ्या यत्नपूर्वक जमवून ठेवलेला हा वारसा! केवढे आपण भाग्यवंत, कीं हें सगळं पाहतां आलं!

दि. ३० डिसेंबरची पाहाट. आज सायंकाळीं कोल्हापुरीं पोंचणार. रोजचा जणूं उशाशींच बांधलेला बसचा प्रवास संपणार! थोडं उदासवाणं तर वाटलंच!

स्नानं उरकून निघालों. घाट उतरून होनावरपाशीं कोंकणांत प्रवेश

केला. तिथून शिमोगा मागं पडलं, आणि थेट समुद्रापर्यंत अतिपरिचयाचं तें कोंकणी वातावरण! तो मंद सुगंध, सोनचांफीचा, रानचमेलीचा, तांबडमातीचा, पोफळींचा, केवड्याचा. तींच तीं परिचित खाचरं. उतरत्या कौलारांचीं घरं. त्या केळी. ते फणस.

गाडीनं कुमठा मागं टाकलं, अन् गोकर्णाच्या पाव्या दिसूं लागल्या. पाहतां पाहतां गाडी गोकर्णांत शिरून मंदिरापास उभी राहिली. इथं जोगळेकर नामा एक भले वैदिक आहेत. सदाचारसंपन्न. त्यांकडे थांबावं, असं सुचवून पाहिलं. पण उतरतांच भोजन–विभागाचे प्रमुख एका खानावळींत बयाणा देऊन आले होते.

मग मंदिरांत शिरलों. थेट गाभाऱ्यांत. तिथं पुरोहिताशीं थोडी वादावादी झाली.

तो म्हणाला, समुद्रस्नान करून या!

म्हटलं, पाहाटेसच उरकलं आहे, पुन्हां करायची गरज नाहीं.

अद्भिः गात्राणि शुद्ध्यन्ति।

तीं शुद्ध झालीं आहेत. यावर तो तंडूं लागला. म्हणाला, देवाचं तीर्थ घेऊं नका. म्हटलं, घेणार! देव आणि मी यांच्या मध्ये तूं दलाल कशासाठीं, रे? इथं चित्त स्थिरं व्हावं, म्हणून देवदर्शनास आलों आहें. तूं वटवट करूं नकोस. तो बडबडत राहिला. मी त्याला तसंच बडबडूं देऊन देवळाबाहेर पडलों.

सताठ वर्षांपूर्वीं आम्ही दोघंच आलों होतों. जोगळेकरांकडे उतरलों होतों. पाहाटेस स्नान उरकलं होतं. अभिषेकासाठीं मंदिरांत आलों होतों. नवल, कीं आमचा अभिषेक सुरू असतां वीत–दीड वीत लांबीचे दोन मासे मंदिरांतील नालींतून आंत शिरले, आणि पिंडीभंवतालीं पाण्यांत फिरूं लागले.

जोगळेकरही नवल करून म्हणाले, कीं पावसाळ्यांत समुद्राचं पाणी

गांवापर्यंत येतं, तेव्हां कधीं क्वचित् असं घडतं. पण आतां तर उन्हाळा ! समुद्र खूप खोल गेला आहे. हें एक आश्चर्यच ! प्रत्यक्ष शिवपार्वतीच तुमचा अभिषेक स्वीकारीत आहेत.

तो प्रसंग स्मरत थेट समुद्रावर पोंचलों. काय सुंदर समुद्रतीर आहे ! ऐन तीरावर खडकांचा एक पुंज आहे. त्याच्या आडून समुद्राचीं, किनाऱ्याचीं, दोन–चार चित्रं घेऊन टाकलीं. परततांना जोगळेकरांकडे डोकावलों. त्यांच्या बंधूंच्या अग्निशाळेचं दर्शन घेतलं. देवदाम्पत्याच्या नांवें श्री महादेवास अभिषेक करण्यासाठीं त्यांना दक्षिणा दिली.

मग जिथं भोजनासाठीं बयाणा दिला होता, तिथं अन्नब्रह्माचं सेवन केलं. अन्नाची निंदा करूं नये, पण जेवत असतां त्या श्लोकाचं स्मरण झालं :

> अहो लक्षुंबाई, बहुत तुमचा पाक बरवा
> मधीं राहे कच्चा, तळिंच जळला, तोंडिं हिरवा ॥

तें असो, या प्रवासांतलं हें शेवटचं हॉटेलमध्यें खाणं ! जन्मांत कधीं हॉटेलमध्यें जेवलों नाहीं, तितक्यांदा या प्रवासांत लाभलं, तें जेवलों, या कुपथ्यांतून तारलं मला शहाळ्यांनीं ! त्या देवाघरच्या पाण्यानं माझी प्रकृती होती तशी राखली.

परतीचा प्रवास सुरू. वाटेंत यल्लापुरीं कलघटगी आणि त्यांच्या मातुःश्री उतरल्या. वारंवार हुबळीला यायचं निमंत्रण देत. मी हो हो म्हणत राहिलों.

बरोबर साडे नऊच्या ठोक्याला कुमारनं कोल्हापूर बस–स्टॉपसमोर गाडी आणून उभी केली.

आतां पुनः हा दक्षिण–प्रवास होणें नाहीं.

हां, तंजावरला मात्र पुनः जाण्याचा संकल्प या क्षणीं करून ठेवला.

तिथं कमींत कमी आठ दिवसांची सवड काढून जायचं. श्रीसमर्थ शिष्य भीमस्वामी तंजावरकरांच्या मठांत उतरायचं. सध्यांचे भीमस्वामी मराठीवर प्रेम करणारे. मीही मराठीच्या उपासकांच्या मोचे-वहाणा मस्तकीं वाहण्यांत धन्यता मानणारा.

तिथं ज्ञानेश्वरीचीं जुनीं हस्तलिखितं आहेत. तीं पाहायचीं. मज घरीं एक हस्तलिखित, तें दोन लेखकांनीं लिहिलेलं. पहिल्यानं तेरा अध्याय लिहिले. शेवटीं ओवी लिहून ठेवली :

> शकें सोळाशतें तेरोत्तरें । जैं पदपद्धति केली ज्ञानेश्वरें ।
> ते गोविंद बरवा मुखांतरें । जगज्जीवन लेखक ॥

म्हणजे शके बाराशें बारामध्यें ज्ञानोबांनीं लिहिलेल्या ज्ञानेश्वरीची गोविंदबरवा या लेखकानं शके सोळाशें तेरामध्यें केलेली प्रतिलिपि. हा गोविंद बरवा, श्रीशिवछत्रपतींना जो दुसरा राज्याभिषेक झाला, त्याची पोथी लिहून ठेवणारा, निश्चलपुरी गोसाव्याचा शिष्य.

पुढले पांच अध्याय लिहिले विठ्ठल लक्षुमण मसुरेकरानं. त्याची छाप अशी आहे :

> श्री शके १६६८ वरुषे क्षयनाम संवत्सरें पौष्य सुध
> पंचमी स्थिरवासरे ग्रंथ संपूर्ण लिहीत विठल लक्षुमण मसुरेकर
> स्वहस्ताक्षर ग्रंथ समाप्त शुभं भवतु ॥

अशी ही मोलाची पोथी मी सवें घेऊन तंजावरला जाईन. पाठभेद तपासून पाहीन. ज्ञानदेवांच्या लेखनाच्या जवळ पोंचायचा यत्न करीन.

त्यासाठीं मी एकदां तंजावरला जाणार आहें.

प्रस्थानाचें पोफळ याच क्षणीं ठेवतों आहें.



६८७
२५०२२
२८।१२।८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

RBTDK-0025422